नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाची वाङ्मय पारितोषिक योजना

आवाहन

विदर्भातील लेखकांसाठी स्थायी स्वरूपाची एकही वाङ्मय पारितोषिक योजना आजवर नव्हती. ही उणीव थोडी फार भरून काढण्यासाठी विदर्भ साहित्य संघाने, कर्तव्य भावनेने पुढाकार घेण्याचे ठरवले होते. त्यानुसार ५० हजार रुपयांचा निधी जमा करून तो मुदतबंद ठेवीत (फिक्स्ड डिपॉझिट) परिवर्तित करावा आणि त्यावर मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेतून एक भरघोस असा साहित्य पुरस्कार दरवर्षी द्यावा व त्याची सुरुवात स्वतःपासून करावी असाही विचार झाला आणि साहित्य संघाच्या कार्यकारिणीच्या प्रत्येक सदस्याने ५००/- रु. जमा केले. विशेष म्हणजे साहित्य संघाच्या शाखांनीही यात योगदान करण्याची तयारी दर्शविली. गोंडवना शाखेने तर १० हजार २०२ रु. या निधीसाठी जमाही केले. अशा तऱ्हेने जमा झालेल्या निधीतून पुरस्कार योजना यंदापासून प्रत्यक्षात आलेली आहे.

कादंबरी, कथा, काव्य, ललित गद्य आणि समीक्षा संशोधन ह्या ५ वाङ्मय प्रकारासाठी पाळीपाळींने (रोटेशन) दरवर्षी हा पुरस्कार दिला जाईल. सर्वश्री कै. भाऊसाहेब माडखोलकर, कै. पु.भा. भावे, कै. प्रा. शरदचंद्र मुक्तिबोध, कै. गो.रा. दोडके आणि डॉ.वा.वि. मिराशी या त्या त्या क्षेत्रातील वैदर्भीय मान्यवरांच्या स्मरणार्थ हे पुरस्कार असतील.

कै. भाऊसाहेब माडखोलकर यांचे वि.सा. संघाच्या उभारणीत असलेले अनन्यसाधारण स्थान लक्षात घेता यंदा वि.सा. संघाच्या वर्धापन दिनी १४ जानेवारी ९० रोजी कादंबरी या वाङ्मयप्रकारासाठी पहिला पुरस्कार त्यांच्या स्मरणार्थ, प्रा. वामन पात्रीकर यांच्या 'जगवुडी' या कादंबरीस दिला गेला. रोख रु. २००१/- आणि सन्मानचिन्ह या स्वरूपात हा पुरस्कार आहे. यंदा या कादंबरी वाङ्मय प्रकारासाठी प्रा.डॉ.सौ. आशा सावदेकर, डॉ.व.कृ. वऱ्हाडपांडे आणि डॉ. विश्वेश्वर सावदेकर यांनी परीक्षक म्हणून काम केले.

कै.गो.रा. दोडके यांच्या स्मृर्थ श्री.मा.नी. गलगलीकर आणि मित्र मंडळींनी पुरस्कार निधीमध्ये मोठी भर घातली हे सांगण्यासाठी मला आनंद वाटतो. पुढील वर्षी (१९९०) कै. गो.रा. दोडके यांच्यास्मरणार्थ ललित गद्य या वाङ्मय प्रकारासाठी पुरस्कार दिला जाईल.

वाङ्मय पुरस्कार निधी अद्याप आम्ही पूर्ण करू शकलो नाही. आमचे उद्दिष्ट १ लक्ष रुपयांचे आहे. विदर्भातील सहृदय वाचक हे उद्दिष्ट गाठण्यास आम्हाला उदार अंतःकरणाने सहकार्य करतील असा मला विश्वास वाटतो.

राम शेवाळकर
अध्यक्ष
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी
प्रबंध संपादक : केशव जोशी

॥ भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन–संवर्धन–संशोधन ॥

वर्ष शेहेचाळीसावे/अंक ४-५-६
एप्रिल–मे–जून/१९९०
मूल्य–१० रु./वार्षिक वर्गणी : ३५ रु.
त्रैवार्षिक वर्गणी : ९० रु.

अनुक्रम ■ ■ ■

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

संदर्भ सेवा : चंद्रकांत कुळकर्णी, आमंत्रक, श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय, वि. सा. संघ, नागपूर
आवरण पृष्ठ : भ. मा. परसवाळे / रेखाटने : भ. मा. परसवाळे / अरुण मोरघडे
मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी इ. सहकार्य : सौ. शोभा उबगडे / श्यामकांत कुळकर्णी

जाहिरातविषयक संपर्क : आमंत्रक, प्रकल्प विभाग, वि. सा. संघ, नागपूर

संपादकीय पत्रव्यवहार : संपादक / युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक / नागपूर–४४००१२

* * * * * * * * * * * * * संपादकीय

विचारवंतांचे, वाङ्मय-कलेच्या निर्मात्यांचे, जीवनव्यवहार व समकालीन ताणतणाव यांचे आकलन तोकडे पडणे, अंतर्गत उर्जेचा प्रश्न आणि त्याच्या मुळाशी अंतर्विश्व व बाह्यविश्व यांच्यातील आंतर-क्रिया व त्यासंबंधीच्या प्रक्रियात्मक ज्ञानाचा अभाव असणे अशा स्वरुपाचे सांस्कृतिक संकट आपल्या समोर उभे ठाकले आहे. असे विवेचन गेल्या काही संपादकीयांमधून आपण केलेले आहे.

अशा प्रकारच्या संकटाची ही जाणीव या वेळी केवळ युगवाणीलाच तेवढी व्यक्त करावीशी वाटते आहे असे नव्हे. यंदाच्या नुकत्याच झालेल्या नॅशनल कन्व्हेंशन ऑफ इंडियन ऑथर्स मध्ये बोलताना अमृता प्रीतम यांनी देखील थोडया वेगळ्या अर्थाने अशीच जाणीव व्यक्त केलेली आहे. २० मे १९९० च्या साप्ताहिक धर्मयुगमध्ये प्रकाशित झालेले त्यांचे ते भाषण या अंकातच युगवाणीच्या वाचकांकरिता अनुवादित करून प्रकाशित केलेले आहे. (धर्मयुग, २० मे १९८९ असे त्याचे शेवटी प्रकाशित झालेले आहे. ते कृपया २० मे १९९० असे वाचावे) अमृता प्रीतम यांच्या त्या संग्राह्य व्याख्यानात त्यांनीही " बाह्य अडचणींपेक्षा अंतरंगाशी संबंधित पैलूंवर विचार करणे; लक्ष केंद्रित करणे, योग्य होईल." असे प्रतिपादन केलेले आहे. ते बघता युगवाणीच्या गेल्या काही संपादकीयातील ' स्व ' गत पुर्नरचना व त्याकरिता बाह्यविश्व आणि अंतर्विश्व यांच्यातील गुंतागुंतीचे आकलन इ. विषयक केलेले विवेचन सार्थकी असल्याची खात्री पटावी.

मुस्कटदाबीच्या एका वेगळ्या पर्वातून समकालीन भारतीय समाजातील निर्मिती व परिवर्तन यांचा प्रवास सुरू आहे. या पर्वात मार्ग सापडणेही कठीण असल्याची जाणीव अमृता प्रीतम सारखी लेखिका व्यक्त करते तेव्हा ती जाणीव व्यक्तिगतच तेवढी नसून ती तशी व्यक्त व्हावीशी वाटणाऱ्या आपणा सर्वांचीच ती प्रातिनिधिक अभिव्यक्ती ठरते.

तसे तर सारे जगच आज परिवर्तन आणि पुनर्रचनेच्या अभूतपूर्व, नव्या अशा वेगळ्याच वळणावर येऊन पोहचलेले आहे. या संक्रमणाचे स्वरूपच आजवरच्या साऱ्या संक्रमणांपासून मूलत: भिन्न आहे. ते केवळ नवमतवादी नाही. अथवा नवमतवादी विचारांच्या राजकीय; आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक, सैद्धांतिक व्यवस्था वा निर्मिती यांनाच केवळ आलेले ते फळ आहे असेही नव्हे. एका अभूतपूर्व, नाट्यपूर्ण अशा भीषण स्वरूपाच्या संधिकालातील आपण सारे प्रवासी झालो आहोत, मानवी जीवनाचा, मूल्यव्यवस्थांचा संपूर्ण क्षय झाल्यानंतर लाभणारे जे वळण असू शकते ते हे वळण असावे.

सहज, नैसर्गिक, उत्स्फूर्त अशा एका वेगळ्या अभूतपूर्व उठावाची स्थिती या परिस्थितीत दडलेली आहे. कोणत्याही बाह्य शक्तीने जबरीने घडवून आणलेल्या उठावाच्या स्थितीपलीकडची ही अवस्था आहे. ही स्थिती प्रत्यक्षात आलेलीच आहे असे नव्हे तर येऊ घातलेल्या अशा या अवस्थेची लेखक, कलावंत, विचारवंत, बुद्धिवंत यांनाच प्रथम चाहूल लागत असते. लागावयास हवी. मात्र बुद्धिवंत; लेखक, कलावंत निर्मात्यांच्या मोठ्या संख्येने या बाबींकडे चालविलेल्या दुर्लक्षामुळे

आज सामाजिक–राजकीय–सांस्कृतिक प्रभुत्व हे बुद्धिवंतांचे उरलेले नाही. त्यामुळे अशी ' चाहूल ' घेण्याबाबत येथील बुद्धिवंत देखील उदासीन झालेला आहे.

बुद्धिवंत म्हणजे कोणीतरी ' उच्चवर्णीय ' किंवा माणूसघाणा प्राणी ! बुद्धिवंत म्हणजे केवळ लेखक, कलावंत, प्राध्यापक ! बुद्धिवंत म्हणजे केवळ शहरी ! ग्रामीण नसलेला ! बुद्धिवंत म्हणजे श्रमाशी संबंध नसलेला प्राणी ! बुद्धिवंत म्हटला म्हणजे कोणत्याही गोष्टीचा कीस पाडणारा! कोणतेच काम न होऊ देणारा व म्हणून अडयळाच ! वाद घालणारा, म्हणून ज्याला टाळलेच पाहिजे असा प्राणी ! हिंमत नसणारा, विद्वत्तेचे प्रदर्शन करणारा ! एखाद्या बाबीतून स्वतः निसटून जाणारा ! स्वार्थी ! किंवा ' बोअर ' असा प्राणी ! अशा बुद्धिभ्रम करणाऱ्या विविध प्रतिमा जनमानसात बुद्धीवंतांबाबत रूढ केल्या गेलेल्या आहेत. त्या एवढ्या पक्के- पणाने रुजलेल्या आहेत की खुद्द बुद्धिवंत असणाऱ्याला देखील त्या मान्य असाव्यात. (?) स्वातंत्र्यपूर्व काळी बुद्धिवंतांचे भारतीय समाजात असलेले स्थान स्वातंत्र्योत्तर काळात मात्र बुद्धी व बुद्धिवंतांचे अवमूल्यन करण्याच्या प्रयत्नांपोटी हळूहळू नाहीसे होत आज ते पूर्णपणे संपुष्टात आल्यासारखेच झालेले आहे.

जणू बुद्धिवंतांची प्रभुत्वस्थानीची गरज ही स्वातंत्र्यपूर्व काळापुरतीच तेवढी असते व स्वातं- त्र्योत्तर काळात ती नाहीशी झालेली असते असा एखादा समाजशास्त्रीय सिद्धांतच असावा ! अशी ही स्थिती झालेली दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात बुद्धी, बुद्धिवंत, विचार, विचारवंत, मूल्य, मौलिकता, लेखक, कलावंत यांचे स्थान व प्रभुत्व संपुष्टात आणण्याचे षडयंत्र कोणीही रचलेले असो त्याचा एकसंघ परिणाम एकएक करता बहुतेक साऱ्याच संस्था, पक्ष, गट, समाज यांच्यातील बुद्धी व बुद्धिवंतांचा ऱ्हास होण्यातच झालेला आहे असे दिसते.

बुद्धीची जागा देखील पूर्णपणे भावनेने व्यापून टाकून, प्रत्येक बाबीविषयीची भावनाच तेवढी दुखावली जाणार नाही अशी गरज निर्माण केल्या गेलेली आहे. नेतृत्वसुलभतेकरिता भावनात्मक आव्हानवाजीला ' ओ ' देणाऱ्या समाजाची निर्मिती ही बुद्धिवंतांची निर्मिती निश्चितच नाही. मात्र ती रोखण्यातही बुद्धिवंतांना कोणताच वाटा उचलता येऊ नये एवढी सामाजिक नगण्यता बुद्धी- संबंधितांच्या वाट्याला आज आलेली आहे.

आजच्या घटकेला तरी प्रत्येकच जात; धर्म, वर्ण, पंथ, पक्ष, गट, संस्था, माध्यमे एवढेच काय पण कुटुंबांमधूनही खऱ्या अर्थाने प्रज्ञावंत असणाऱ्यांचे उच्चाटनच झाल्यासारखे वाटते आहे.

बुद्धिवंतांनी देखील त्यांना मिळणाऱ्या या वागणुकीने ' पिछाडून ' जाऊन माघारच घेतलेली दिसते. परिणामतः आज वाढून ठवलेले सारेच प्रश्न प्रत्येकालाच गिळंकृत करू बघताहेत.

' संख्या ' आणि ' सोपेपणा ' ही अनुनयवाद्यांची नेहमीचीच शस्त्रे राहिलेली आहेत. प्रत्येकच जाती–जमातीतील, धर्म, पक्ष, पंथ, संस्था यातील बुद्धिवंतांचा पाडाव तसा याच ' संख्या ' शास्त्रीय हत्यारानेच होत आलेला आहे.

भावनाप्राधान्यावरच तेवढे आधारलेल्या, सोपे, सुटसुटीत, कोणतेच कष्ट न पडू देणारे, गुळगुळीत, मुलायम असे जीवन जगण्याची स्वप्ने पडू लागलेल्या समाजांची सांस्कृतिक पचनशक्ती नाहीशी होत जाते. बुद्धिभ्रष्ट होण्याशिवाय पर्यायच तिथे उरत नाही. असा समाज येथेही आकाराला आलेला आहे.

लोकांना काय रूचेल, काय पटेल हे बघणे हे जनमाध्यमांचे कार्य झालेले आहे. तो त्यांचा हेतूच आहे. त्यावरच त्यांचे अस्तित्व आज अवलंबून आहे. याउलट लोकांना काय रूचावे, काय पचावे; त्यांची काय काय पचविण्याची शक्ती, कसकशी वाढवावी याचे चिंतन, लोकनिरपेक्ष चिंतन, म्हणजे त्यांना काय रूचेल, पचेल याचा विचार न करता होणारे चिंतन करणे हे बुद्धिवंतांचे कार्यच आहे. तोच त्याचा हेतू आहे.

आज बुद्धिवंतांचे सामाजिक अस्तित्व न जाणवण्याचे कारण त्यांचे हे असे चिंतन थांबलेले आहे असाच तर होत नाही ना ?

एकीकडे जनमाध्यमांकित अथवा पगारी बुद्धिवंतांकडून अशा प्रकारच्या चिंतनाची अपेक्षा करता येत नाही. तर दुसरीकडे बंडखोरीचे तत्त्वज्ञान जाणून घेऊन ते जगू इच्छिणाऱ्या विचारवंत, लेखक, कलावंत, बुद्धिवंतांचा झपाट्याने ऱ्हास होत जाऊन लांगुलचालनार्थी, अनुदानशरण अशा पांगळ्या लेखन व चिंतन संस्कृतीच्या जाळ्यात निर्मितीचा, चिंतनाचा, बुद्धीचा बराचसा व्यवहार गहाण पडलेला आहे.

लेखक, कलावंत, विचारवंत, निर्माता यांनी बंडखोर असणे हे वास्तव नसून ती केवळ दंतकथा असावी असे वाटायला लावणारी परिस्थिती आपण जगतो आहोत. चिंतनवृत्ती, बुद्धिमत्ता, प्रज्ञावृत्ती यांची जोपासना करणाऱ्या वृत्तींचा दुष्काळ पडलेला आहे.


आज नव्याने नाव घेण्यासारखे महत्त्वाचे प्रज्ञावंत, चिंतक, चिंतन केवळ मराठीतच उपलब्ध नाही असे नव्हे तर संपूर्ण भारतीय समाजातच ते आज उपलब्ध नाही अशी स्थिती आहे. त्याची फारशी खंत देखील कुणाला वाटण्यासारखी परिस्थिती नाही.

जीवनातील सर्वच क्षेत्रातील सर्वच बाबी या वर्तमानपत्रीय पद्धतीच्या वा जाहिरातींसारख्या सोप्या, सुटसुटीत, सुबोध व आकर्षक अशा पद्धतीने व्यक्त झाल्या तरच त्या जाणून घेण्यायोग्य अन्यथा दुर्बोध, त्याज्य, अशा सुटसुटीत, पलायनवादी भूमिकेच्या जाळ्यात इथला तथाकथित बुद्धिवंत समाज देखील बव्हंशी सापडलेला आहे.

विकासाचे अनुशेष भरून काढण्याच्या चळवळी केवळ चलनी नाण्यांमध्ये मोजता येणाऱ्या आकड्यांच्या स्वरूपातच तो मांडत असतात. मात्र या समाजावर लादल्या गेलेल्या या चिंतनविषयक, सांस्कृतिक, बौद्धिक अनुशेषाचे काय ? तो भरून निघणे हे कोणत्याच नियोजनाचा भाग का असत नाही ?

बुद्धिवाद ही या समाजात अद्यापही स्वीकारल्याच जाऊ नये अशीच हाताळली गेलेली बाब आहे. याहून वेगळे असे काही याचे उत्तर असू शकते काय ?

श्रीपाद भालचंद्र जोशी


PARASWALE

दलित कविता : एक स्वगत

राजेन्द्र डोळके

"दलित काव्याचे मराठी साहित्याला फार मोठे योगदान आहे. अन्याय, विषमता याबद्दल दलितांच्या भावना जेवढ्या विद्रोही स्वरूपात प्रकट झाल्या तेवढ्या मराठी साहित्यात त्या अगोदर निर्माणच झालेल्या नव्हत्या. त्या दृष्टीने मराठी वाङ्मयातून दृग्गोचर होणारे, विद्रोह हे मूल्य मानणारे हे जग मराठी साहित्याकरिताच नव्हे तर जागतिक साहित्याच्या दृष्टीनही नवीनच म्हणायला हवे."

असे असले तरीही, "सामाजिक न्यायाच्या तत्त्वज्ञानाची क्रांतिकारक विचारसरणी मांडणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची उदात्त जीवनमूल्ये आणि सामाजिक मूल्ये यांचा वैपुल्याने आढळ दलित कवितेतून का होऊ नये?" असा प्रश्न प्रस्तुत लेखकास पडलेला दिसतो.

त्यांची ही एक कैफियत. या लेखावरील, वाचकांच्या विचारपूर्ण प्रतिक्रिया हव्या आहेत. त्या प्राप्त झाल्यास त्यातील निवडक प्रतिक्रिया युगवाणीतून प्रकाशित करण्यात येतील.

१९६० नंतरच्या मराठी वाङ्मयसृष्टीत दलित चळवळ ही विशेषत्वाने नजरेत भरते. दलित साहित्याला मराठी साहित्यातील एक सामर्थ्यवान प्रवाह असे निश्चितपणे म्हणावे लागते. या दलित साहित्याची प्रेरणा अर्थातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत. आंबेडकरांच्या विचारांनी, शिकवणुकींनी आणि चळवळींनी दलितांची अस्मिता जागृत होऊन त्यात एक आत्मविश्वास व एक नवी जाणीव आली. ह्या आत्मविश्वासाने आणि जाणीवेने दलित समाज स्वत:च्या जीवनाकडे पाहू लागला. वर्णाश्रम धर्मव्यवस्था, जातिव्यवस्था, अस्पृश्यता इत्यादींसंबंधी त्यांचे चिंतन सुरू झाले व त्यातून प्रचलित व्यवस्थेविरुद्ध बंड करण्याची आवश्यकताही वाटू लागली. दलित साहित्य म्हणजे या विचारांचा, या जाणीवेचा, या बंडाचाच एक आविष्कार होय.

दलित काव्य ही मराठी काव्याच्या इतिहासात अपूर्व व असामान्य अशी घटना होती. हजारो वर्षांपासून जो मूक होता त्याच्या अंत:करणातील भावना, व्यथा, विद्रोह व प्रक्षोभ प्रथमच दलित काव्याद्वारे फुटला. हे अर्थातच डॉ. आंबेडकरांचे कार्य आहे, दलित कवितेचा विचार केला तर त्यात काही मूलभूत व समान धागे, आणि मध्यवर्ती प्रवाह सारखे आढळतात. त्यापैकी सर्वाधिक मूलभूत धागा कोणता आढळत असेल तर तो बाबासाहेबांना बहुतांश दलित कवींनी आपल्या कवितेचे प्रेरक मानणे हा असून त्यांच्याविषयीचा अपार आदर आपल्या कवितेतून व्यक्त केला आहे.

अण्णाभाऊ साठे लिहितात—

जग बदल घालुनि घाव
सांगुनि गेले मला भीमराव

नामदेव ढसाळ लिहितात–

"असा तू एकुलता एक आमच्या रथाचा सारथी
जो दिग्विजयी तंद्रेतून आमच्यात उतरतो
नि शेतातून गर्दीतून नि लढ्यातून
आमाच्या बरोबर असतो
नि आम्हाला शोषणातून सोडवतो
तो तू, तोच तू आमचा." ('डॉ. आंबेडकर')

त्याचप्रमाणे ढसाळांची 'आता', ज. वि. पवार यांची 'आज', 'पन्नास वर्षांनी', डॉ. यशवंत मनोहरांच्या 'भीमराव रामजी आंबेडकर' इ. कवितांतून डॉ. आंबेडकरांविषयी भावनोत्कट आदर व्यक्त झालेला आहे. आंबेडकरांविषयीच्या आदराबरोबरच त्यांनी पेटवलेली क्रांतज्योत क्षीण होत चालली आहे याबद्दल दलित कवितेतून खंतही व्यक्त होताना दिसते.

वामन कर्डक म्हणतात–

भीम माझ्यामध्ये होता, मान ताठ होती माझी
माझ्यातला भीम इथे, मीच केला उणा,
दोष देऊ कुणा ?

डॉ. यशवंत मनोहर म्हणतात–

"त्याच्या आठवणींशी डोळे भिडवतानाही आता
अपराध्यासारखे वाटते."

लौकिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही पातळ्यांवर दलितांच्या वाट्याला आलेली तुच्छता याविषयीची वेदना दलित कविता फार भेदकतेने रंगविते. डॉ. मनोहर म्हणतात–

"कुठे लपवावे तोंड
कशा चुकवाव्यात आपल्या निषेधाच्या झळा
जिथे जावे तिथे जन्म सावली सारखा सोबत येतो
कशी उभी करावी काळजाला पडणारी घरे
आपल्यातून
येणाऱ्या प्रत्येकच दिवसाच्या पाठीवर
मला खाली पहायला लावणारा कत्तलखोर
इतिहास सांगतो"

दामोदर मोरे म्हणतात –

"मी आलो म्हणजे
तुमच्या रक्तवाहिन्यातून साकळतोय
माझ्याविषयीचा विटाळ
घिल्हारीच्या काट्यासारख्या तुमच्या धारदार
नजरांनी
बघवत नाही माझ्या मला रक्तबंबाळ झालेला मी
तेव्हा कासवानं कवटीत अंग दडवावं
तसा लपेटून घेतोय माझ्यातच मला हळुवार.

वर्णाश्रम व्यवस्थेविरुद्ध टक्कर देणे हे दलित कवितेचे लक्ष्य आहे. ह्या टक्कर देण्यात अपयश जरी आले तरी हरकत नाही. कारण बोलून चालून आम्ही हजारो वर्षांपासून उपेक्षितच आहो. ही खंत, हे दुःख दलित कविता विलक्षण प्रत्ययकारी रीतीने वर्णन करते. अर्जुन डांगळे म्हणतात–

"...जगु शकतो घेऊन हा वेदनांचा भार
कारण आम्ही युगानुयुगाचे दुःखाचे बलुतेदार"

प्रकाश जाधव म्हणतात–

"प्रथाच पडून गेलीय आता
सूर्याला नागडं करायची आणि उल्केचे कासोटे
फेडायची
मलाही सवय जडलीय आताशी
दगड फेकून आकाश फाडायची"

डॉ. मनोहर म्हणतात–

"कैसा हा उन्हाळा। कैसी बंदिशाळा ॥
उभा जन्म काळा। झाला येथे ॥"

दलित वर्गाला त्यांच्या स्वतःच्या वाट्याला आलेले दुःख, आर्थिक व सामाजिक दारिद्र्य, अवहेलना इत्यादींचे कारण हजारो वर्षांपासून चालत आलेली हिंदू संस्कृती, परंपरा व समाजव्यवस्था हेच आहे, असे वाटत आलेले आहे. त्यामुळे संस्कृतीविषयीची चीड प्रायः बहुतेक दलित कवींनी विलक्षण त्वेषाने व पोटतिडिकेने व्यक्त केलेली दिसते. नामदेव ढसाळ म्हणतात–

"वाटते पान खाऊन तुझ्यावर पचापचा थुंकावे
तुला लेंडाच्या गाडग्यात बुडवावे
मी तुला शिव्या देतो, तुझ्या ग्रंथाला शिव्या देतो,
तुझ्या संस्कृतीला शिव्या देतो,
तुझ्या पाखंडीपणाला शिव्या देतो
इतकेच मी आईबापांना देखील शिव्या देतो"

डॉ. मनोहर लिहितात–

"तिथे प्रथमच जमीनदोस्त होणारी तुमची संस्कृती, तुमचा परमात्मा, तुमची मंदिरे...,"

त्र्यंबक सपकाळ लिहितात—

"नागडा आलो पण इथेही नागवला गेलो
समाज पुरुषाच्या अहंकाराने, हे संस्कृतिप्रिय देशा
तुला माझा नागडेपणा कधी झाकताच आला
नाही

वामन निंबाळकर लिहितात—

"तुमच्या कुजट कुबट संस्कृतीचे
ढबढबलेले ढोल कुठवर वाजवाल ?
आता तुमच्याच संस्कृतीच्या
साऱ्या चिंध्या गळून पडणार आहेत."

हिंदु धर्मग्रंथांतील 'मनुस्मृती' ह्या ग्रंथाविषयी तर दलित कवींना विलक्षण चीड आहे. कर्म-सिद्धान्तासारखे तत्त्वज्ञान व समाजातील शूद्रांचे सर्वांत कमी महत्त्व केवळ 'मनस्मृती'तच सांगितले आहे असे नाही तर अन्य हिंदुधर्मग्रथात देखील सांगितल्या गेले आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मनुस्मृती'चे दहन केल्यामुळे 'मनुस्मृती' ह्या ग्रंथाविषयी व मनूविषयी चीड व्यक्त करणे हाही एक भावनिक विषय दलित कवींनी आपल्या कवितेचा केला आहे व त्या ग्रंथाविषयीचा जहाल संताप दलित कवितेने प्रगट केला आहे.

नामदेव ढसाळ म्हणतात—

... तू छिन्न विछिन्न केलीस
माणसालाच दास केलेस
पाखंडी मनूला—माणसाच्या शत्रूला
डोक्यावर घेतलेस

डॉ. मनोहर म्हणतात—

"अरे, या मनूच्या मुलांनाही माणूस होणे भागच
पडेल
अशी तुझी ती जलाल घटना तू कुठे ठेवलीस?"

वामन निंबाळकर म्हणतात—

"मनूच्या वारसदारांनो
अनंत वर्षांपासून रचलेत तुम्ही
माती दगडाचे ढीग आमच्या मेंदूवर"

ही कविता मनुविषयीच चीड व्यक्त करते असे नाही तर हिंदु संस्कृती नको, त्यांची परंपरा नको, त्यांचे ग्रंथ नको, त्यांचा ईश्वर नको, ह्यातील परंपरेने चालत आलेले सर्व मोडून काढा असे ही कविता म्हणते. त्र्यंबक सपकाळे ईश्वराला उद्देशून लिहितात—

"तुझ्यासमोर माणुसकीवर केले बलात्कार
तुझो थुंकी झेलणाऱ्यांनी, तरीही तू थंढच
तुलाही आहे लिंग दाविले नाहीस पुरुषार्थाचे पाणी
तू होतास मोहिनी तेव्हाही होते कारे हे अनवांटेड
क्लेश ?

डॉ. मनोहर लिहितात—

" परमात्मा आमुचा । शत्रू सर्वकाळ...
देवाच्या गळघाचा ।
घेईन मी घोट । चितारीन पाठ खेटराने ।"

नामदेव ढसाळ लिहितात—

"गीतेचे गरळ प्राशून तू रोमरोम बांडगूळ केलेस माणसालाच माणसाची हागुमुती काढायला लावलेस ब्राह्मणांच्याही विरुद्ध ही कविता लिहिते.

केशव मेश्राम लिहितात—

"माझ्या चालीसोबत डफ कडकडला, पाने निस्तेज
झाली
दवा धरून बसलेली श्वापदे जानवी सावरित
दवतदचकत पुढे आली

प्रल्हाद चेंदवणकर लिहितात—

"तुमचे मात्र तेच रडे
जानवं पांघरून पेडगावकडे"

हिंदु संस्कृती, परंपरा, धर्मग्रंथ, मनु, ब्राह्मण ह्याविषयीची चीड व्यक्त करूनच दलित कविता थांबत नाही तर भारताला जे स्वातंत्र्य मिळाले त्याबद्दलचाही आनंद ह्या कवितेत दिसून येत नाही. उलट स्वातंत्र्य मिळाले परंतु आमची अवस्था मात्र अजून दुःख, अपमान, दारिद्र्य, अन्याय हे सहन करणारीच आहे, असाच आशय ही कविता व्यक्त करते. नामदेव ढसाळ म्हणतात—

"पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ठ
स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे ?"—

हे सर्व मोडून काढण्यासाठी बंडाची भाषा ही कविता बोलू लागते, क्रांतीची, विद्रोहाची भाषा ही कविता बोलू लागते.

ज. वि. पवार म्हणतात–

"चला तर म्याना म्यानांतील तलवारी आता
बाहेर काढा
भिंती भिंतींवरील बंदुकांचें चाप पुन्हा एकदा
चाचपून पहा
कशाला ऐकता बक्वास त्यांची
'टाईम इज नॉट राईप फॉर रिव्हॉल्यूशन'"

रविचंद्र हडसनकर लिहितात–

"हाच तो माझा गळा आज, आरोळी ठोकतो
क्रांतीची"

दलित कवितेचे स्वरूप याप्रमाणे आहे. यापेक्षा फारसे वेगळे स्वरूप ह्या कवितेचे नाही प्राचीन संस्कृती, परंपरा, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था याविरुद्ध बंड करणे व आपल्या तापदायक जीवनाचा अनुभव पुन:पुन्हा आळवणे हाच आशय दलित कवितेतून आविर्भूत होतो. स्पृश्य–अस्पृश्य हा भेद येथील उच्चवर्णीयांनी निर्माण केला हे गृहीततत्त्व धरून ह्या उच्चवर्णीयांवर (त्यातही ब्राह्मणांवर अधिक) आपल्या लेखणींनी कठोर कोरडे बहुतेक दलित कवींनी ओढलेले आहेत.

अनेक वर्षे ज्यांनी अन्याय सहन केले, विषमतेचे चटके सहन केले त्यांच्या कवितेचे स्वरूप असे होणारच असे ह्याचे कारण सांगितल्या जाते. त्याचबरोबर असेही सांगितल्या जाते की दलितांच्या व बहुजनसमाजाच्या भावनांचे चित्रण मराठी काव्यातून आजपर्यंत झालेच नाही. ते प्रथमच दलित साहित्यातून होते आहे. त्यामुळे दलित कवितेने मराठी काव्याला जबरदस्त हादरा दिला गेला आहे.

मात्र मराठी कवितेतून त्या अगोदर सामाजिक व दलित आशय खरोखरच मुळीच व्यक्त झालेला नाही काय ?

अर्वाचीन मराठी काव्य केशवसुतांपासून सुरू झाले असे समजतात. केशवसुतांचा काळ हा महाराष्ट्राच्या बौद्धिक जागृतीचा होता. लोकहितवादी, विष्णु शास्त्री चिपळूणकर, म. फुले ही पिढी नुकतीच अस्तंगत होत आली होती, आणि लो. टिळक व आगरकर ही दोन व्यक्तिमत्त्वे महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनात नवा प्राण फुंकत होती. आगरकरांच्या विचारांचा केशवसुतांवर विलक्षण परिणाम झाला होता असे म्हणतात. आगरकरांच्या लेखनातून स्फूर्ती घेऊन केशवसुतांनी त्यावेळेपर्यंत मराठी कवितेचा विषय न झालेल्या सामाजिक सुधारणांविषयीच्या कविता लिहायला सुरुवात केली. केशवसुतांनी आपल्या 'तुतारी'मध्ये 'जुने जाऊ द्या मरणालागुनि' म्हटले व 'जुन्यातुनी जी निष्पत्ती नवी ; काय नव्हे ती श्रेयस्कारक ?' असा सवाल केला. या तुतारीच्या नादाने सबंध मराठी कविमंडळ जागे झाले व त्यांनी एक तुतारी मंडळ स्थापन केले. 'नवा शिपाई' या कवितेत 'ब्राह्मण नाही, हिंदुही नाही, न मी एक पंथाचा' हे सांगून जाति–धर्म–पंथ यापलीकडे आपण असल्याची घोषणा त्यांनी केली. 'एका भारतीयाचे उद्गार' 'अंत्यजाचा मुलाचा पहिला प्रश्न', 'मजुरावर उपासमारीची पाळी' इत्यादी कवितांतून केशवसुतांच्या मनातील सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याकडे असलेले त्यांचे लक्ष्य आपल्या दृष्टीस येते.

केशवसुतानंतरच्या पिढीतील एक प्रमुख कवी 'बी' यांनीही ही सामाजिक जाणीव आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे. सबंध समाजाचे जीवन उदात्त होण्यासाठी सामाजिक व राजकीय या दोन्ही प्रकारच्या स्वातंत्र्याची आवश्यकता आहे या स्पष्ट मताचे 'बी' कवी होते. 'तीव्र जाणीव', 'भगवा झेंडा', 'डंका', 'गिरिगान', 'आशादेवी', 'आम्ही' वगैरे कवितांतून त्यांनी भारताच्या नव्या उमेदीचे बोल काढले आहेत. आजच्या समतेच्या महापर्वणीतूनही जगात मातीप्रमाणे जातीही नित्य रहावयाच्याच असे म्हणणाऱ्या धर्ममार्तंडांवर त्यांनी कठोर टीका केली आहे.

'बी'नंतरच्या पिढीतील एक प्रमुख कवी अनिल हे तर त्यांच्या मानवतावादाकरिता प्रसिद्धच आहेत. सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या कवितांतून अनिलांनी समता व बंधुत्व ह्यावर आधारलेल्या मानवतावादाचा आवेशपूर्ण पुरस्कार केला आहे. अनिलांची 'मानवता', 'भग्नमूर्ती' 'निर्वासित चिनी मुलास' ह्या कवितांतून व्यक्त होणारा सामाजिक आशय अत्यंत विशाल, भव्य व उदात्त आहे. तो मानवाला बंडासाठी आवाहन

करतो. विश्वक्रांतीची चेतावणी देतो, जगातील दैन्य, अन्याय व विषमता पाहून तो संतापाने पेटतो आणि जुनी, अन्यायी व विषमतेवर आधारलेली समाजरचना नेस्तनाबूत करावी असे विचार व्यक्त करतो.

अनिलानंतरच्या थोड्याच काळातल्या किंवा अनिलांच्याच पिढीतल्या कुसुमाग्रज त्यांच्याही कवितांतून दलितांसंबंधी त्यांना वाटत असलेली अपार सहानुभूती दिसून येते. 'आगगाडी व जमीन', 'बळी', 'लिलाव', 'बळीचे बलवंतास आव्हान' या कवितांमधून दलितांची चित्रे सामर्थ्यसंपन्न शब्दात कुसुमाग्रजांनी काढली आहेत.

दुसऱ्या महायुद्धोत्तर कालात जीवनाचे सगळे मोहरे बदलून गेले. मानवी जीवन आणि मानवता यांच्या उच्च उदार कल्पनांचा भ्रमनिरास झाला. माणसातले माणूसपण हिरावल्या गेले. या सगळ्यांचे पडसाद सर्व भाषातील काव्यातून कमीजास्त प्रमाणात उमटले, तसे ते मराठी कवितेतूनही उमटले. मर्ढेकरांनी दुसऱ्या महायुद्धानंतर मानवतेची जी दाण व निर्दय विटंबना झाली ती आपल्या काव्यात शब्दबद्ध केली आहे.

सारांश, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये वेळोवेळी जी विविध स्तरांवरची, विविध प्रकारची आंदोलने झाली त्याचे पडसाद सतत मराठी कवितेमध्ये उमटलेले आहेत. मराठी कवी वारंवार सामाजिक समस्यांना भिडलेले आहेत. मराठी साहित्य मध्यमवर्गाचे असून हा वर्ग स्वतःच्या जगापलीकडे पाहू इच्छित नाही हा आक्षेप चूक आहे.

अर्थात, मराठी साहित्यात स्वप्नरंजनात्मक साहित्य विपुल प्रमाणात आहे यात संशय नाही. मराठी वाङ्मयातून प्रामुख्याने मध्यमवर्गीय पांढरपेशा व्यक्तींचे जग चित्रित झाले आहे हेही काही खोटे नाही. व्यक्ती ज्या समाजात जन्मते, वाढते, जगते, आयुष्यात जे अनुभव त्याला रोज येतात त्याचे चित्रण त्याच्या साहित्यातून येणे अपरिहार्यच आहे. त्यामुळे त्यांच्या लिखाणातून स्वतःच्या मध्यमवर्गीय जीवनाचे चित्र आले. परंतु मराठी लेखक इथेच थांबलेले नाहीत, तर स्वतःच्या जगापलीकडचे देखील जे सामाजिक, राजकीय जीवन आहे त्याकडे मराठी कवींनी सतत आपली नजर टाकली आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी स्वतःच्या समाजाचे उदात्त दर्शन तर आपल्या काव्यातून केले आहेच. शिवाय आपल्या समाजाच्या बाहेरील जगाचेही अवलोकन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठी वाङ्मयाला मध्यमवर्गीय पांढरपेशी वाङ्मय म्हणून कितीही नाके मुरडली तरीही मराठी साहित्यातून सामाजिक जाणीव सतत व्यक्त होत आलेली आहे ही वस्तुस्थिती कुणी नाकारू शकत नाही.

अर्वाचीन मराठी साहित्याच्या निर्मितीकाळापासूनच आपल्याला ही जाणीव व्यक्त होताना दिसते. आगरकर, केशवसुत इ. चे वाङ्मय, हरिभाऊंच्या कादंबऱ्या, श्री. म. माटे यांचे 'उपेक्षितांचे अंतरंग', माडगूळकरांचे साहित्य, जयवंत दळवी यांचे 'चक्र', मधु मंगेश कर्णिक यांची 'माहीमची खाडी', अरविंद गोखले, श्री. दा. पानवलकर यांच्या कथा इत्यादी साहित्यातून विधवा, दलित, उपेक्षित, झोपडपट्टी, वेश्या इत्यादी समाजातील अनेक विविध घटकांना स्पर्श झालेला आहे. अलीकडचं उदाहरण श्री. बालकृष्ण मु. देसाई यांच्या 'नायक' ह्या कादंबरीचं देता येईल, फारच ताजे उदाहरण चंद्रपुरचे प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या 'हाकुमी' या कादंबरीचे देता येईल. ही कादंबरी आदिवासींच्या जीवनावर आहे. तेव्हा सामाजिक व दलित जाणीव मराठी साहित्याचा विषय ठरली नाही ह्या आरोपात फारसे तथ्य नाही. अर्वाचीन मराठीच्या प्रारंभकाळापासूनच दलित जाणीवेचे दर्शन आपल्याला होत आलेले आहे.

दलितांची दुःखे दलितेतरांना रंगविता येत नाहीत, दलितांच्या दुःखांशी दलितेतर समरस होऊ शकत नाही हा आक्षेप रास्तच आहे. खुद्द हे चित्र रंगविणाऱ्यांना देखील याची जाणीव असते. दलितांची दुःखे आपण कितीही समरसतेने रंगविली तरी प्रत्यक्ष दलितांइतका जिव्हाळा त्यात इतर लेखक उतरवू शकत नाहीत ह्याची जाणीव खुद्द अदलितांना किंवा दलित जाणीवेचे चित्रण करणाऱ्या दलितेतरांना असतेच.

ज्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव नाही ती कितीही प्रभावीपणे मांडली तरी त्यात हवा तो 'जिवंतपणा' येणारच कसा? जिवंत अनुभव आणि सहानुभूती यात फरक हा राहाणारच, मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाचे चित्र दलित वर्गाने रंगविले तर ते कितीसे परिणामकारक ठरेल? स्त्रीला बलात्कारानंतर होणाऱ्या वेदना व वाटणारा अपमान पुरुषांनी कितीही प्रभावीपणे वर्णिला तरीही बलात्कारित स्त्रीने रंगविलेल्या वर्णनापेक्षा ते अधिक जिवंत कसे ठरणार? त्यामुळे एखाद्या व्यक्तीला ज्या वेदनेचा अनुभव आला तो इतरांना न कळणे स्वाभाविकच. प्रत्यक्ष अनुभव नसताना देखील केवळ कल्पक सहानुभूतीच्या बळावर काही अदलितांनी दलितांच्या वेदना रंगविण्याचा प्रयत्न केला. त्यांची सहानुभूती उत्कट व प्रामाणिक नाही असे मात्र कुणी म्हणू शकणार नाही. कै. श्री. म. माटे यांना तर आद्य दलित साहित्यिकच मानण्यात येते. आजच्या दलित साहित्य चळवळीला अपेक्षित विश्लेषण व भाषा त्यांच्या साहित्यात नसेल परंतु अदलित लेखक पुरेशा अनुभूतीने दलित साहित्य नक्कीच निर्माण करू शकतो, ही गोष्ट माट्यांच्या उदाहरणावरून सिद्ध झालेली आहे. म्हणून दलितेतरांच्या दलित साहित्यात उत्कटता, जिवंतपणा दिसून येत नाही हा आक्षेप जरी मान्य केला तरी त्यांना आलेल्या अनुभवांशी व वाटत असलेल्या सहानुभूतीशी ते अप्रामाणिक आहेत असे मात्र कुणी म्हणू शकत नाही.

या उलट अदलितांचे विश्व दलित साहित्यात चित्रित झालेच तर ते त्यांच्यावर आगपाखड करण्यासाठीच असते. जात, वर्ण, रंग यांच्यापलीकडे जाऊन खरोखरीच माणसावरील अपरंपार प्रेमातून हे काव्य निर्माण झालेले आहे असे त्यामुळे वाटत नाही. दलितांपलीकडील विश्वाचे तर सोडाच परंतु स्वतःच्या दलित समाजाचे देखील उदात्त दर्शन घडेल अशी भूमिका देखील कुणी फारशी स्वीकारलेली दिसत नाही. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व सामाजिक न्याय या मूल्यांवर अधिष्ठित अशी नवी समाजव्यवस्थाही चित्रित करणारी कविता त्यात पूर्णपणे आढळत नाही.

दलित कवितेतून अगदी अपवादात्मक स्वरूपात दलित जाणीवे पलीकडील विश्व चित्रित झालेले दिसते,

"कोणाचाही वर्ग-वर्ण कळो नये
कोणी कोणालाच ओळखू नये
फक्त माणसंच माणसं म्हणून गळ्याला
पडावीत."

या लिंबाळ्यांच्या कवितेत मानवताधिष्ठित कविता, किंवा

"एका भीमनगरामध्ये दोन जयंत्या करताना
बाबासाहेबांच्या फोटोपुढे दारू पिऊन नाचताना
सिनेमाचे गाणे लावून डांगडिंग करताना
माझ्या मुठी माझ्याच विरुद्ध का वळतात?
माझे वैरी माझे जातभाईच का होतात?"

यासारख्या कवितेत समकालीन दलित समाजाचे चित्रण आढळते. शरणकुमार लिंबाळे यांची कविता केवळ नकार, निषेध यापेक्षा सूक्ष्म चिंतनाकडे वळलेली व अंतर्मुख अशी दिसते. निंबाळकरांच्या 'माय' सारख्या सुंदर कवितेतून आईबद्दल वाटणारी विश्वात्मक पातळीवरची जाणीव व्यक्त झालेली दिसते.

थोडक्यात, दलित कवितेतून नकार, संताप या व्यतिरिक्त देखील कविता आढळते. मात्र ती अतिशय अपवादात्मक स्वरूपात. जुन्या मराठी संतकवींच्या भक्तीपर काव्यातून ज्याप्रमाणे तत्कालीन घडामोडींचे उल्लेख परिश्रमपूर्वक शोधून काढावे लागतात. त्याप्रमाणे दलित कवितेतून हे अन्य निर्देश परिश्रमपूर्वक हुडकून काढावे लागतात.

हे असे का व्हावे? सामाजिक न्यायाच्या तत्त्वज्ञानाची क्रांतिकारक विचारसरणी मांडणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची उदात्त जीवनमूल्ये आणि सामाजिकमूल्ये यांचा वैपुल्याने आढळ दलित कवितेतून का होऊ नये? याचे उत्तर स्वतःच्या कवितेकडे 'काव्य' आणि त्यांना अभिप्रेत असलेल्या उज्ज्वल रम्योदात्त अशा भविष्यकाळाची सामुग्री म्हणून कुणी बघत नाही, असे तर नसावे? स्वतःची कविता म्हणजे सवर्णांशी खेळावयाच्या युद्धाचे शस्त्र आहे असे तरी प्रत्येक दलित कवीला खरोखरच वाटते

काय ? कविता लिहिणे म्हणजे आपल्या एकूण लढ्याचाच प्रमुख भाग आहे असे तरी दलितांना वाटते काय ? बहुतेक दलित काव्यातून दलित 'कवी 'पेक्षा दलित 'कार्यकर्तेच' आढळतात. दलितेतरांनी आपली ही कविता अतिशय लक्षपूर्वक वाचावी म्हणून लिहिलेली कैफियत, असाच रंग या कवितेला आला आहे की काय असे वाटते. असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहे. बाबासाहेबांनी साहित्यविषयक फार उदार भूमिका मांडली आहे. ते म्हणतात, "मला साहित्यिकांना आवर्जून सांगावयाचे आहे की उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिकमूल्ये यांचा आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कार करा. आपले लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती मर्यादित राखू नका, तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नापुरतीच बंदिस्त करू नका. तिचे तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असे प्रवर्तित करा. दलितांचे जग फार मोठे आहे, हे विसरू नका. त्यांचे दुःख, त्यांची व्यथा नीट समजावून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच खरी मानवता आहे." (नागपूर येथे १७ व १८ जाने. १९७६ रोजी भरलेल्या दलित साहित्य संमेलनाचे स्मरणिकेमधून, पृ. ८)

डॉ. आंबेडकरांच्या या साहित्यविषयक वैचारिक भूमिकेचा वैचारिक पाठपुरावा होत नाही असे दिसते. आपल्या पलीकडील सामाजिक संदर्भाचे सखोल अवलोकन होत नाही असे दिसते.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ एका विशिष्ट जातीजमातीपुरताच आपला विचार मर्यादित केलेला नाही. किंबहुना केवळ दलित संबोधनाला आज जो अर्थ प्राप्त झालेला आहे त्या व तेवढ्या दलितांसाठीच त्यांचा विचार नव्हता. तर दलितेतर आणि दलित यांना माणूस म्हणून एकत्र आणणाऱ्या राष्ट्रहिताचा विचार त्यांनी केलेला आहे. या पार्श्वभूमीवर दलित कवितेचा विचार केला तर बव्हंशाने ती माणूसपणाचा सार्वत्रिक हक्क मागणारी आहे असे वाटत नाही. दलितेतर व दलित यांचेकरिता एकाच राष्ट्रहिताचाही विचार ती करताना दिसत नाही. दलितपणाचा अर्थ केवळ "ब्राह्मणी" वारसा नाकारणे व आजपर्यंतच्या परंपरेला शिव्या देणे एवढाच होतो हे दलित कवीही मान्य करणार नाहीत. माणसाला माणूस म्हणून जगू देण्यासाठीच दलित साहित्य अवतरले आहे, अशीच प्रत्येक दलित लेखकाची धारणा आहे.

दलित कवींवर म्हणूनच जबाबदारी मोठी आहे. एक नवा इतिहास घडविण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये आहे, असे त्यांच्या साहित्यातून जाणवणे ही अपेक्षा आहे. अभिप्रेत असलेली नवी समाजव्यवस्था आपल्या साहित्यातून त्यांनी आता चितारली पाहिजे. चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजरचना बदलल्याखेरीज दुसरा कोणताही पर्याय नाही हे खरोखर मनोमन पटले असेल तर चातुर्वर्ण्यविरहित समाजरचनेचे स्पष्ट चित्र आता त्यांच्या कवितेतुन रेखाटल्या गेलेच पाहिजे. अगदी अलीकडे असे अपवादात्मक प्रयत्न होताना दिसत आहेत ज्योती लांजेवार, लिंबाळे ह्यांची नावे ह्या संदर्भात घ्यावी लागतील. दलित कवितेच्या या पुढे झेपावण्याच्या प्रवृत्तीचे स्वागतच करायला हवे.

दलित काव्याचे मराठी साहित्याला फार मोठे योगदान आहे. अन्याय, विषमता याबद्दल दलितांच्या भावना जेवढ्या विद्रोही स्वरूपात प्रकट झाल्या तेवढ्या मराठी साहित्यात त्या अगोदर निर्माणच झालेल्या नव्हत्या. त्यादृष्टीने मराठी वाङ्मयातून दृग्गोचर होणारे विद्रोह हे मूल्य मानणारे हे जग मराठी साहित्याकरिताच नव्हे तर जागतिक साहित्याच्या दृष्टीनेही नवीनच म्हणायला हवे.

जीवनाचा प्रवाह हा पुढेपुढेच जात असतो. या प्रवाहाबरोबर पुढेच सरकले पाहिजे. अन्यथा एकसुरी, कंटाळवाणे आणि विशिष्ट वर्तुळातच फिरणारे साहित्य म्हणून ते दुर्लक्षिल्या जाण्याचा धोका स्पष्टच दिसू लागला आहे. ■

बँक ऑफ महाराष्ट्र, लोहारा शाखा
एम्. इ. एल., जिल्हा : चंद्रपूर

दलित साहित्य : एक टिपण

: श्रीपाद गंगाधर कावळे

युगे युगे वेशीवर टांगलेल्यांचे मनोगत सांगणारे साहित्य प्रकर्षाने निर्माण होत आहे. त्याला कोणत्याच परंपरेचा कणा नाही. ते स्वयंभू आणि स्वतंत्र आहे. त्याला कोणत्याच प्रस्थापित कलागुणांचे कवच नाही. ते आपल्या पायावर उभे राहून आपले मनोगत सांगते आहे. सर्वतोपरीने स्वतंत्र आहे. पट त्यांनीच विणला आहे. किनार कशी असावी, लालित्य कुठवर असावे हा प्रश्न त्यांचा आहे. त्यांचाच असू द्या. पारंपारिक कलागुणांचे वर्चस्व ते मानतील की नाही ? या प्रश्नाचे कारणच नाही. त्यांना जे भावले, दिसले, त्याचीच तर प्रतिकृती त्यांच्या वाङ्मयात आढळणार. महापुरात सापडलेल्या होड्यांना दुरूनच दिशा दाखविणे कदापि उचित ठरणार नाही. त्यांच्याजवळ जे शब्द आहेत त्यावरच ते आपल्या वेदनांना शब्दरूप देतील.

आजवर जे प्रदेश उजाड पडले होते त्यावर त्यांनी बीजे पेरली आहेत. दुर्लक्षितावर लक्ष्य वेधून त्या प्रश्नांना वाचा फोडली आहे.

वाङ्मयीन इतिहासात आजवर तळागाळातील दुःखे टिपून घेण्याचे प्रयास संत व काही थोर मनाचे लेखक, यांनी केले असतील. परंतु, केवळ आणि संपूर्णतः दुःखालाच समर्पित साहित्य आज दलित लेखकच तेवढे लिहीत आहेत. त्या योगे संपूर्ण मराठी साहित्यात एक अमोल अशी भर पडली. त्याचे आगमन आणि स्थैर्यही अभिनंदनीय आहे.

दलित साहित्यात तोच तो पणा आहे. ही सहज प्रक्रिया आहे. तोच तो पणा केवळ दलित साहित्यातच आहे असे नव्हे. जोवर त्यांच्या दुःखाचे मूळ नष्ट होणार नाही, तोवर त्यांच्या साहित्यात वेदनेशिवाय वेगळे काय दिसणार. ज्यांना क्वचितच विकासाच्या सूर्याचे दर्शन होत असेल असे वर्ग दुसरे काय लिहितील ? असे काय त्यांना समाजानी पूर्वापार संचित दिले, की ते त्यावर भाष्य करतील ? पिचल्या गेलेल्या समाजाचे दृश्यरूप दर्शन आजच घडविणे हाच तर दलित साहित्याचा उत्कर्षबिंदू आहे. साहित्याने दुःखाला सतत वाचा फोडणे हा मानवी साहित्य असण्याचाच एक भाग आहे. यातच दलित साहित्याचे औचित्यही आहे.

बदलत्या परिस्थितीबरोबर साहित्यिक मूल्येही बदलतात. बदलायलाच हवीत. ज्यांच्या साहित्याचा आत्माच अन्याय आहे, त्याला शोषणाच्या व्यवस्थेची आलोचनात्मक बंधने कशी लागू शकतील. यावर खरे तर अधिक विचार न करणेच बरे. या साहित्यात आशयालाच प्रधानत्व आहे. रूपाला नाहीच. कारण या आशयाला स्वतःचे रूप होतेच कुठे ?

जोवर ही व्यवस्था स्थायी आहे, तोवर दलित साहित्याचे हे स्वरूपही तसेच राहणार. त्यात सामाजिक अवलोकन असेल, तोच कणखर आवाज असेल.

साहित्य हे जनहिताचे एक महान साधन आहे. उज्वल भविष्याचे स्वप्न आहे. जीवनच एक संघर्ष आहे, आणि आशय हा त्याचा व साहित्याचाही प्राण आहे. ■

२९९, शंकर नगर, नागपूर

गझलचे छंदशास्त्र : एक अभ्यास

आनंद आडे

[या प्रदीर्घ लेखाच्या पहिल्या भागातील काही मजकूर जा-फे-मा / ९० च्या अंकात प्रकाशित झालेला आहे. उर्वरित मजकुरापैकी काही भाग या अंकात प्रकाशित करीत आहोत. उर्वरित मजकूर व पुढील भाग यथावकाश प्रकाशित करीत आहोतच.]

(११) 'मुजतस' मुसम्मन सालिम — १६ वर्ण । २८ मात्रा

गण : मुस–तफअ–लुन्, – फा–इ ला तुन्, – मुस–तफअ–लुन, – फा–इ ला तु न्
वजन : गा गा ल गा, – गा ल गा गा – गा – गा ल गा; – गा ल गा गा
मात्रा : २ २ १ २, – २ १ २ २, – २ २ १ २, – २ १ २ २

(१२) 'मझारिअ' मुसम्मन सालिम — १६ वर्ण : २८ मात्रा

गण : म फा ई लु न्, फा अ ला तु न् – म फा ई लु न, फा अ ला तु न्
वजन : ल गा गा गा, गा ल गा गा, – ल गा गा गा, गा ल गा गा
मात्रा : १ २ २ २, २ १ २ २, – १ २ २ २, २ १ २ २

(१३) 'मुतकारिब' मुसम्मन सालिम — १२ वर्ण : २० मात्रा

गण : फ ऊ लु न् – ४ वेळा
वजन : ल गा गा – ४ वेळा
मात्रा : १ २ २

(१४) सरीअ मुसद्दस मतवी मोकूफ — १२ वर्ण : १८ मात्रा

गण : मु फ त इ लु न्, – मु फ त इ लु न् – फा इ ला न
वजन : गा ल ल गा गा ल ल गा गा ल गा ल
मात्रा २ १ १ २ २ १ १ २ २ १ २ १ (हा १ ला प्रकार)

(२) मु स त फ इ लु न, मुसतफइलुन, म फ ऊ ला तु
वजन : गा गा ल गा, गा गा ल गा, गा गा गा ल
मात्रा : २ २ १ २, २ २ १ २, २ २ २ १
} १२ वर्ण २१ मात्रा हा २ रा प्रकार

(१५) 'खफीफ' मुसद्दस सालिम — १२ वर्ण । २१ मात्रा

गण : फा इ ला तुन्, मु स त फ अ लु न्, फा इ ला तु न
वजन : गा ल गा गा, गा गा ल गा गा ल गा गा
मात्रा : २ १ २ २, २ २ १ २, २ १ २ २

(१६) 'करीब' मुसद्दस सालिम — १२ वर्ण : २१ मात्रा

गण : म फा ई लु न्– म फा ई लु न्,– फा इ ला तु न्
वजन : ल गा गा गा,– ल गा गा गा,– गा ल गा गा
मात्रा : १ २ २ २,– १ २ २ २,– २ १ २ २

(१७) 'जदीद' मुसद्दस सालिम — १२ वर्ण २१ मात्रा

गण : फा अ ला तु न्– फा अ ला तु न्,– मु स् त् फ इ लु न्

वजन : गा ल गा गा,– गा ल गा गा,– गा ल गा गा

उदा. (i) या फुलांनी छेडिली रानात गाणी
का गडे आलीस तू ह्याही ठिकाणी* (सुरेश भट)

उदा. (ii) प्रीत ही आली फुलांच्या पावलांनी
हाय मी चिंब्यात माझ्या चूर होतो* (सुरेश भट)

उदा. (iii) डाव सारे जिंकले तू एकट्याने
राहुनी गेली कशी माझी उधारी (संगीता जोशी)

(१८) 'मुतवारिक' मुसम्मन सालिम — १२ वर्ण : २० मात्रा

गण : फा इ लु न– ४ वेळा

वजन : गा ल गा– ४ वेळा

मात्रा : २ १ २

(१९) 'मशाकिल' मुसद्दस मकफूफ मकसूर — १२ वर्ण : १८ मात्रा

गण : फाइलात, मफाईल, मफाईल

वजन : गा ल गा ल, ल गा गाल, ल गा गा ल

२ १ २ १, १ २ २ १, १ २ २ १,

(ii) मुशाकिल मुसद्दस सालिम — १२ वर्ण : २१ मात्रा

गण : फाइलातुन्,– मफाईलन्– मफाईलन्

वजन : गा ल गा गा, ल गा गा गा, ल गा गा गा

मात्रा : २ १ २ २ १ २ २ २ १ २ २ २

विकारामुळे बदललेले गणबिम्ब : गाण विभाग, शब्दात फेरफार केला तर नवीन तयार होतात. झिहाफ मुळे गणविभागात विकृती निर्माण होऊन नवीन विकार तयार होतात. झिहाफमुळे छंदात बदल घडून येतो. मूळ दहा सालिम गण आहेत. झिहाफमुळे या सालिम गणापासून नवीन गणनिम्ब तयार झाले आहेत. 'झिहाफ'चा अर्थ होतो की नेम चुकणे. म्हणजे जागा चुकणे असा होतो. आणि 'सालिम'चा अर्थ होतो; 'परिपूर्ण'– 'तंदुरस्त' असणे.

(१)	फऊलुन	हा मुतकारिब छंदाचा सालिम गण आहे.
	फऊ + लुन्	हा एक वतद आणि दोन सबब मिळून बनला आहे. विकारामुळे या
	लगा + गा	पासून खाली दर्शविल्याप्रमाणे विकृत गण तयार झाले आहेत.

मुतकारिब हा छंद गझल आणि मस्नवीसाठी उर्दूमध्ये प्रचलित आहे. येथे एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. ती म्हणजे 'अ' इ ल, लु च्या वजनात–मात्रेत फरक नाही.

(i) मुतकारिब मुसम्मन सालिम — १२ वर्ण २१ मात्रा असतात.

गण : फऊ लुन– ४ वेळा

वजन : लगा–गा– ४ वेळा

(ii) मुसम्मन मुसब्बग (उपछंद) यात १३ वर्ण : २१ मात्रा असतात

गण : फ ऊ लु न्– फ ऊ लु न्,– फ ऊ लु न,– फ ऊ ला न्

वजन : ल गा गा– ल गा गा,– ल गा गा– ल गा गा ल

(iii) मुसम्मन मकसर् यात १२ वर्ण १९ मात्रा असतात.

गण : फ ऊ ल न्– फ ऊ ल न– फ ऊ ल न– फ ऊ ल्

वजन : ल गा गा ल गा गा, ल गा गा– ल गा ल

(४) मुसम्मन महझूफ, यात ११ वर्ण १८ मात्रा असतात.

गण : फ ऊ ल न् फ ऊ ल न्,– फ ऊ ल न – फ अ ल्

वजन : ल गा गा, – ल गा गा,– ल गा गा – लगा

(५) मुसम्मन असलम यात ११ वर्ण १९ मात्रा असतात

(I) गण : फ ऊ लु न्– फ ऊ ल न्– फ अ ल न्– फ ऊ ल न् | हा पहिला
वजन : ल गा गा – ल गा गा– गा गा– ल गा गा | प्रकार

(II) फ अ ल न् = गा गा– ४ वेळा यात ८ वर्ण १६ मात्रा असतात | हा दुसरा प्रकार

(६) मुसम्मन असरम् यात १० वर्ण १६ मात्रा असतात

गण : फ अ लु– फ ऊ ल न्–; फ अ लु– फ ऊ ल न्

वजन : ल गा– ल गा गा–; ल गा– ल गा गा.

(७) मुस्समन असरम् महझूफ मकसूर

(१) गण : फा अ– फ ऊ ल न,– फाअ– फ ऊ ल
वजन : गा ल– ल गा गा, – गाल– ल गा गा १० वर्ण १५ मात्रा

(२) गण : फा अ– फ ऊ ल न्,– फाअ– फ अ ल
वजन : गाल– ल गा गा,– गाल– लगा– ९ वर्ण १४ मात्रा

(८) मुसम्मन मकबूझ असलम्

गण : फ ऊ लु– फ ऊ ल न्– फ ऊ लु– फ उ ल न्

प्रकार (१) ल गा ल– ल ल गा ल ल गा ल– ल ल गा– १२ वर्ण १६ मात्रा

प्रकार (२) ल गा ल– गा गा ल गा ल– गा गा १० वर्ण १६ मात्रा

(९) सालिम शांझदा रुकनी– ही ४८ अक्षरं आणि ८० मात्रांची बहर आहे.

गण : फ ऊ ल न– ४ वेळा } २० मात्रा
गण : फ ऊ ल न– ४ वेळा } १२ वर्ण
वजन : ल गा गा– ४ वेळा } २० मात्रा
वजन : ल गा गा– ४ वेळा } १२ वर्ण

या छंदाची एक पंक्ति झाली म्हणजे ४८ अक्षरं आणि ८० मात्रांचा शेर बनतो. तसेच याहून निम्म्या म्हणजे २४ अक्षर आणि ४० मात्रांचा सुद्धा शेर रचता येतो.

(१०) मकबूझ असलम शांझदा रुकनी. यात २० वर्ण ३२ मात्रा असतात.

गण : फ अ ल– फ ऊ ल न– फ अ ल– फ ऊ ल न }
फ अ ल– फ ऊ ल न– फ अ ल– फ ऊ ल न }

वजन : ल गा ल गा गा ल गा ल गा गा } २० वर्ण
ल गा ल गा गा ल गा ल गा गा } ३२ मात्रा

(११) मकबूझ असलम शांझदा रुकनी, यात २० वर्ण ३२ मात्रा असतात.

गण : फ ऊ ल न– फ अ लु न् फ ऊ ल– फ अ लुन्
" " " २० वर्ण
वजन : ल गा ल, गा गा,– लगाल, गा गा (दोन वेळा)– ३२ मात्रा

(१२) मुसद्दस सालिम (षटपदी) यात ९ वर्ण १५ मात्रा असतात.

गण : फ ऊ ल न,– फ ऊ ल न– फ ऊ ल न

वजन : ल गा गा,– ल गा गा,– ल गा गा

(१३) मुसद्दम मुसब्बग : १० वर्ण १६ मात्रा असतात.

गण : फ ऊ ल न्– फ ऊ ल न– फ ऊ ला न्

वजन : ल गा गा– ल गा गा– ल गा गा ल

(१४) मुसद्दम मकस्र

गण : फ ऊ ल न्, फ ऊ ल न्, फ ऊ ल. ९ वर्ण

वजन : ल गा गा, ल गा गा, ल गा ल १४ मात्रा

(१५) मुसद्दस महझूफ

गण : फ ऊ ल न, फ ऊ ल न, फ अ ल. ८ वर्ण

वजन : ल गा गा, ल गा गा, ल गा. १३ मात्रा

(१६) मुसद्दस अस्ल्म महझूफ सर्बे अबतर

गण : फ ऊ ल न्,– फ ऊ ल न्– फ अ. ७ वर्ण

वजन : ल गा गा,– ल गा गा,– गा. १२ मात्रा

(१७) मुरब्बअ सालिम

गण : फऊलन्, फ ऊ ल न् ६ वर्ण

वजन : ल गा गा,– ल गा गा १० मात्रा

(१८) मुरब्बअ मकस्र

गण : फ ऊ ल न्– फ ऊ ल ६ वर्ण

वजन : ल गा गा– ल गा ल ९ मात्रा

(२) फाइलुन् :	ह्या मुतदारिक छंदाचा सालिम गण आहे.
फा + इलुन्	ह्या एक सबब व एक वतद मिळून बनला आहे.
गा – ल गा.	या सालिम गणाचे खाली दर्शविल्या प्रमाणे विकृत गण आहेत.

(१) फइलुन् (२) फअलुन् (३) फअल (४) फअ् (५) फाइलान् (६) फाइलान (७) फअलान (८) फाइलातुन्.

मुत्दारिक छंद : ह्या छंद उर्दूत प्रचलित आहे. परंतु शांझदा रुकनीत विपुल प्रमाणात गझला लिहिण्यात आलया आहेत. या छंदात मखबून मकतूअच्या उपयोगाला उचित मानले आहे. या छंदाचे उप छंद खाली दर्शविल्याप्रमाणे आहेत.

(१) मुत्दारिक मुसम्मन सालिम आणि शांझदा रुकनी

गण : फाइलन्– फाइलन् फाइलन् फाइलन (दोन वेळा) २४ वर्ण

वजन : गा ल गा,– गा ल गा,– गा ल गा,– गा ल गा (दोन वेळा) ४० मात्रा

(२) मुसम्मन मखबून

गण : फअलुन– फइलुन,– फइलुन– फइलुन ८ वर्ण

वजन : गा गा– गा गा,– गा गा– गा गा १६ मात्रा

(३) मुसम्मन मकतूअ किंवा मखबून मसकन

गण : फ अ लु न— ४ वेळा १२ वर्ण

वजन : ल ल गा— ४ वेळा १६ मात्रा

(४) मुसम्मन मशाल

गण : फाइलन्— ४ वेळा १२ वर्ण

वजन : गा ल गा,— ४ वेळा २० मात्रा

(५) मुसम्मन मखलुअ

गण : फाइलन्– फअल– फाइलन्– फअल १० वर्ण

वजन : गा ल गा,– लगा– गालगा– लगा १६ मात्रा

(६) मकतूअ, मखलुअ

गण : फअलुन्– फअल– फअलुन्– फअल ८ वर्ण

वजन : गा गा, ल गा,– गा गा, ल गा १४ मात्रा

(७) मुसम्मन अख्रम

गण : फाइलन्– फअलुन्– फाइलन्– फअ १० वर्ण

वजन : गा ल गा गा ल गा गा ल गा गा १७ मात्रा

(८) मुसम्मन मखबून शांझदा रुकनी

गण : फअलुन्– फअलुन्– फअलुन्– फअलुन् (दोन वेळा)

किंवा

गण : फइलन्– फइलन्– फइलन् (दोन वेळा) १६ वर्ण

वजन : गा गा– गा गा– गा गा (दोन वेळा) ३२ मात्रा

(९) मुसम्मन मकतूअ

गण : फउलन् फउलन्– फउलन् फउलन् (दोन वेळा) २४ वर्ण

वजन : ल ल गा– ल ल गा– ल ल गा– ल ल गा (दोन वेळा) ३२ मात्रा

(३) मफाइलतुन : मफा + इल + तुन् अथवा मफा + इलतुन् ल गा – ल ल गा	हा वाफिर छंदाचा सालिम गण आहे, जो एक वतद आणि दोन सबब मिळून बनलेला आहे. विकारामुळे यातून खाली दर्शविल्या प्रमाणे विकृत गण तयार होतात. (१) मफाइलुन् (२) मफाईलुन (३) मफाइल (४) फऊलुन् (५) मुफतइलुन (६) मफऊलुन् (७) फाइलुन (८) मफऊल

वाफिर छंद : हा छंद आणि याचे उप छंद उर्दूत तितकासा प्रचलित नाही. अरब कवींनी याला मुसद्दस मानले आहे. तर फारसी कवींनी मुसम्मन म्हणून गणना केली आहे. याचे अनुकरण उर्दूत दिसून येते.

(१) वाफिर मुसम्मन सालिम छंद. यात २० वर्ण, २८ मात्रा असतात.

गण : मफा– इलतुन्, मफाइल्-तुन्– मुफाइलतुन्– मुफाइलतुन्

वजन : लगा– ल ल गा,– लगाललगा,– लगाललगा,– लगाललगा

मात्रा : १ २ १ १ २,– १ २ १ १ २,– १ २ १ १ २

(२) मुसम्मन् मअसूब छंद. यात १९ वर्ण २९ मात्रा असतात.

गण : मफाइलतुन्– मफाईलतुन्– मफाइलतुन्– मफाईलुन्

वजन : ल गा ल ल गा,– ल गा गा ल गा,– ल गा ल ल गा– ल गा गा गा = १९ वर्ण

मात्रा : १ २ १ १ २,– १ २ २ १ २,– १ २ १ १ २,– १ २ २ २ = २९ मात्रा

(३) मुसम्मन् मअसूब छंदाचा २ रा प्रकार. | यात १८ वर्ण २८ मात्रा असतात.

गण : मफाईलुन्– मफाइलतुन (दोन वेळा)

वजन : ल गा गा गा,– ल गा ल ल गा (दोन वेळा)

(४) मुसम्मन् मअकूल रुक्न सानी | यात १८ वर्ण २६ मात्रा असतात.
गण : मफा इल तन्– मफाइलुन् (दोन वेळा)
वजन : ल गा ल ल गा,– ल गा ल गा (दोन वेळा) = १८ वर्ण
मात्रा : १ २ १ १ २,– १ २ १ २ = (१३ मात्रा) दोन वेळा = २६ मात्रा

(५) मुसम्मन् मअकूल रुक्न अव्वल. | यात १८ वर्ण २६ मात्रा असतात.
गण : मफाइलन्,– म फा इ ल तुन् (दोन वेळा)
वजन : ल गा ल गा,– ल गा ल ल गा (दोन वेळा) = १८ वर्ण
मात्रा : १ २ १ २,– १ २ १ १ २ = १३ (दोन वेळा) = २६ मात्रा

(६) मुसम्मन अमसब मअसूब. | यात १६ वर्ण २६ मात्रा असतात.
गण : मुफत्अलन्,– मफाईलन्,– मुफत्अलन्– मफाईलन्
वजन : ल गा ल गा,– ल गा गा गा,– ल गा ल गा,– ल गा गा गा.

(७) मुसद्दस सालिम. | यात १५ वर्ण २१ मात्रा असतात.
गण : म फा इ ल तुन्– (३ वेळा)
वजन : ल गा ल ल गा– (३ वेळा)

(८) मुसम्मन मअसूब. | यात १४ वर्ण, २१ मात्रा असतात.
गण : मफाइलतुन्– मफाइलतुन्– मफाईलन्
वजन : ल गा ल ल गा,– ल गा ल ल गा,– ल गा गा गा = १४ वर्ण

(९) मुसम्मन मअसूब मकातून. | यात १२ वर्ण १९ मात्रा असतात.
गण : मफाइलतुन,– मफाईलुन्,– फऊलन्
वजन : ल गा ल ल गा,– ल गा गा गा,– ल गा गा. = १२ वर्ण
मात्रा : १ २ १ १ २,– १ २ २ २,– १ २ २. = १९ मात्रा

(१०) मुसम्मन अकसम्. | यात १३ वर्ण, २० मात्रा असतात.
गण : मफाइलतन,– म फा अ ल त न्– मफऊलन्
वजन– ल गा ल ल गा,– ल गा ल ल गा,– गा गा गा = १३ वर्ण
मात्रा : १ २ १ १ २,– १ २ १ १ २,– २ २ २ = २० मात्रा

(४) मफाइलुन् गण :
मफा + ई + लुन्
लगा – गा – गा.

हा 'हझज' छंदाचा सालिम गण आहे. हा गण एक वतद आणि दोन सबब मिळून बनला आहे. विकारामुळे याचे खाली दर्शविल्याप्रमाणे विकृत गण बनले आहेत.

(१) मफाइलुन (२) मफाईलुन् (२) मफाईलुन् (३) मफऊलुन (४) मफऊल (५) मफऊल् (६) फाइलुन (७) मफाईल (८) फऊलुन (९) फऊलो (१०) फअल (११) फाअ् (१२) फअ् (१३) मफाइलान (१४) मफाईलान (१५) मफऊलान (१६) फाईलान् (१७) फऊलान्

(४) 'हझज' छंद : उर्दू, गुजरातीमध्ये हा छंद व त्याचे पोटछंद प्रचलित आहे. खाली नमूद केलेले तसेच असेच अन्य गणांच्या फेरफारला शास्त्रकारांनी उचित मानले आहे. कवींनी याचा उपयोग केला आहे. शेरमध्ये जरी एका ठिकाणी मफाईलु व दुसऱ्या ठिकाणी मफाउलन् आले तरी मात्रा सारख्याच असतात. अलवत लय आवश्यक आहे. शिवाय मफाईलु व फऊलन् आले तरी सुद्धा मात्रा सारख्याच राहतात, आणि लयासाठी मफऊलु– मफइन– ला 'मफऊलन– मफइलन–मफाइलन् केले. तरी त्याच्या संयोगाला योग्य समजण्यात येते. या 'हझज' छंदाचे १९ उपछंद आहेत. येथे निवडक उपछंदाचा परिचय दिला आहे.

या 'हृझज' छंदाचे २९ उपछंद आहेत. येथे निवडक उपछंदांचा परिचय दिला आहे.

(१) मुसम्मन सालिम : या छंदात १६ वर्ण, २८ मात्रा असतात.
गण : मफाईलुन्– ४ वेळा
वजन : ल गा गा गा– (४ वेळा) = १६ वर्ण
मात्रा : १ २ २ २ – (४ वेळा) = २८ मात्रा

उदा : अता मागून मी माझ्या मनाला सांगतो आहे.
अरे, तो आपला होता ! अरे, तो आपला होता. (सुरेश भट)

(२) मुसम्मन मुसब्बग : या छंदात १७ वर्ण २९ मात्रा असतात.
गण : मफाईलुन्– मफाईलुन्, मफाईलुन्, मफाईलान.
वजन : ल गा गा गा, ल गा गा गा, – ल गा गा गा, ल गा गा गा ल = १७ वर्ण
मात्रा : १ २ २ २, १ २ २ २; १ २ २ २, १ २ २ २ १ = २९ मात्रा

(३) उपरोक्त दोन्ही पोटछंदाच्या संयोगाने शेर बनू शकतो.

(४) मुसम्मन मकबूझ छंद. यात १६ वर्ण, २४ मात्रा असतात.
गण : मफाइलन्– ४ वेळा
वजन : ल गा ल गा– ४ वेळा

उदा. : इसीलिए खडा रहा कि तुम मुझे पुकारलो
जमीन है न बोलती न आसमान बोलता (श्री. हरिवंशराय बच्चन)

(५) मुसम्मन बसुरत मुसब्बग छंद. यात १७ वर्ण, २५ मात्रा असतात.
गण : मफाइलन् – मफाइलन्– मफाइलन्– मफाइलान्
वजन : ल गा ल गा, ल गा ल गा,– ल गा ल गा – लगालगाल = १७ वर्ण
मात्रा : १ २ १ २; १ २ १ २,– १ २ १ २, – १ २ १ २ १ = २५ मात्रा

टीप : उपरोक्त दोन्ही पोटछंदाच्या संयोगाने शेर बनतो किंवा स्वतंत्रपणे सुद्धा बनतो.

(६) मुसम्मन बसूरत मकबूझ छंद. यात १६ वर्ण, २६ मात्रा असतात.
गण : मफाइलन्– मफाईलन्,– मफाइलन– मफाईलन्
वजन : ल गा ल गा,– ल गा गा गा,– ल गा ल गा– ल गा गा गा = १६ वर्ण
मात्रा : १ २ १ २ – १ २ १ २ – १ २ १ २ १ २ २ २ = २६ मात्रा

(७) दुसरा प्रकार : यात १६ वर्ण, २६ मात्रा असतात.
गण : मफाईलन्– मफाइलन्,– मफाईलन्– मफाइलन्
वजन : ल गा गा गा,– ल गा ल गा– ल गा गा गा ल गा ल गा = १६ वर्ण
मात्रा : १ २ २ २ – १ २ १ २– १ २ २ २ १ २ १ २ = २६ मात्रा

(८) मुसम्मन अश्तर मकबूझ् छंद. यात १४ वर्ण, २२ मात्रा असतात.
गण : फाइलन्– मफाइलन्– फाइलन्– मफाइलन्
वजन : गा ल गा, ल गा ल गा,– गा ल गा,– ल गा ल गा

(९) मुसम्मन अखरब मकफूफ अहतम छंद. १४ वर्ण २० मात्रा
गण : मफऊलु– मफाइल– मफाईल– फअल
वजन : गा गा ल– ल गा गाल– ल गा गा ल– लमा–

(१०) मुसम्मन अखरब मकफूफ अबतर छंद. १२ वर्ण, २० मात्रा
गण : मफऊलु– मफाईलु– मफाईलन्– फअ
वजन : गा गा ल,– ल गा गा ल,– गा

(११) हजज मुसद्दस सालिम छंद. यात १२ वर्ण २१ मात्रा असतात.
गण : मफाईलन्– (३ वेळा)
वजन : ल गा गा गा– (३ वेळा)

(१२) मुसद्दस मकफूफ महजूफ छंद : यात ११ वर्ण, १७ मात्रा असतात.
गण–मफाईलु–मफाईलु–फऊलन.
वजन–लगागाल,–लगा गाल,–लगागा

(१३) हजज मुसद्दस महजूफ छंद : यात ११ वर्ण १९ मात्रा असतात.
गण–मफाईलन्–मफाईलन,–फऊलन्
वजन–ल गा गा गा, लगागागा, ल गा गा

(५) मुसत्फइलुन् गण : हा रजज म्हणजे रिजज छंदाचा सालिम गण आहे. हा दोन सबब आणि एक वतद् मिळून बनला आहे आणि याचे खालीप्रमाणे विकृत रूप बनले आहेत.

मुस + तफ + इलुन्
गा–गा–लगा : (१) मफाइलुन्, (२) मुफतइलुन, (३) मफऊलुन्, (४) फअलुन्; (५) फऊलुन, (६) फअलतुन, (७) फाइलुन्, (८) फाअ्, (९) फअ्. (१०) मुस्तफईलान्; (११) मुफाइलान्, (१२) मुफ्तइलान्, (१३) फाईलान, (१४) फइलतान (१५) मुस्तफईलातुन् (१६) मफऊलान्, (१५) मफऊलान्.

(५) रजज छंद : हा उर्दूमधील प्रचलित छंद आहे. याचा मुसम्मन सालिम २८ मात्रांचा छंद हरिगीत सारखा आहे, ज्या गणात अंत्य गुरु येत आहे अशाच उपछंदांचा परिचय करून दिला आहे.

(१) रजजम मुसम्मन सालिम छंद. यात १६ वर्ण २८ मात्रा असतात.
गण–मुस तफ इलुन्–(४ वेळा)
वजन–गा गा ल गा–(४ वेळा)

(२) मुसम्मन मकतूअ छंदाचा दुसरा प्रकार; १५ वर्ण, २७ मात्रा.
गण–मुस तफ इलुन्–मुसतफ इलुन्–मुसतफ इलुन–मफऊलन्
वजन–गा गा ल गा, गा गा लगा. गा गा ल गा, गा गा गा.

(३) मुसम्मन मतवी छंद. यात १६ वर्ण, २४ मात्रा असतात.
गण–मुफतइलुन्–(४ वेळा)
वजन–गा ल ल गा–(४ वेळा)

(४) मुसम्मन मतवी मखबून–या छंदात १६ वर्ण, २४ मात्रा असतात.
गण–मुफत इलन्–मुफाइलन्–मुफतइलुन्–मफाइलन्
वजन–ल गा ल गा,–ल गा ल गा,–गा ल ल गा–ल गा ल गा

(५) मुसम्मन मखबून मतवी. या छंदात १६ वर्ण २४ मात्रा असतात.
गण–मफाइलन्,–मफाइलन्,म–फाइलन्,–मफतइलन्
वजन–ल गा ल गा – ल गा ल गा, ल गा ल गा–गा ल ल गा

(६) मुसम्मन मतवी मखबून मकतूअ्, या छंदात १५ वर्ण; २४ मात्रा असतात.
गण-मु फ त इ ल न्-मफाइलन्-मुफतइलन्-मफऊलन्
वजन-गा ल ल गा, ल गा ल गा, गा ल ल गा, गा गा गा

(७) मुसम्मन मखबून मरफल, या छंदात २० वर्ण, ३२ मात्रा असतात.
गण-म फा इ ला तु न् - म फा इ ला तुन् - म फा इ ला तु न्-म फा इ ला तुन्
वजन-ल गा ल गा गा,-ल गा ल गा गा,-ल गा ल गा गा,-ल गा ल गा गा
उदा.-सुन्या सुन्या मैफलीत माझ्या, तुझेच मी गीत गात आहे.
अजून ही वाटते मला की, अजून ही चांद रात आहे. (सुरेश भट)

(८) मुसम्मन मतवी मरफल, या छंदात २० वर्ण ३२ मात्रा असतात.
गण-मुफत इ ला त न्-मु फ त इ ला त न् (डबल)
वजन-गा ल ल गा गा,-गा ल ल गा गा (डबल) २० वर्ण
मात्रा-२ १ १ २ २,-२ १ १ २ २ (डबल) ३२ मात्रा

(९) मुसद्दस सालिम : या छंदात १२ वर्ण २१ मात्रा असतात.
गण-मु स त फ इ ल न-(३ वेळा)
वजन-गा गा ल गा-(३ वेळा)

(१०) मुसद्दस मकतूअ्-या छंदात ११ वर्ण २० मात्रा असतात.
गण-मुसतफइलन्, मुसतफ इलन्-मुफऊलन्
वजन-गा गा ल गा,-गा गा ल गा-गा गा गा

(११) मुसद्दस मुतवी : या छंदात १२ वर्ण, १८ मात्रा असतात,
गण-मु फ त इ ल न्-(३ वेळा)
वजत-गा ल ल गा-(३ वेळा)

(१२) मुसद्दस मतवी मरफुअ : या छंदात ११ वर्ण १७ मात्रा असतात.
गण-मुफतइलन्, मुफत इलन्, फाइलन्
वजन-गा ल ल गा, गा ल ल गा, गा ल गा

(१३) मुरब्बअ् मतवी मरफल : या छंदात १० वर्ण १६ मात्रा असतात.
गण-मुफतइलातन्-मुफत इलान
वजन-गा ल ल गा गा, गा ल ल गा गा

(६) फइलातुन् गण : हा 'रमल' छंदाचा सालिम गण आहे.
फा + इला + तुन-हा एक सबब, एक वतद आणि सबब मिळून बनलेला आहे.
गा-ल गा-गा

(६) 'रमल' छंद : हा छंद उर्दू शायरीत फार प्रचलित आहे. फइलात, फइलून्, फइलुन् फाऊलान आणि फाईलातुन्' या गणांचा आवश्यकतेनुसार प्रत्येक ठिकाणी 'मफऊलन 'सारखा वापर करता येतो. कारण 'फाइलातुन'ला 'फाअलातुन 'सारखा उपयोग केल्यास वजन आणि मात्रेच्या बाबतीत सारखेच असल्याने प्रमाणभूत गणण्यात आले आहेत. २९ छंदांपैकी मराठी गझलसाठी आवश्यक असलेले मोजकेच उपछंद येथे दिले आहेत.

(१) रमल मुसम्मन सालिम : या छंदात १६ वर्ण, २८ मात्रा असतात.
गण-फाअलातुन्-४ वेळा
वजन-गा ल गा गा-४ वेळा-१६ वर्ण
मा - २ १ २ २ - ४ वेळा २८ मात्रा

उदा. : ती कुणाची झुंज होती ? तो कसा जोहार होता ?
जो निखारा वेचला मी तो निखारा गार होता. (सुरेश भट)

(२) मुसम्मन मखबून

गण–फाअलातुन्–फइलातुन्–फइलातुन् फइलातुन.

वजन–गा ल गा गा–ल ल गा गा–ल ल गा गा–ल ल गा गा = २५ मात्रा

फ इ ला तुन् फइलातुन् फइलातुन् फइलातुन्

ल ल गा गा; ल ल गा गा, ल ल गा गा – ल ल गा गा = २४ मात्रा

(३) मुसम्मन मखबून महज़्फ : या छंदात १५ वर्ण २३ मात्रा असतात.

गण–फाअलातुन–फइलातुन–फइलातुन–फअलून्

वउन–गा ल गा गा–ल ल गा गा–ल ल गा गा–ल ल गा

(४) मुसम्मन मखबून अबतर, या छंदात १५ वर्ण २३ मात्रा असतात.

फा अ ला तु न् – फ इ ला तु न् – फ इ ला तु न् – फ उ लु न्

गा ल गा गा, ल ल गा गा, ल ल गा गा, ल ल गा

(पुढील अंकी)

‘ युगवाणी ’ मिळत नाही !

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. आपणाकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या तीन महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, **प्रथम** आपल्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा–लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया काळजी घ्यावी, शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा, संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- आपली वर्गणी संपलेली नाही ना ? आपले नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या यादीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद / वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

डॉ. आंबेडकरांच्या स्मृतीस

काय ! ते कुणीच नव्हते ?
स्वराज्याची पालखी डोहारायला
त्यांचे हात लागलेच नव्हते ?
बुरुजबंद किल्ल्याच्या महाद्वारावर
मशाली घेऊन शत्रूवर झेपावले नव्हते ?
त्यांनीच तर सांभाळले स्वराज्य पाठीवर
ओढलेत रणगाडे
वज्रझेल झेलीत छातीवर
वज्रगडच्या किल्ल्यावर
मुरारला जोहार देत तेच तर होते
तुम्हाला ठाऊक नसेल,
इतिहासाला ठाऊक आहे
काय ते आपले कुणीच नव्हते ?

केव्हढे दुर्दम्य
ज्यांनी जोपासलेत बहर कुंपणे होऊन
शाकारली जमीन नांगर होऊन
आम्ही काय दिले, काहीच दिले नाही
आम्ही दिलेत अंधारवाडे गावच्या वेशीवर
त्यांनीच तर तळागाळात राहून
जोपासल्यात शिंपा
आम्ही डोहारल्यात नावा समुद्रपृष्ठावर

बघवले नाही !
आपण आलात
उभारले बंड
खंडितांच्या फौजा घेऊन
उध्वस्त व्यवस्थेला उभार देत

भेदाच्या अभेद्य भिंतींना तडे देत
प्रारब्ध नियतीच्या अधान्तरावर
हेलकावे घेत जगणाऱ्यांना
स्वाधीनतेचे अर्थ देत

कुणी दिले असते ?
काळोखदऱ्यातल्या विकलांग लतावृक्षांना
प्रकाशाचे वरदान
मांडली असती कैफियत
कुणी दिले असते
कृतीचे सिद्ध हात
निवळले नसते
क्षितिजाच्या डोळ्यातले काजळ
माणुसकीचे अर्थ
कुणी सांगितले असते ?
अंधाराला प्रकाशाचे डोळे मिळाले नसते–

श्रीपाद गंगाधर कावळे

काचघरातील जिवंत माणसे

आता मात्र,
ही काचघरातील जिवंत माणसे
तुम्हाला शरण येणार नाहीत.
किंवा
लेण्यातुन बुद्धही बाहेर येईल असे नाही

ही प्रचंड भित
आजि या शहराचे दिशाहीन रस्ते
या पलीकडे मी जाऊ शकत नाही.

आता कुठलाहि ऋतु
मला गोंजारू शकत नाही.
कारण माझे ऋतुच मी शत्रु केलेत.

ज्यांच्या श्वासावर मी पेटावं
असा एकही रक्ताचा उसासा नाही.
ज्यांच्यासाठी आयुष्यभर गहाण रहावं
असे एकही जिवंत प्रेत नाही.

तसा
हा ऋतु वेगळा पावसाचा नाही.
जलश्याचा नाही.
जातिविहीन व्यवस्थेचा नाही.

आम्ही सर्वच ऋतुचे बळी आहोत.
आम्ही सर्वच व्यवस्थेचे बळी आहोत.

कुणाला दोष दिल्याने
आपण दोषी नाही हे सिद्ध करता येत नाही.

कारण
मीच माझ्या दु:खाचा प्रवाही होतो

दु:ख
मी कधीच न भोगलेले एक काल्पनिक सत्य.
ही प्रचंड भित
अन् जिवंत भितीतील उसासे.

आता मात्र रहावत नाही
आम्ही काचघरातील उद्ध्वस्त अवशेषातील
जिवंत माणसे
आभाळ खचलेल्या भितीसारखे स्तब्ध.
आता मात्र,
वादळ खालुनच येत आहे.

□

पालखी

आभाळभर स्वप्नाची पालखी होऊन
गाव उजाडलं.
पलीकडचं पहाडी श्वासाचं पडकं देऊळ
त्यातून गजर सुरू झाला.

अंधारवस्ती पावलांची, ठोकरून,
ती दोघं गावात राह्यची.

ती मला भेटली.
हुंदक्यात त्याचं आयुष्य बोललं.
कुठल्यातरी मध्यभागीच्या ओसाड प्रदेशात.
ती एकमेकांना भेटतात / स्पर्शतात.

गावात चाहुल त्यांची
ती एकमेकांच्या बाहुपाशात.
उघडं अंग, सावरीत गवताशी खेळत.
काल मात्र, सरीवर सरी होऊन
कोसळत राहिलं.
त्यानंतर अनेक रात्री
पावसात हरवून गेल्यात.

तेव्हापासुन कुणीच गाव गोंदऊन घेत नाही.

□

डोळे भरून येतात
पिढ्यांचे अर्थ बदलतात
माणूस जगतो त्या प्रदेशात
नावं बदलतात
तो सांगतो
दंतकथांचे भाग
आम्ही जिवंत कथांचे नायक होतो
पसाभर दाण्यासाठी
तो रात्र जागतो
आम्ही उसनवार जगण्याचे
क्षण होतो

उल्हास मनोहर

जयभीम

" माझी अशी इच्छा नाही
या मातीशी बेईमान व्हावे
किंवा असेही वाटत नाही की
आपल्याच देशबांधवांना गद्दार म्हणावे
पण जेव्हा–जेव्हा मी या मातीत
नवीन वाटांसाठी घाम गाळला
तेव्हा–तेव्हा माझ्यावर
कधी मागून तर कधी पुढून
हल्ले झाले आहेत, "
असे ' तो ' सांगत होता
आणि ' हे ' बाकीचे सारे
माना खाली घालून ऐकत होते
काही वेळानी या साऱ्यांनी माना वर केल्या
फुले–आंबेडकरांना धन्यवाद दिले,
अखेरचा जयभीम घेतला
आणि स्कूटरवरून सरळ निघून गेले ते !

अमर रामटेके

आपला नकाशा

लोकशाही प्रजातंत्रातील
प्रत्येक स्त्रीला
श्वास घेऊ द्यायचा असेल
निर्धास्तपणे.
श्रमिकाला
जगू द्यायचे असेल
मुक्तपणे
आणि सामान्य नागरिकाला
हमी द्यायची असेल
निर्भीडपणे
पुढे पाऊल टाकण्याची;
तर तेज:कणांनो, क्रांतिदूतांनो,
सज्ज व्हा सर्वशक्तिनिशी
आणि फोडून टाका बिळे
अन्यायाची-विषमतेची
मातीच्या गर्भापर्यंत
खोलवर शिरलेली
ही विनाशाची पिलावळ...
जमीनदोस्त करा तिचे पारंपारिक घर
उगवतीच्या साक्षीने आता
नव्या घराला
तोरण बांधायचे आहे...
सारी स्वप्ने हरवलेल्या
युवाबेकारांचे,
बालपण कुठेतरी गहाण ठेवलेल्या
बालकामगारांचे
अश्रू पुसून त्यांच्या डोळ्यात
बघायचे आहेत आता
इंद्रधनुष्याचे रंग
आणि फुलवायची आहेत फुले
विश्वासाची.
धैर्याची.
चैतन्याचा लेझीम घुमवीत
आणि समतेचा बिगूल वाजवीत
'उद्या'चे स्वागत करायचे आहे
आपल्या नकाशाला
नवा अर्थ द्यायचा आहे.

□

कुंपणापलीकडची कोवळी रोपं

स्वत:च्या श्वासांवरही
ज्यांचा अधिकार नाही
ज्यांना, अजूनही
दिवसाच्या प्रकाशाशी
आणि रात्रीच्या काळोखाशी
आपले नाते
सांगता येत नाही;
खोल दरीत गडप झालेले
शैशव धुंडाळीत
भरावी लागते पोटाची खळगी
आसवे गिळून;
भावनांच्या डोहात
शोधताना कधी
लकाकतात स्मृतींचे कण
निसटून जातात नकळत
मासोळी होऊन... !

जन्मत:च पायात भक्कम बळ
घेऊन आलेली ही लेकरं
सोशीकतेची आणि समजूतदारीची
कवचकुंडले लेवून
साजरा करतात कुवतीप्रमाणे
प्रत्येक सूर्योदय.
आयुष्याचे शिल्प घडवीत
करतात स्वत:चा अभ्युदय.
डोळ्यात स्वप्नांची
थुईथुईणारी कारंजी.
हुलकावणी देते कधीकधी
रोटी आणि रोजी.
पाणी संपलेल्या कारंजासारखी
होतात पुन्हा उदास...
स्वप्नांना गळफास !

चंचल बाल्य
मनमोकळा श्वास
हास्याचा खळखळाट

बंदिस्त झाला असतो
भंगारमालासह
बालकामगारांच्या
खांद्यावरील ओझ्यात
जडभारले अनवाणी पाय अन्
कपवशा विसळणारे हात
उत्सुक असतात
लेखणी धरण्यासाठी,
आसुसला असतो माथा
प्रेमळ स्पर्शासाठी
शिणलेली पाठ
पहाते वाट
मायेच्या हातासाठी !

खांद्यावरचे ओझे सावरीत
बाळपण पायाखाली तुडवीत
ते बांधतात फुटपाथवर
आपल्याच भविष्याचं
स्मारक.
....
शापित जीवन जगणारी
कुंपणापलीकडची
ही कोवळी रोपं
उद्याच्या भारताची
नागरिकच आहेत ना !

मृणाल चिंचाळकर

तू सोडतेयस करुणेचे दिवे

प्राचीन दलदलीत उमटलं तुझं कृष्णकमळ
पेलतेयस वेदनेचा क्रूस;
करतेयस धारदार संवेदनेचे पाते;
पुसतेयस अभाग्याच्या भाळीचा मृत्यूकलंक.
खिन्न समुद्र;
नि तू सोडतेयस करुणेचे दिवे.

: अंधारावर उमटवतेयस मनस्वी मुद्रा.

हुंगतोय् तुझं सुगंधी हृदय;
नि पारखतोय् तुझ्यातील प्रेषिताला
वास्तवाच्या ऐरणीवर;
होतोय् नतमस्तक तुझ्या
दिंडी दरवाज्यासमोर;
तेव्हा निपचित समुद्र गावू लागतोय् गाज;
नि बोधिवृक्षाला पालवी फुटतेय्.

□

ही स्तब्ध झाडे

चेहरा रापतोय्;
व्यक्तित्वावरले नजाकतवस्त्र उतरवल्यावर.
: नसानसांतले मद्य निपटू पहातोय्.

स्वनिर्मित मध्यान्हीविषयी,
किंवा रणरणत्या प्रवासाविषयी,
अभिमान आहे !

ही स्तब्ध झाडे,
सळसळतील अपूर्व;
: समुद्राचे वैफल्य वरकरणी आहे !

सातत्यानं चाललेल्या पथिकाला अनुसरतोय्.
त्याच्या हाती
बलिदानाचं मोल असलेली सूर्यध्वजा आहे !

प्रकाश खरात

दोन कविता

१

मुख्य रस्त्यावर दुपारी उशीरा आलो
बालपण तरुणपण कच्च्या वाटेवरून गेले
श्वासातून गेला एक, एक क्षण
प्रत्येक पावलावर काटे, गोट, काचा
विखुरलेले
हे इतके सहन केले
की आता हिरवळीवरही
काल विसरता येत नाही
कितीही पुसले डोळे तरी
कडा मात्र ओल्या राही

२

रात्र उशाशी बसून थकली
तेव्हा घराचा उघडा मागडा
आधार सोडून दिला
झोपलेल्या शहराला साक्षीदार
म्हणून ओलिस धरले
आणि रस्त्यावर येवून
प्रत्येक पावलागणिक गेलेल्या
दिवसांचे आकार शोधू लागलो
कोणता दिवस लांबोळा
कोणता दिवस चौकोनी
कोणता दिवस त्रिकोणी
आणि कधी कोन नसलेला
दिवसांना असतात आकार
तसे रंगातही दिवस न्हाऊन जातात

लालभडक डोळ्यात
पोपटी हिरवा मनात
पांढरा फट्ट ऊपाशी
काळाकुट्ट असतो हातात
रंगात दिवस न्हाऊन जातात
अर्धी रात्र उलटून जाते
तसा मी हलगीवर आयुष्य वाजवित बसतो
मधेच कुत्र्याचे भुंकणे
चिरत जाते शांततेचे काळीज
गुरख्याच्या काठीची टकटक
आणि लांबवर मिलचे दोन टोल
आमच्या आयुष्यात पडतात तसे
असे जगण्याचे दिवस
विविध रंगात भिजलेले
माझे डोळे दगडागत थिजलेले

कुठवर बसणार ही रात्र अशीच
उशाशी
गळ्यातील हुंदके गोठवून
जखमांचे गाठोडे पाठीशी
आणि मूठीत भूकंप साठवून

वामन निंबाळकर

|| परिचय ||

जयभीम : बाबू हरदास !

: डॉ. ज्योती लांजेवार

'जयभीम' देणाऱ्या-घेणाऱ्या बऱ्याच दलित सुशिक्षितांना 'जयभीम' या घोषवाक्यामागे एक इतिहास आहे तो ठाऊक नाही. पश्चिम महाराष्ट्रात तर तो अजिबातच ठाऊक नाही.

'जयभीम' या शब्दाचे उद्गाते, प्रवर्तक, बाबू हरदास एल. एन. हे होते. आजच्या पिढीला ते माहित नाहीत. बाबूंच्या कार्याला विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात तोड नाही. त्यांच्या अकाली निधनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उजवा हात गेला असे म्हटले जाई.

मराठीला 'जयभीम' हा शब्द प्रदान करणाऱ्या निःस्वार्थी समाज सेवकाची ही बरीचशी अज्ञात असलेली माहिती. उपलब्ध करून देत आहोत.

एकेकाळी बंकिमबाबूंच्या 'वंदेमातरम्'ने सारा देश दुमदुमत राहिला होता. लालबहादूर शास्त्री यांनी स्वातंत्र्योत्तर काळात 'जय-जवान जय किसान'चा मंत्र देऊन या कृषीप्रधान देशाला भारावून टाकले होते. असाच एक घोषमंत्र महाराष्ट्राच्या विदर्भात जन्मला, वाढला, प्रसार पावला आहे. आज या लोकशाही देशात अस्पृश्यांचे उत्थान करून, माणूस म्हणून जगण्याचा हक्क ज्यांनी मिळवून दिला त्या घटनेच्या शिल्पकाराचे नामस्मरण म्हणून संबोधन स्वरूपात वापरात येणारा 'जयभीम' हाच तो घोषमंत्र होय.

'जयभीम' या घोषवाक्यामागे एक इतिहास आहे. बऱ्याच दलित सुशिक्षितांना तो ठाऊकही नाही. पश्चिम महाराष्ट्रात तर तो अजिबातच ठाऊक नाही.

ज्या क्रांतिकारी वीरांच्या प्रेरणा आपण दलित साहित्यासाठी मानतो त्या वीरांची आठवण केवळ प्रतिष्ठाप्राप्तीकरिता नव्हे, तर स्वतःला 'माणूस' म्हणून घडविण्यासाठी केली तर अशा लहान-सहान शब्दांचे, घोषवाक्यांचे संदर्भ कळू लागतात. प्रस्तुत प्रयोजन नेमके त्यासाठीच.

'जयभीम' या शब्दाचे उद्गाते, प्रवर्तक, बाबू हरदास एल. एन. हे होत. आजच्या पिढीला बाबू हरदास एल. एन. माहित नाहीत.

बाबूंच्या कार्याला विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात तोड नाही. त्यांच्या अकाली निधनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उजवा हात गेला असे म्हटले जाई. आज जो तो बाबासाहेबांच्या नावावर जगतो आहे. पुरोगामी असो की मार्क्सवादी असो, राजकारणी असो की समाजकारणी असो, सत्ताधारी असो की सत्तेबाहेरचा असो या साऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतल्याशिवाय पर्याय नाही.

मात्र बाबासाहेबांच्या नावासाठी जीव झोकून देण्याची जो प्रवृत्ती त्याकाळी होती ती आज नाही. निःस्वार्थ भावनेतून चळवळी चालविण्याची

प्रवृत्ती संपलेली आहे म्हणूनच अशा नि:स्वार्थी समाजसेवकांचा पुन्हा परिचय करून देण्याची निकडही भासते आहे.

' महारठ्ठाचे ' संपादन

बाबु हरदास एल. एन. यांचे पूर्ण नाव हरदास लक्ष्मण नगरकर. बाबूनी आपल्या नावापुढची दोन नांव इंग्रजी अल्पाक्षरातच ठेवली. त्यांच्या पत्रांवरच्या इंग्रजी मराठी सह्या या हरदास एल. एन. अशाच आहेत. ६ जानेवारी १९०४ मध्ये नागपूर पासून काही मैल अंतरावर असलेल्या कामठी, बैलबाजार (सध्याचे कामठी, हरदासनगर) येथे बाबूंचा जन्म झाला. आई द्वारकाबाई व वडील लक्ष्मण यांच्या कुटुंबांत अपत्ये जगत नसत. त्यांच्या कुटुंबात लक्ष्मण, किसन व जगन या तीन भावांपैकी केवळ लक्ष्मणच्याच या एकुलत्या एका पुत्रामुळे सारे लाडकौतुक बाबूंना मिळाले. आर्थिकदृष्टया त्यांची स्थिती इतरांपेक्षा बरी होती. लक्ष्मणजी रेल्वेमध्ये कारकून होते. त्यांचे सुधारलेले कुटुंब म्हणून इतरांचाही ते कौतुक-विषय होते.

बाबूंचे प्रायमरी शिक्षण बैलबाजार शाळेत झाले. पुढचे इयत्ता आठवीपर्यंतचे शिक्षण सरकारी आई. एम. ई. स्कूलमध्ये झाले. तर पुढचे मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण पटवर्धन हायस्कूल, नागपूर येथे झाले. शिक्षण घेत असतानाच बाबूंना अस्पृश्यतेचे दाहक अनुभव येऊ लागले.

या काळात अन्न, वस्त्र, निवाऱ्यासाठी रखडणारी, गावकुसाबाहेर कुत्र्या-मांजराचे जिणे जगणारी दुर्बल, दीन-हीन अस्पृश्य जनता बाबूंच्या मनात खळबळ निर्माण करीत होती. विडया वांधणारा, शेतात ढोराप्रमाणे राबणारा अस्पृश्य वर्ग वर्णवादाच्या चरख्यातून पिळला जात होता. हिंदू कर्मकांडाचा जबर पगडा असलेल्या या समाजाने हिंदूंच्या अनिष्ट चालीरीतींना आपल्या जिवनाचा एक आवश्यक भाग बनवलेला होता. या साऱ्यांच्या संदर्भात बाबूनी बंड उभारले होते. स्वतःच्या हाताने दाढी केली म्हणून दंड मागणारी पंचकमेटी त्यांनी सुधारली. बाबूचे सहकारी विठोबा कुर्वे हे जातीने न्हावी, कधी-कधी ते बाबूबरोबर समाजकार्यासाठी बाहेर गावी जात. कुर्व्यांना न्हावी म्हणून वेगळे जेवायला बसवतात हे बाबूंना खटकले. त्यांनी आपल्या सहकारी मित्रांची व पंचकमेटीची सभा बोलावली व सहभोजनांच्या कार्यक्रमांनी जातीभेदाचे रोपटेच उपटून फेकले. सवर्णांनी जातीभेद मात्र सोडला नाही. बाबूंच्या विवाहासाठी महार आहेत म्हणून पीठगिरणीतून गहू दळून मिळाले नाहीत, वस्तीतल्या स्त्रियांनी जात्यावर गहू भरडून लोकांना जेवण दिले. याची खंत बाबूंना लागून राहिली. १९२० मध्ये लग्न आणि १९२१ मध्ये वडिलांचा मृत्यु यामुळे ते ११ वी चो परीक्षा नापास झाले. कुटुंबांच्या जबाबदारीने शिक्षण पूर्ण होऊ शकले नाही. जगण्यासाठी अन्न व अन्नासाठी नोकरी ओघानेच आली. १९२२ मध्ये बाबू लिप्टन चहा कंपनीचे सेल्समन म्हणून काम करू लागले. अंत:करणात अस्पृश्योद्धाराची तळमळ होती. मनास जातीयतेचे विखारी डंख. समाजासाठी सर्वस्व अर्पण करण्याची जिद्द बाबूंना लागली. त्यांनी आपल्या लेखणी-वाणीसाठी व समाजाच्या कहाणीसाठी इ. स. १९२१ ला 'महारठ्ठा' या नावाचे साप्ताहिक प्रकाशित केले. यावेळेस बाबू अवघ्या १८ वर्षांचे होते. वर्तमानपत्राचा संपादक म्हणून काम करणारा हा अल्पवयीन संपादक स्वामी ब्रम्हानंद, आर्य समाज, नागपूर यांचेकडे संस्कृत शिकला. नागपूरच्याच आर्य समाज प्रेसमध्ये प्रेसचे काम आपल्या सहकाऱ्यासोबत शिकून 'महारठ्ठा'ला स्वयंभू-स्वतंत्र बनविण्यासाठी स्वत:चा प्रेस त्याने विकत घेतला.

महिला प्रशिक्षण केंद्र

कामठी म्हणजे विडी उद्योगाचे केंद्र. अस्पृश्यांचा प्रमुख धंदा म्हणजे विडया वळण्याचा. बाबूनी बिडी कामगारांसाठी सहकारी तत्त्वावर बिडीचे उद्योग सुरू करून योग्य मजूरी मिळावी यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. बिडी मजूरांना स्थैर्य मिळवून दिले. सहकारी तत्त्वावरच किराणा व धान्यांची दुकाने त्यांनी सुरू केलीत. कमी किंमतीत जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करून स्वत:च्या नि:स्वार्थी नियंत्रणाने समाजाला

जगवले. महात्मा फुले यांच्या विचारांची अंमलबजावणी म्हणून कामठी येथे महिलाश्रमाची स्थापना केली. स्त्रियांना गृहजीवन आरोग्याविषयी प्रशिक्षण देणारे महिला प्रशिक्षण केंद्र उघडले. १९२२ मध्ये बाबूंनी 'महारसमाज' स्थापन करून आपल्या कार्याने समाजाला संघटित केले. बाबूंचे निकटवर्ती सहकारी डी. लक्ष्मीनारायण हे होते तर बाबूंनी सचिव म्हणून धुरा सांभाळली. तरुण संघाच्या मदतीने 'समाज सेवक पथक' या संघटनेची त्यांनी निर्मिती केली. विखुरलेल्या अस्पृश्य तरुण शक्तीला एकत्र बांधून अन्याय–अत्याचाराविरुद्ध लक्ष देण्यास सज्ज केले. आर्थिक, सामाजिकदृष्टया समाज कसा वर येईल याचा सतत प्रयत्न केला. समाजात पोट जातीचे वाढलेले प्रस्थ पाहून चोखामेळ्याच्या पुण्यतिथिनिमित्ताने संत आत्माराम बोवा यांचे मठातून पालखी काढली. पोटजातीच्या विळख्यात गुरफटलेल्या समाजाला एकमेकांशी व्यवहार करणे पसंत नव्हते. अशा तमाम अस्पृश्यांना एकत्र आणून त्यांची कानउघाडणी केली. अस्पृश्य, दीनहीन, लाचार, दुबळ्या लोकांचे ज्वलंत प्रश्न सोडविण्यास बाबू व श्रीमंत गोमा गणेश यांच्या अध्यक्षतेखाली एक शिष्टमंडळ नागपूरचे राजा लक्ष्मणराव भोसले यांना भेटले आणि राजे शाहू छत्रपती महाराजांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन त्यांनी १९२३ मध्ये सादर केले. १९२२ – १९२३ च्या दरम्यान गांधीजींची असहकार चळवळ जोरात सुरू होती. यावेळेस हिंदू–मुस्लिम ऐक्य होते. अस्पृश्यांनी या चळवळीत सहभाग दिला नाही याचे कारण बाबूच आहेत असे जाणून बाबूविषयी द्वेष वाढू लागला. याचकाळात कामठीचे मुख्य इंग्रज अधिकारी बॅरिस्टर डीग यांचा अस्पृश्य समाजाकडून सत्कार आयोजिला गेला. सत्कारानंतर अस्पृश्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक उन्नतीकरिता तसेच लोकसंख्येच्या मानाने त्यांना वरिष्ठ जागा मिळावी याकरिता बाबूंनी डीगसोबत वाटाघाटी केल्या. डीग यांनी लेजिस्लेटिव्ह कौन्सिल, डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड, म्युनिसिपल कमेटी आदि जागांवर अस्पृश्यांना नियुक्त करण्याची हमी दिली. डीग यांची सभा उधळून लावण्याचा कट केला गेला होता. सभेवर दगडफेक झाली. पण बाबूच्या सहकाऱ्यांनी सर्व विरोधांना तोंड देऊन सभा यशस्वी केली. याचे बहुतेक श्रेय गुरुवर्य किसन फागोजी बंदसोडे यांना आहे.

बाबूंचे कार्य आणि लेखन

बाबूंनी अनेक प्रकारचे लेखन केले. त्यांनी आपल्या समाजाचे प्रबोधन व्हावे व समाजोन्नती व्हावी यासाठी सर्वसामान्यांना कळेल अशा भाषेत इ. स. १९२४ मध्ये 'मंडई माहात्म्य' नावांचे पुस्तक लिहिले. आश्विन कृष्ण प्रतिपदेपासून तो कार्तिक पौर्णिमेपर्यंत गावोगावी 'मंडया' भरत. यालाच 'कृष्णलीला' म्हणत. यामध्ये नाच गाणे, दंढार, तमाशा आदि मनोरंजनाचे कार्यक्रम असत. अस्पृश्यांची ही आवडीची मनोरंजनाची साधने होती. मुलाबाळांची, स्त्रियांची भरपूर गर्दी यासाठी व्हायची. स्त्रियांच्या सुरक्षेचा तर विचारच नव्हता, म्हणून बाबूंनी या 'मंडई महात्म्यातून' स्त्रियांना समज दिली. या पुस्तकातील विचाराने समाज इतका प्रभावित झाला की स्त्री–पुरुषांनी मंडईस जाणे सोडून दिले.

बाबूंनी नयाबाजार, बैल बाजार, किमसरी बाजार या विभागात हिंदू–महार संस्थेमार्फत रात्रीच्या तीन शाळा काढल्या. त्याला जोडूनच इंग्रजी शिक्षणसंस्था सुरू केली. या शाळेत ८६ मुले व २२ मुली होत्या. साप्ताहिक सेवेचा कार्यक्रम बाबू स्वतःच्या देखरेखीखाली करू लागले. प्रत्येक आठवडयात बाबू जनसंपर्क, व्याख्याने, कीर्तन, चर्चा आयोजित करीत. यामधून समाजाला लिहिण्या–वाचण्याची गोडी लागेल असे बाबूंना वाटत असे. त्यांनी 'संत चोखामेळा वाचनालय' सुरू केले. 'वीर बालक' नावाचे नाटक बाबूंनी स्वतः लिहून या नाटकाचे प्रयोग जागोजागी आयोजित करून समाजजागृती घडवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी एक कलासंचही स्थापन केला होता.

अपृश्यांना हिंदू मंदिरात प्रवेश नव्हता. बाबूंनी कामठी येथे मंदिरे बनविली. याचा परिणाम म्हणून हिंदूंनी अस्पृश्यांना मारझोड सुरू केली. बाबू या प्रकाराने अस्वस्थ झाले. पुढे डी.

लक्ष्मीनारायण यांच्या मध्यस्थीने समझोता करण्यात आला. यामुळे सवर्णांचा अस्पृश्यांविषयीचा तिरस्कार वाढला. पण बाबू व त्यांचे सहकारी सवर्णांचे बेत हाणून पाडत राहिले. बाबूंच्या बलशाली तरुण संघटनेत विक्रमजी सनकाळे, तुळशीराम राहाटे, गौरीशंकर गजबे, तिमाजी बावनगडे, हरी चांदोरकर, घोंडबाजी मेंढे, जगन्नाथ पिल्लेवान, रामदास थुले, कचरूजी अंघारे (मास्तर) कविरत्न सदाशिव मानवटकर, शंभूजी खैरकर, मंगल मेश्राम, क्षिबल पंडपे, एकनाथ अंघारे, हरीजी कुंभारे (दादासाहेब ना. ह. कुंभारे यांचे वडील) राजेराम राऊत, शितलप्रसाद गजभिये, किसन शेलारे, चांगो पेवले, जिवदास तिरपुडे, मारोती शंभरकर, प्रेमदास गजभिये, किसन शेलारे आदींचा समावेश होता. हे सर्व कामठीच्या प्रत्येक मोहल्ल्यातून आलेले कार्यकर्ते होते. तर विदर्भात इतरत्र पसरलेले बाबूंचे संघटक कार्यकर्ते दशरथ पाटील, गोंदियाचे कालीचरण नंदागवळी, नागपूरचे रेवाराम कवाडे, किसन फागोजी बंदसोडे, मोहपा दिवाजी खोब्रागडे (चंद्रपूर), कांबळे (नागपूर) हे कार्य करीत होते. या सर्वांची मिळून एक बलशाली संघटना निर्माण झाली होती.

ज्ञानदानाचे कार्य

'विद्या ही वाघिणीचे दूध आहे' हे बाबूंनी ओळखले होते. म्हणून शिक्षणाचा प्रसार व प्रचार व्हावा या दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याचा रोख शिक्षणाकडे वळवला. विद्यार्थी जीवनातल्या अनुभवांची शिदोरी हाती घेऊन त्यांनी वर्तमानपत्रे, पुस्तके, व्याख्याने आदींच्या माध्यमातून आपल्या समाजाची बाहेरच्या जगाशी सांगड घातली. इ. स. १९२५-२६ या वर्षात बाबूंनी रात्रंदिवस कष्ट उपसून आपल्या सहकाऱ्यांकरिता ज्ञानदानाचे कार्य केले. त्यांना लिहिणे-वाचणे शिकविले. हे तरूण सहकारी तयार झाल्यावर त्यांना इतरांना शिकविण्यासाठी; शिक्षित करण्यासाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या. सकाळपासून संध्याकाळपर्यंत पोटासाठी राबणारा कष्टकरी समाज रात्रीच्या शाळेत येऊन ज्ञानाची भूक भागवू लागला या साऱ्यांचे श्रेय बाबूंनाच. बाबू स्वत: इंग्रजी शिकवित असत.

कार्य : रामटेक मंदिरासंबंधाने व इतर

यानंतर बाबूंनी आपला मोर्चा रामटेक यात्रेकडे वळविला. कार्तिक पौर्णिमेला व चैत्र रामनवमीला रामटेकला मोठी यात्रा भरत असे. दलित अंधश्रद्धाळू या यात्रेला जात परंतु त्यांना दर्शन टेकडीच्या पायथ्याशी उभे राहून घ्यावे लागे. अस्थिविसर्जित करण्यासाठी असलेला अंबाळा तलाव त्यांना आंघोळीसाठी वापरावा लागे. बाबूंनी दलित अस्पृश्यांची ही दशा पाहिली. पायऱ्यावर डोके टेकणारा समाज पाहून ते विचलीत झाले त्यांनी इ. स. १९२७ ला यात्रेच्या दिवशी त्या ठिकाणी एका सभेचे आयोजन केले. या सभेचे अध्यक्ष गुरुवर्य किसन फागोजी बंदसोडे होते, बाबूंनी सभेतल्या लोकांना उद्देशून ते करीत असलेल्या कृत्यांची जाणीव दिली व त्याच सभेतील श्रीमंत अस्पृश्यांना आपल्या बांधवांसाठी विहीरी व मंदिरे बांधण्याचे आवाहन केले. बाबूंच्या हाकेला 'ओ' म्हणून गजभिये, चहांदे, पिल्लेवान आदींनी आर्थिक मदत केली आणि अस्पृश्यांसाठी विहिरी व मंदिरे बांधून दिली. आजही रामटेकला अंबाळा तलावाच्या बाजुला हे मंदिर बाबूंच्या कार्याची ग्वाही देत उभे आहे. यात्रेकरू अस्पृश्यांनी मंदिराच्या पायऱ्यांवरची पूजा व तलावात आंघोळीची प्रथा मोडली व बाबूंच्या सांगण्यावरून मंदिरे व विहिरीचा उपयोग केला.

दरम्यान पैशाच्या अभावी बंद पडलेले 'महारठ्ठा' साप्ताहिक बाबूंनी पुन्हा सुरू केले. तुकाराम, चोखामेळा, नामदेव आदि संताचा झालेला छळ आठवून त्यांनी लेखन केले. 'अन्याय झेलत जगण्यापेक्षा संघर्ष करून मेलेले बरे' हा बाबूंचा बाणा होता. त्यांनी संत चोखामेळा वाचनालय उघडले, 'महारठ्ठा' साप्ताहिकासोबतच 'चोखामेळा' विशेषांकाच्या प्रती पाठविण्याची सोय केली. दि. ५ ऑक्टोबर १९२८ च्या 'महारठ्ठा' व चोखामेळा यातुन तत्कालीन समाजस्थिती व त्यावरचे उपाय त्यांनी मार्मिकपणे

मांडलेले दिसतात, दि. ५-१०-१९२७ चा अग्रलेख याची साक्ष म्हणून सांगता येईल. 'अस्पृश्यांची उन्नती हेच माझे जीवन' असे ब्रीद धारण करणाऱ्या बाबूंनी तन-मन-धनाने अस्पृश्य-सेवा केली. दलित राखीव जागेसाठी सहकारी मित्रांच्या आग्रहावरून बाबूंनी फॉर्म भरला. तेव्हा त्यांच्या विरोधात तुलाराम साखरे उभे राहिले. ही गोष्ट बाबूंच्या लक्षात येताच त्यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. समाजातल्या इतरांना पुढे येण्याची संधी द्यावी या हेतूने व समाजात फूट पडू नये या उच्च ध्येयापोटी साखरे यांना त्यांनी सर्वतोपरी सहाय्य देऊन अविरोध निवडून आणले. बाबूंच्या आयुष्यातला हा समंजसपणा व निःस्वार्थीपणा आजच्या 'नेते' म्हणवणाऱ्यांनी थोडा जरी स्वीकारला असता तर आजच्या दलितांचे भविष्य काही और असते. कामठीच्या म्युनिसिपल कमेटीमध्ये आपल्या बांधवांना स्थान मिळावे यासाठी बाबूंनी सर्वतोपरी सहाय्य करून स्वतःकडे कुठल्याही प्रकारचे अधिकार न ठेवता कमिटयांवर आपल्या बांधवांना निवडून आणले. निवडून गेलेले कोटंगळे, कालिचरण, तुलाराम साखरे, अन्ना गवई इ. सदस्य होते.

हरदास बाबू संवेदनशील वृत्तीचे, कवि हृदयाचे होते. त्यांनी उपासनेसाठी अभंग रचना केली. त्याला दलितांची 'ईश्वरोपासना' असे नाव दिले. वेगवेगळया पंथ-धर्मांत माराई-माराई-खंडोबा-संडोबात गुरफटलेल्या अस्पृश्यांना एका अस्पृश्य निवारण्यास कटिबद्ध असलेल्या ईश्वराकडे वळविले. बाबूंचे अभंग म्हणजे त्यांच्या उत्तुंग भावभावनांचा आविष्कार होय. त्यांनी खेडोपाडी, गावोगावी जाऊन जनजागृती केली. जगाला व हिंदूंना 'आम्हीही माणसं' आहोत हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. तुम्ही आम्हाला आपले समजले तर आम्हीही स्वातंत्र्यासाठी प्राण अर्पण करू, एकत्र जेलमध्ये जाऊ, संघटितपणे रक्त सांडवू. परंतु असे झाले नाही. बाबूंची दृष्टी 'Man in search of humanism' प्रमाण होती. बाबूंच्या रामटेक मंदिर संघर्षांच्या एक-दीड वर्षानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नासिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाची घोषणा केली. बाबासाहेबांच्या या घोषणेने बाबू भारावून गेले. बाबासाहेबांना योग्य ती साथ देण्यास बाबू तयारीला लागले. बाबासाहेब २ मार्च १९३० ला नासिक येथे आले होते. या सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी हरदास बाबूंनी कामठी-नासिक पर्यंतच्या रेल्वे भाडयाची व खाण्यापिण्याची सोय वस्तीवस्तीतून वर्गणी गोळा करून केली.

[पुढील भाग पुढील अंकात]

लोहियांचे भाषाविषयक विचार

भा शा. शास्त्री

मुळात राजकीय विचारवंत, चिंतक व वैश्विक नागरिकत्वाची स्वप्ने बघणारा द्रष्टा पुरुष, सप्त क्रांतीचे आव्हान पेलता पेलताच आंतरिक शांती व बाह्य भौतिक समृद्धीने परिपूर्ण समाजनिर्मिती होत जाण्यावर श्रद्धा असलेला, विद्रोही, अन्यायाच्या तीव्र प्रतिकाराचा पुरस्कर्ता, विश्वसंस्कृतीच्या स्थापनेचा संकल्पक अशा राम मनोहर लोहियांच्या विचारांची दिशा ही राजकीय चिंतनानुवर्ती तेवढीच नसून त्या सोबतच संस्कृती, साहित्य, तत्वचिंतन, इतिहास, भाषा इ. संबंधाने शास्त्रीय वस्तुनिष्ठ व मौलिक चिंतन करून गेलेले हे व्यक्तित्व स्वतःच एक भव्य इतिहास होते.

या व्यक्तित्वाचे विचार, चिंतन, तत्त्व, कल्पना यांचा प्रसार जाणीवपूर्वक रोखून धरणारी प्रभावी अशी यंत्रणा भारतीय समाजात कार्यरत होती. अद्यापही आहे. मात्र धुके आता बरेचसे निवळले आहे व आज राम मनोहर लोहियांच्या नावाने शासन करू लागलेला शासकवर्गही भारतीय समाजास लाभलेला आहे.

अशा या व्यक्तित्वाच्या भाषेसंबंधीच्या विचारांचे हे एक स्मरण !

लोहियांचे भाषाविषयक चिंतन हे हिंदीप्रसाराचे तत्त्वज्ञान नसून सर्वच भारतीय भाषांच्या अस्मितेचे व भाषेच्या प्रतिष्ठाप्राप्तीचे ते एक आंदोलन आहे.

लोहियांचा कडवा इंग्रजी विरोध व त्यातून जन्माला आलेली एकेकाळची गाजलेली ' अंग्रेजी हटाव ' ही चळवळ हे या देशातील विषमता निर्मूलनाच्या समग्र चळवळीशी बांधले गेलेले असे समतेच्या लढ्यातील एक अतीव महत्त्वाचे पाऊल होते. भाषिक संदर्भात ते केवळ इंग्रजी विरोधी नसून भारतीय लोकभाषांच्या बाजूचे होते. साऱ्याच भारतीय लोकभाषांच्या अस्मितेच्या जागृती-लढ्याचे ते पुरस्कर्ते होते. भारतीय भाषांची खरी लढाई ही आपसातील वर्चस्वाची नसून साऱ्या भाषांचा मिळून समान शत्रू अशा इंग्रजीशी आहे असे त्यांचे म्हणणे होते. भारतीय भाषांना आपसात लढविणाऱ्या इंग्रजीवादी भारतीय शासक वर्गावर लोहियांनी प्रचंड कोरडे ओढलेले होते.

भाषिक संदर्भाच्या निमित्ताने देखील सर्वच भारतीय भाषांच्या विकासाचे समग्र समृद्धीचे असे तत्त्वज्ञान, पर्यायाने या देशातील जनसामान्यांच्या विकासाचे व समृद्धीचे तत्त्वज्ञानच लोहिया मांडत होते, हे लक्षात घेतले पाहिजे.

अंग्रेजी हटाव ...?

लोहियांचे भाषाविषयक चिंतन, काही सामंती भाषा आणि लोकभाषा, देशी भाषा व इंग्रजी हिंदीचे नेमके स्वरूप, उर्दू बोली, इंग्रजी हटविणे म्हणजे हिंदी लादणे नव्हे व हिंदीचे सुलभीकरण या विषयावरील त्यांनी व्यक्त केलेल्या विचारातूनही उपलब्ध होते. इंग्रजीचा सार्वजनिक वापर बंद करण्याचे, न्यायालयातून इंग्रजीच्या वापरास विरोध करण्याचे व जेथे इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रांचे

वाचक आपल्या सवयी बदलायला तयार असतील तिथे इंग्रजी दैनिकांच्या होळया देखील पेटविण्याचे आवाहन करणाऱ्या राम मनोहर लोहियांनी भाषानितीच्या राष्ट्रहितवादी अंमलबजावणीचा पुरस्कार केला. तसे करताना आपले मुख्य लक्ष इंग्रजी हटवण्याचे असून हिंदीची प्रतिष्ठा वाढविण्याचे नव्हे हे वारंवार स्पष्ट केलेले आहे. तरीही काही हितसंबंधीयांनी त्यांची भाषाविषयक प्रतिमा ही हिंदी प्रचारकाची व इंग्रजी विरोधकाचीच तेवढी जाणूनबुजुन उभारण्याचा प्रयत्न केला. योग्य वेळी हिंदीला इथे अखिल भारतीय स्थान प्राप्त होणारच आहे यावर त्यांचा ठाम विश्वास होता. परंतु एखाद्या प्रांतात किंवा अखिल भारतीय पातळीवर मराठी किंवा बंगाली प्रतिष्ठित झाली तरी त्याबाबत वाईट वाटण्याचे कारण नाही हेही त्यांनी स्पष्टपणे मांडलेले होते. त्यांचे हे चिंतन व भारतीय भाषावादी ही भूमिका हिंदी भाषिकांव्यतिरिक्त पोहचविण्याचा प्रयत्न करण्याचे फारसे कोणी मनावर घेतले नाही हे एक आश्चर्यच ! इंग्रजी केवळ ऐच्छिक विषय होऊन राहावी याकरिता आंदोलने झाली पाहिजेत, जिथे वाचक आपल्या सवयी बदलावयास तयार असतील तिथे इंग्रजी वृत्तपत्रांच्या होळचा पेटवावयास हव्यात, तसेच न्यायदानात इंग्रजीच्या वापराविरोधी भूमिका घ्यावयास हवी या भूमिकेवर ठाम असणाऱ्या लोहियावाद्यांनी पुढे 'अंग्रेजी हटाव' आंदोलनातून लोहियांचे किमान उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश व राजस्थान या चार राज्यातून तरी इंग्रजीचा वापर नाहीसा करण्याचे स्वप्नपूर्तीचे प्रयत्न बऱ्याच मोठ्या प्रमाणावर केलेले होते.

इंग्रजीच्या विरोधाची गरज लोहियांना भासत होती यांचे कारण या देशातील विषमतेला खतपाणी इंग्रजीच्या वापराने मिळत होते हे आहे.

आज इंग्रजी विरोधाचे वातावरण जवळ जवळ संपुष्टातच आलेले असल्याने इंग्रजीतच जन्माला येऊन इंग्रजीतच वाढलेल्या पिढ्यांना इंग्रजी विरोधात दडले असलेले राष्ट्रभक्ती, विषमताविरोध व राष्ट्रोत्थानाचे सूत्र गवसणेच शक्य नाही.

भाषेचे सुलभीकरण

भाषेच्या सुलभीकरणाबाबतही लोहियांची मते सुस्पष्ट होती. त्यांच्या मते राज्यकर्ते व विद्वत्-जन यांच्या एक गोष्ट ध्यानातच येत नव्हती की भाषा ही स्वभाषेव्यतिरिक्त ज्या परकीय शब्दांचा स्वीकार करते त्यांचे ध्वनी व रूप यांना आपल्या वापरानुसार करून घेत असते. हा आधुनिक भाषा-शास्त्रीय दृष्टिकोन आहे व लोहियांचे भाषेबद्दलचे विचार हे तेव्हाच भाषाशास्त्रीय ज्ञानावर आधारलेले होते हे ध्यानात घेतले पाहिजे. परकीय शब्दांबाबत दोन नियम, (जे पुढे पाळल्याच जाणार आहेत असे त्यांचे ठाम मत होते.) पाळावे असे ते म्हणत. एक म्हणजे जेव्हा स्वभाषेतील शब्द मुळीच सापडणार नाही अथवा तो पूर्णतः उचित असणार नाही तेव्हाच परकीय शब्दाचा स्वीकार करणे व दुसरे म्हणजे परकीय शब्द त्या शब्दाबाबतच्या आवश्यक त्या ध्वनी व रूपाप्रमाणे बदलून घेतला पाहिजे. आज हे तत्त्व आपण स्वीकारलेलेच आहे. फक्त या स्वीकाराची आपली मानसिकता लोहियांनी तयार केली हे आपल्याला कोणी फारसे सांगितलेले नाही.

हिंदी लेखकांना व विद्वत्जनांना उद्देशून त्यांनी म्हटलेले होते की " आंतरराष्ट्रीय " याचा अर्थ केवळ इंग्रजी नव्हे. दुसऱ्या कोणत्याही भाषेतील उदाहरण देताना ते इंग्रजीतीलच तेवढे देणे म्हणजे विद्वानांनी आपले अज्ञान प्रदर्शित करणे होय. मार्क्स अथवा टॉलस्टाय, साक्रेटिस अथवा ख्रिस्त यांच्या संबधातील उदाहरणे, अवतरणे ही इंग्रजीतील देणाऱ्यास अज्ञानीच समजावे असे ते म्हणत.

भाषेचे सुलभीकरण, सहजीकरण हे राज्यकर्ते, विद्वत्जन अथवा प्रशासन करू शकत नसून ही कालानुक्रमाने घडत जाणारी प्रक्रिया आहे. अगोदर शब्द, शब्दकोष तयार करायचा तेव्हा एखादी भाषा आपले स्थान ग्रहण करेल असे कधीच जगात घडलेले नाही व घडणार नाही असे त्यांचे हिंदीच्या शासकीय कोषाचे संबंधाने मत होते.

भाषेची अगोदर प्रतिष्ठा तयार होते तेव्हाच तिचा विकास होतो असे लोहियांचे मत होते. भाषेचा अगोदर विकास व्हावा नंतरच तिला प्रतिष्ठा द्यावी असे फक्त देशद्रोही किंवा मूर्खानाच वाटू शकते असे ते म्हणत.

इंग्रजी भाषेच्या अध्ययनानेच तेवढी प्रतिष्ठा व धनप्राप्त करता येऊ शकते हे समीकरण कायम राहील तोवर भारतीय भाषांचा प्रचार, प्रसार, विकास हे सारे मिथ्या आहे, व्यर्थ आहे असे लोहियांचे मत होते व ते किती तंतोतंत बरोबर होते हे आपण आज इंग्रजीने व्यापलेल्या युगात अनुभवतो आहोतच.

भाषासमृद्धी : भाषेच्या वापराने !

भाषा हा एक रथ असतो. त्याचे काम भेदभाव न बाळगता सर्वांना वाहून नेणे एवढेच आहे. ते एक वाहन आहे.

भाषा स्टीक, रंगीन, वेगवेगळ्या अर्थच्छटा व्यक्तविणारी, पारिभाषिक, जोरकस व रोचक असेल तर ती संपन्न या व्यतिरिक्त भाषेच्या संपन्नतेचे अधिक अर्थ असत नाहीत असे त्यांचे म्हणणे होते.

कोणत्या भाषेत कोणत्या विषयावरील किती पुस्तके आहेत हा फक्त संदर्भाचा भाग असून अतिशय गौण अशी ती बाब असल्याचे ते म्हणत.

हिंदी किंवा कोणतीही भारतीय भाषा समृद्ध नसल्याचे व त्यामुळेच ती संपूर्ण राष्ट्राची भाषा बनण्यास असमृद्ध असल्याचे जो कुणी मान्य करील तो त्यातून अनंतकाळपर्यंत सुटणार नाही हे त्यांचे म्हणणे आज खरे ठरले असल्याचे आपण बघतो आहोच.

तेलगु, हिंदी, उर्दु, मराठी या दरिद्री भाषा आहेत व आधुनिक युगात त्यांचा उपयोग फारसा शक्य नाही असे वाटणाऱ्यांनी तर या भाषांचाच तेवढा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे असे लोहियाजी म्हणत. कारण भाषा ही वापरानेच समृद्ध होते. इंग्रजीचाच केवळ वापर करीत बसाल तर तुमची भाषा कधीच समृद्ध होणार नाही असा इशारा लोहिया वारंवार देत असत. तो ध्यानात घेतला न गेल्याच्या परिणामी इंग्रजीच्या तुलनेत आधुनिक युगाचे संदर्भात भारतीय भाषा आजही समृद्धी पावू शकलेल्या नाहीत. ज्या इंग्रजीची समृद्धतेसंबंधाने आधुनिक काळात एवढी स्तुती, गुणगान केल्या जाते ती एवढी प्रगत झाली कशी ? तर, केवळ वापराने.

भाषेच्या विविधांगी, विविध आयामी वापराने येणाऱ्या भाषिक समृद्धीवर लोहियांचा जोर होता.

इंग्रजी भाषेत केवळ २-२॥ लाख तर भारतीय भाषांमध्ये ६ लाख शब्द आहेत. या दृष्टीने देखील भारतीय भाषाच अधिक समृद्ध आहेत हे का सांगितल्या जात नाही असा प्रश्न लोहियांनी वारंवार उपस्थित केलेला होता. ते म्हणत की असे कितीतरी शब्द भारतीय भाषांमध्ये जंग खात पडलेले आहेत की ज्यांचा गेली ७००-८०० वर्षे, विशेषत: गेली ३०० वर्षे वापरच झालेला नाही. कारण या कालखंडात आपण राजकारणातच पिछाडीवर राहिलेलो होतो. त्यामुळे भारतीय भाषांचा वापर देखील मागासलेलाच राहिला; असे त्यांचे प्रतिपादन होते.

राजकारणातील एखाद्या समाजाचे वर्चस्व, सहभाग व त्या समाजाच्या भाषेचा विस्तृत, व्यापक व समृद्ध वापर या परस्परांसोबतच चालणाऱ्या बाबी आहेत असे लोहियांचे मत होते. आधुनिक सामाजिक भाषाशास्त्राचेही हेच प्रतिपादन आहे.

एखादे मूल ज्या सहजतेने आपल्या आईसोबत वागू शकते तेवढे सहजपणे ते दुसऱ्या मुलाच्या आईसोबत वागू शकत नाही. वाणी तेव्हाच समृद्ध होते जेव्हा ती बोलणारा अथवा लिहिणारा सहजतेने लीलया तिचा वापर करू शकेल. भारतीय माणूस भारतीय भाषेशी ज्या सहजतेने समरस

होऊ शकतो त्या सहजतेने इंग्रजीचा वापर तो कधीही करू शकणार नाही याबद्दल लोहियांच्या मनात मुळीच शंका नव्हती.

शब्दकोष तयार करून, प्रमाण शब्द, पारिभाषिक संज्ञा, त्याकरता कमिट्या करून भाषेचा वापर व तिची समृद्धता वाढविता येणार नाही तर भारतीय भाषांचा महत्तम वापर आणि वापरच तेवढा आधुनिक ज्ञानशाखांमध्येही या भाषांना शब्द प्राप्त करवून देईल यावर लोहियांची ठाम निष्ठा होती.

त्याकरता फक्त एकच निर्धार आवश्यक आहे असे त्यांचे मत होते व तो म्हणजे सार्वजनिक जीवनात इंग्रजीचा वापरच न करण्याचा. उत्तर प्रदेशच्या नवनिर्वाचित सरकारने हाच निर्धार करून ही भूमिका आज घेतलेली आहे. या भूमिकेला आज जो प्रचंड विरोध होत आहे त्याचे कारण ही भूमिका लोहिया ज्या काळात मांडत होते त्यावेळी राज्यकर्ते त्याकडे दुर्लक्ष करीत होते हेच आहे.

खेड्यापाड्यातील लोकच भाषा अधिक समृद्ध करीत असतात. कारण ते परकीय भाषेचा वापरच करीत नसतात. तर स्वभाषेतच सारा व्यवहार करून वेगवेगळाले शब्द आपल्या उच्चारां-प्रमाणे वापरून त्यांचे रूप व ध्वनी यांना आपल्या सोयीनुसार वाकवून घेऊन स्वभाषेतच भर घालीत जातात. भाषासमृद्धीचा हा व्यवहार जेवढा खेड्यापाड्यातील जनता विनासायास सांभाळते तेवढा तो शिकले-सवरलेले लोक करीत नसतात. आधुनिक भाषाशास्त्र देखील, अशिक्षित जनताही नव्या भाषेची जनक असल्याचे सांगतेच असे लोहिया म्हणत.

इंग्रजी : अल्पसंख्याकांची भाषा, आंतरराष्ट्रीय नव्हे !

लोकांचा इंग्रजीबाबतचा भ्रम दूर करण्यासाठी ते सांगत की इंग्रजी ही अमेरिकेतील प्रगतीनंतर एवढी उलथापालथ घडवायला निघाली आहे. त्या अगोदर तर फ्रेंचचाच तेवढा बोलबाला होता. इंग्रजी ही फार थोड्या लोकांची भाषा आहे; हे लोहिया सांगत.

कार्लमार्क्स किंवा लेनिन, यांना तर इंग्रजी येतच नव्हती. मार्क्सने इंग्लंडमधे थोडी मोडकी-तोडकी तेवढी इंग्रजी शिकून घेतली होती. डोस्टोवस्कीला तर इंग्रजी येत नव्हतीच हे देखील लोहिया आवर्जून सांगत.

अर्थशास्त्रातील त्या काळातील जगन्मान्य विद्वान प्रो. वर्नर जोम्बार्ट हे बर्लिन विश्वविद्यालयात लोहियांना शिक्षक म्हणून लाभले होते. त्यांच्या बाबतचा एक किस्सा सांगतांना लोहिया म्हणत की; "मी थोडी जर्मन अवगत केली असली तरी जर्मनीत बोलता बोलता माझ्या तोंडून इंग्रजी वाक्य निघाले तेव्हा ताबडतोब प्रो. जोम्बार्ट यांनी अतिशय गंभीर चेहऱ्याने सांगितले की आपण आता काय बोललात ते मला कळलेले नाही कारण मला इंग्रजी मुळीच येत नाही." लोहिया सांगतात, "तेव्हा माझे वय केवळ १८-१९ वर्षांचे होते."

इंग्रजी ही पैशाच्या व शस्त्राच्या बळावर पसरलेल्या साम्राज्यातून समोर आलेली भाषा आहे. जगातील लोकसंख्येच्या तुलनेतही भाषिक अल्पसंख्य असलेल्यांची ती भाषा आहे. असे असतांना इंग्रजीला आंतरराष्ट्रीय भाषा म्हणणाऱ्या पंडित नेहरू, सी. डी. देशमुख, राजगोपालाचारी यांच्या-सारख्यांना देखील लोहियांनी "धोकेबाज" म्हणायला कमी केलेले नव्हते.

जगातील सात-आठ भाषांनी आंतरराष्ट्रीय होण्याचा प्रत्येक वेळी केलेला प्रयत्न विफल झालेला असल्याचे व संस्कृतसारख्या भाषेचे थोड्याबहुत उच्चारणाच्या फरकाने जपान, बँकॉक, बुडापेस्ट इ. कडे पसरलेले साम्राज्य याचे दाखले देऊन लोहिया नेहमी विचारत की रशियन भाषिकांची संख्या ही इंग्रजी भाषिकापेक्षाही जास्त आहे मग इंग्रजीच तेवढी आंतरराष्ट्रीय कशी ?

या प्रश्नाचे उत्तर देखील लोहिया देत ते असे की भाषेचा व्यवहार हा ताकदीवर चालणारा व्यवहार आहे. ते म्हणत, की ज्यांचेजवळ तेल, मीठ, लोणी, तांदूळ या सोबतच बंदुका, टँक,

हायड्रोजन बॉंब अशी शस्त्रास्त्रे या साऱ्याची समृद्धता आहे त्यांच्याच भाषेची जादू सर्वत्र मोहिनी घालते व नोकरवर्ग तिचे स्तुतिपाठ गातो, सांगतो की ती भाषा किती समृद्ध आहे.

राजकीय इच्छाच प्रबळ हवी

लोहिया भाषिक वापराबाबतच्या राजकीय इच्छेसंबंधीचे उदाहरण देताना जपानचे उदाहरण नेहमीच देत. १८७५-८० च्या सुमारास जपानने जगभर पाठविलेली मंडळी शिकून परत आली. ज्या भाषेत ती शिकून आली त्या त्या भाषेत ती व्यवहार करू लागली. जपानीत पर्यायी शब्द नसल्याचा ती बहाणा करू लागली. तेव्हा जपानने काढलेला फतवा हा जपानीतच सारा व्यवहार करण्याचा व ज्याला पर्यायी शब्द नाही ते जपानीत तसेच वापरण्याचा होता. लोकांनी तसे केले. करवून घेतले गेले.

लोहिया म्हणत की या देशातील शिकल्या-सवरल्या लोकांनी व्यवस्थित काम करावे या करिता अशिक्षित-अडाणी जनतेची शक्ती त्यांच्या डोक्यावर नेहमीच वर्चस्व गाजवीत राहिली पाहिजे.

भारतीय भाषांमध्ये पुस्तके उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करून इंग्रजी रेटणाऱ्यांना लोहियांचे उत्तर होते की पन्नास हजार लोकांची उन्हाळ्याची सुटी दोन महिन्यांनी फक्त वाढवून दिली किंवा ती त्यांना तीन ते पाच महिने करून दिली व त्यांना प्रत्येकी एक पुस्तक जरी लिहावयास दिले तरी विविध विषयावरील भारतीय भाषातील पन्नास हजार पुस्तकांची एवढ्या अल्पावधीत निर्मिती करता येणे शक्य आहे. मात्र हे करण्याची इच्छा व तयारी आहे काय हा खरा प्रश्न आहे. पुस्तके नाहीत हे दाखवायचे कारण आहे. खरे कारण पुस्तके तयारच करावयाची नाहीत असे आहे. पुस्तके लिहूनच घ्यायची झाली तर तो डाव्या हाताचा खेळ आहे असे त्यांचे म्हणणे होते.

हिंदी भाषेच्या संबंधात लोहिया तर अधिक कठोरपणे सांगत असत की इंग्रजीचे बगलबच्चे बनून हिंदीची प्रतिष्ठा वाढवू इच्छिणारे जे जे हिंदीवाले असतील ते मुळात हिंदीवाले नसून ते सामंतशाही शासनाचे एक घटक समजावेत. हिंदीची 'प्रतिष्ठा' सांभाळणाऱ्यांना ते सांगत की त्यांचे भांडण फक्त इंग्रजी व केवळ इंग्रजीशीच असावे. इतर भाषांशी नव्हे.

लोकभाषेशिवाय लोकराज्य अशक्य

इंग्रजीचा विरोध करतानाच त्यांनी हे देखील स्पष्ट केलेले होते. की भाषा म्हणून तिला आपले एक लावण्य आहे. इंग्रजी हटवण्याचा अर्थ ती ग्रंथालयातून अथवा ऐच्छिक म्हणूनही नाहीशी व्हावी असा नाही हेही त्यांनी स्पष्ट केलेले होते.

या देशातील मौलिक, मूलभूत असे चिंतन साधारणपणे एक हजार वर्षापूर्वीच थांबलेले असून से पुनः होत रहावे असे वाटत असल्यास स्वभाषेचा वापर ही त्याकरिता अधिक अग्रक्रमाची बाब व्हावयास हवी असे त्यांना वाटत होते.

इंग्रजी येत नसणाऱ्या जनतेस आपण कोणत्याच सार्वजनिक कार्याच्या लायकीचे नसल्याचा जो न्यूनगंड निर्माण होतो त्यामुळे अशी जनता सार्वजनिक व्यवहारांपासून दूर असते. याच कारणाने या देशात अल्पमतावरील अथवा सामंतशाही वृत्तीच्या राज्याची सुरवात झाली असे त्यांचे म्हणणे होते.

लोकभाषेशिवाय लोकराज्य शक्यच नाही असा त्यांचा सिद्धांत होता. हे राज्य हे लोकराज्य म्हणून त्यामुळेच अद्यापही म्हणू नये अशीच स्थिती कायम आहे.

लोहियांचे नाव घेऊन राज्यावर बसलेले नवे शासन भारतास लाभलेले आहे. लोहियांच्या भाषाविषयक विचारांना धोरणात्मकता ते तरी प्रदान करू शकणार आहेत काय ? तसे झाल्यास लोकभाषेच्या, पर्यायाने लोकराज्याच्या कल्पनेला खऱ्या अर्थाने या देशात सुरुवात करता आली असे म्हणता येईल.

■

ललित साहित्यातील भाषिक आविष्करण

: वसंत आबाजी डहाके

ललित साहित्य हा भाषिक आविष्कार असतो. ललित साहित्यात समाविष्ट होणारे कविता, कथा, कादंबरी, नाटक इत्यादी आविष्कार भाषिक घटना असतात. भाषा हेच या भाषिक कृतींचं द्रव्य, माध्यम, साधन असतं. ॲरिस्टॉटलनं म्हटलं आहे, "...दुसरीही एक कला आहे. ती फक्त भाषेच्या साहाय्याने अनुकृती करते..." अर्थात ही कला म्हणजे साहित्यकला होय. शिल्पकलेत दगड, चित्रकलेत रंग, संगीतकलेत स्वर यांना जे स्थान असतं तेच साहित्यकलेत शब्दांना असतं, भाषेला असतं. अर्थात दगड किंवा रंग याप्रमाणे भाषा निर्जीव नसते तर "ती स्वतःच एक मनुष्यनिर्मिती असते आणि मनुष्याच्या सांस्कृतिक वारश्यानं भारलेली असते" असं वेलेक आणि वॉरन यांनी म्हटलेलं आहे.

साहित्यात वापरली जाणारी भाषा आणि मनुष्य व्यवहारात वापरतो ती भाषा एकच असते की वेगळी असते असा प्रश्न करण्यात येतो. तसेच कवितेची भाषा, कादंबरीची भाषा, नाटकाची भाषा या वेगवेगळ्या असतात की नाही? व्यवहाराची भाषा वेगळी व साहित्याची वेगळी, कवितेची वेगळी आणि कादंबरीची वेगळी अशी उत्तरेही दिली जातात. व्यवहारात देखील माणसं एकच एक भाषा वापरतात असं दिसत नाही. एखाद्या प्रमाणभाषेच्या विविध बोली असतात. तसेच वेगवेगळ्या वर्गातील, व्यवसायातील; सामाजिक, आर्थिक स्तरातील माणसं वेगवेगळ्या बोलीचा उपयोग करताना दिसतात. काही व्यवसायातील लोकांची तर खास गूढ अशी भाषाही असते. उदाहरणार्थ घोड्यांच्या दलालांची अथवा शेअरबाजाराची. सर्वसामान्य मनुष्यही बोलताना वर्णाचा नाद, शब्दांचं वजन आणि अर्थ यांचा कुशलतेनं उपयोग करतो, शब्दांच्या लक्षणा आणि व्यंजना या शक्तींची नावं त्याला माहीत नसतील, परंतु त्या शक्तींची जाणीव त्याला काही प्रमाणात असते. आपलं बोलणं सुंदर आणि अर्थपूर्ण असावं याचा तो प्रयत्नही करतो. मग व्यवहारात वापरली जाणारी भाषा आणि साहित्यात वापरली जाणारी भाषा एकच असते का? वेगवेगळ्या भाषा नसतातच का? गंगाधर पाटील म्हणतात, "एकच भाषा अस्तित्वात असते. तीच विविध प्रकारची कार्ये करीत असते." विज्ञान, व्यवहार आणि साहित्य असा भाषेचा त्रिविध उपयोग होताना दिसतो. तसेच साहित्यातही प्रकारागणिक भाषेची वेगवेगळी रूपं आपल्याला दिसतात.

व्यवहाराची भाषा आणि साहित्याची भाषा यातला मुख्य फरक म्हणजे व्यवहारातल्या एखाद्या कृतीशी, घटनेशी ती निगडित असते, तर साहित्याची भाषा साहित्यप्रकाराशी निगडित असते. त्या साहित्यकृतीत घटना किंवा कृती असतील आणि त्यांच्याशी निगडित भाषा अगदी व्यवहारातली असू शकेल. तरी आपण कादंबरी वाचीत आहोत अथवा नाटक, हे भान सतत असतं. व्यवहाराच्या भाषेतही काही प्रमाणात नाद, लय, आघात असू शकेल, पण कवितेच्या भाषेसारखी ती नसते हे आपल्याला जाणवत राहतं. दुसरं म्हणजे व्यवहाराच्या भाषेला तात्कालिकतेचा संदर्भ असतो तर साहित्याच्या भाषेला कालातीततेचा. व्यवहाराची भाषा व्याकरणाच्या नियमांनी बांधलेली असते, साहित्याची भाषा नियमांचे उल्लंघन करते. व्याकरणापलीकडे ती जाते आणि शब्दातील अर्थाचा विस्तार करते.

'झाडं पानात येतात'– पु. शि. रेगे यांच्या या ओळीत आणि 'मुलं वयात येतात' या वाक्यात रचनेचं साम्य आहे, परंतु रेग्यांच्या ओळीचा अर्थ आणि दुसऱ्या वाक्याचा अर्थ यांच्या जातीत फरक आहे. पु. शि. रेगे यांनी मराठी भाषाव्यवहारातूनच शब्द वेचले, मात्र त्यांची मांडणी व्याकरणिक नियमानुसार केलेली नसून काव्याच्या नियमानुसार केलेली आहे. भाषेचा कलात्मक उपयोग जेव्हा

होतो तेव्हा ती भाषा व्यवहाराच्या भाषेहून निराळी होते.

ललितसाहित्याच्या भाषेचा विचार करताना वा. ल. कुलकर्णी यांनी, अनुभव, तो अनुभव व्यक्त करणारं व्यक्तिमन आणि वाङ्मयप्रकार असा, विविध प्रकारे करावा असं म्हटलं आहे. एखादा अनुभव, कलात्म अनुभूती वाङ्मयाचा प्रकार निवडते आणि भाषाही निवडते. म्हणजे एखाद्या अनुभूतीचा आविष्कार कवितेतून तर दुसऱ्या एखाद्या अनुभूतीचा कादंबरीतून होईल. कवितेची भाषा कादंबरीच्या भाषेहून निराळी असेल. एखाद्या मानवसमाजानं कवितेसाठी भाषेचा कसकसा उपयोग केला आहे हे त्या भाषेच्या व साहित्याच्या परंपरेत लिहिणाऱ्याला साधारणपणे ठाऊक असतं. छंद, अलंकार, प्रतिमा यांची त्याला जाणीव असते. तो आपल्या कृतीत परंपरा अनुसरतो अथवा काही प्रसंगी ती मोडतो आणि नवं काही घडवतो. ललित साहित्याच्या भाषेत ती वापरणाऱ्या व्यक्तिमनाचा ठसाही उमटतो. त्यामुळेच आपण केशवसुतांची भाषा, बालकवींची भाषा, कोल्हटकरांची भाषा असे शब्दप्रयोग करतो. वाङ्मयप्रकारानुसारही भाषेची भिन्नता गृहीत धरली जाते. परंतु या सीमादेखील अस्पष्ट होतात. कथा की ललितलेख, कविता की कथा, एकांकिका की कविता असे प्रश्न त्या त्या प्रकारातील रचना वाचताना पडतो. म्हणजे कवितेची आणि कथेची भाषा यात निश्चित असं वेगळेपण उरत नाही. "काव्यात्म गद्य भाषे"चा उल्लेख करताना ती मुक्तछंदातील गद्यसदृश कवितेहून निराळी कशी ते दाखवता येईलच असं नाही. तथापि ललित साहित्यात भाषा कशी अवतरते हे काही उदाहरणांनी पाहता येईल. कवितेची भाषा प्रतिमांची, कथा-कादंबरीची निवेदनाची तर नाटकाची भाषा संवादांची असं ढोबळ वर्गीकरण करता येईल. कवितेतील शब्दांना नाद आणि ओळींना लय, कथाकादंबरीतील निवेदनपर वाक्यातून रूपवर्णन आणि भावप्रकटन या दोन्ही गोष्टी आणि नाटकातील संवादांना उत्स्फूर्तता आणि सहजता असावी अशी अपेक्षा असते. प्रत्यक्षात या सीमारेषा फार दृढ असतात असं नाही.

काही उदाहरणं पाहू या :

मी सजवला माझा महाप्राण अभावाच्या
आभूषणांनी, अभावाची आकर्षक वस्त्रं चढवली
त्याच्यावर, दिली असंख्य निश्वासनं
आणि नसतेपणाच्या एका ऋतूत
केला गृहप्रवेश शून्याचा उंबरडा ओलांडून

मनुष्य म्हणजे मातीत वळवळणारी इवलाली अळी
ह्या पृथ्वीवर असा कुणी नसेल
ज्याच्या स्वप्नाची अखेर नाही झाली राखरांगोळी

अंगावर कुऱ्हाड पडली तर तिची धार
रक्तानं ओली होणार नाही,
असं आयुष्य मरत आलं,
तरी तुमच्या जिभेतलं विष मात्र जात नाही
ती तडकल्याप्रमाणं म्हणाली.

वरील उदाहरणं कविता, नाटक आणि कथा यातून घेतलेली आहेत. परंतु त्या त्या वाङ्मयप्रकाराचा काहीएक वेगळेपणा यातून जाणवतो असं दिसत नाही. उलट ही तिन्ही उदाहरणं मुक्त छंदातल्या कविताच होत असं वाटतं. मात्र या तिन्ही उदाहरणांत भाषेचा कलात्म उपयोग झालेला आहे. व्यवहारातल्या भाषेचाही कलात्म उपयोग करता येतो. उदाहरणार्थ :

पाय चेपू का ? मी म्हणतो नको
चष्म्याच्या डाव्या काचेतून तिचा डोळा दिसत
नाही फक्त एक उघडी खिडकी आकाशाची मळभ
कदाचित पक्ष्याचा एक ठिपका तरळून जातो.
हवेतल्या हवेत रामदास कागदी लाथा झाडतो.
जन्म दुःखाचा अंकुर जन्म शोकाचा सागर
जन्म भयाचा डोंगर चळेनासा
आई परत जाते व रामदासाला मांडीवर घेते

व्यवहाराच्या भाषेचा क्रम अनुसरत असताना कवी तो सोडून देतो आणि शब्दांची मांडणी अपरिचित वळणानं करू लागतो. साहित्याच्या भाषेतील सांकेतिकता व्यवहाराच्या भाषेमुळे मोडली जाते आणि व्यवहाराच्या भाषेचा कलात्मक उपयोग केल्याने तिच्यातली सपाट आणि एकेरी मांडणी नष्ट होते. साहित्यामुळे व्यवहाराची भाषा

समृद्ध होते, तशीच साहित्याची भाषा व्यवहाराच्या भाषेच्या प्रयोगानं नित्य नवी कांती धारण करते. पुष्कळदा खोटी काव्यात्मकता टाळण्यासाठी ओबडधोबड मांडणीही कलात्मक ठरते. मर्ढेकरांच्या कवितेत हे दिसून येतं.

साहित्याच्या भाषेविषयी संस्कृत साहित्य-शास्त्रानं बराच खोल विचार केलेला आहे. विशेषत: अलंकारविचार, औचित्यविचार आणि व्यंजनविचार या संदर्भात. तंतुवाद्याच्या मधुर झंकारासारखी अर्थाचे अनुसरण करणारी भाषा साहित्याची भाषा असते. अनेक अर्थव्यंजक शब्दांनी ती बनलेली असते. लोकव्यवहाराच्या भाषेतून ती अगदी वेगळी असते असं नाही तर ती लोकव्यवहाराचीच भाषा अनेक अर्थाचं सूचन होईल अशा प्रकारे योजलेली असते. ही अनेकार्थता सौंदर्याची प्रतीती घडवते. वाक्यरूप अर्थ आणि व्यंगरूप अर्थ असा हा भेद आहे. साहित्याची भाषा व्यंगरूप अर्थ व्यक्त करणारी असते.

कविता, कथा-कादंबरी आणि नाटक यात वाक्यांची मांडणी वेगवेगळ्या प्रकारे होत असते, परंतु भाषेच्या बाबतीत काही मूलभूत भेद असतो असं म्हणता येत नाही. या साऱ्या कृतींचं द्रव्य भाषा हेच असतं आणि ती भाषा साहित्याची, व्यंग्यार्थसूचक भाषा असते. लेखकाच्या व्यक्ति-मत्त्वानुसार, पात्रांच्या परिकल्पनेनुसार अथवा अनुभवाच्या आकारानुसार ती वेगवेगळी रूपं धारण करते येवढंच फार तर म्हणता येईल. साहित्याच्या भाषेचा अभ्यास करताना कालखंडा-नुसार पडत गेलेला फरकही दिसून येतो, तसंच काही युगप्रवृत्तीनुसार देखील. उदाहरणार्थ, नव-काव्याची भाषा, दलित साहित्याची भाषा इत्यादी. पंडितकवितेच्या भाषेहून नवकाव्याच्या, दलित काव्याच्या भाषेचं निराळेपण दाखवता येईल. त्याचप्रमाणे एकाच कालखंडात लिहिणाऱ्या इंदिरा संतांच्या कवितेची भाषा आणि बहिणाबाई चौधरींच्या कवितेची भाषा यातला भेद पाहता येईल. तथापी, साहित्याची भाषा म्हणून या विविध भाषा-आविष्कारात मूलभूत भेद आहे असं म्हणता येणार नाही.

■

विदर्भातील महत्त्वपूर्ण पुरावशेषाची सूची

श्रीपाद केशव चितळे

विदर्भ विषय: सारस्वति जन्मभू: असे म्हटले जाते. संस्कृत नाटके, कादंबऱ्या, हस्तलिखिते इत्यादी साहित्यसंपदा डोळघाखालून घातली की याची प्रचीती येते. विदर्भाची प्राचीनता थेट वैदिक काळापर्यंत मागे नेता आली आहे. मात्र विदर्भाच्या प्राचीन कलावैभवाकडे दुर्लक्षच होत राहिले असे दिसते. विदर्भ संपन्न आहे, पण तो कलासमृद्ध होता का याकडे मात्र कुणी लक्ष दिल्याचे दिसत नाही. याचे उत्तर पुरातत्त्वीय (Archaeological Exploration) समन्वेषणच देऊ शकते. चिकित्सक समन्वेषण (Systimatic Exploration) हा पुरातत्त्वाचा आत्मा आहे असे माझे गुरू कै. पद्मश्री डॉ. वि. श्री. वाकणकर म्हणत. ते सांगत, पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासाची मनापासून गोडी असेल तर सर्वप्रथम त्या अभ्यासकाने तो ज्या भौगोलिक मर्यादेत राहत असेल तेथील खेडोपाडी; डोंगरदऱ्याचे, घनदाट अरण्याचे, गिरीकंदराचे, प्राचीन मंदिर–वास्तूच्या परिसराचे कसून समन्वेषण करून सर्व प्रथम पुरावशेष कॅमेऱ्यात पकडला पाहिजे. नंतर त्याचा चिकित्सक तुलनात्मक अभ्यास केला पाहिजे. इतर तज्ञ मंडळींबरोबर चर्चा करून संशोधनाचे निकष लावून स्वत:चे मजबूत असे अनुमान तयार केले पाहिजे. या संदर्भात विद्यार्थ्यांना ताकीद देतांना ते म्हणत की, दिवसेंदिवस भारतवर्ष प्रगतीच्या सूर्याकडे वाटचाल करीत आहे. गतिमान कारखानदारी युगात जमिनीचे पट्ट्यांच्या पट्टे उघडे होत आहेत. भारत हा अत्यंत प्राचीन भूखंड असल्याने संपूर्ण भारतच पुरावशेषांनी खच्चून भरला आहे. या अवशेषांचे नीट संरक्षण–जतन केले नाही तर ही राष्ट्रशिल्पसंपदा गहाळ होईल, नष्ट होईल.

गेली ४-५ वर्षे भरपूर हिंडून विदर्भाच्या अशाच पुरासंपदेची गोळा केलेली काही माहिती सोबत दिली आहे. सर्व पुरावशेषांची यथाचित्र माहिती देणे तर अशक्यच आहे, परंतु याची एक सूची करून ती संशोधकांना, विद्यार्थ्यांना, कलोपासकांना उपलब्ध व्हावी या हेतूने देत आहोत. या



" स्तंभशीर्ष "

चारी बाजूंना कीचकशिल्पे दिसत आहेत (दोन बाजू स्तंभाच्या मागे आहेत).

हा स्तंभशीर्ष इ. स. च्या १० व्या ११ व्या शतकातील असावा. छाया : श्री. के. चितळे हा स्तंभ महालमध्ये सी. पी. अॅण्ड बेरार व हनुमान (खिडकी) यांचे कोपऱ्याजवळ दिसतो.

चतुर्भुज मूर्ती

डाव्या हातात अश्वमुख (मृत); जंविया–कमलपुष्प व शंख ही वैशिष्टये (घड्याळाच्या काट्याच्या दिशेने Clockwise direction) ऊर्ध्वमेढ़, शेल्याचे अंकन व चेहरा निमूळता पण पूर्ण भग्न आहे. (विदर्भातील प्राचीन व वैशिष्टय-पूर्ण मूर्ती) संशोधन–छाया–श्री. के. चितळे.



क्षेत्रात अशी पुरासंपदेची सूची प्रसिद्ध करण्याचे महत्कार्य डॉ. मो. ग. दीक्षितांनी केले आहे ("म. प्र. पुरातत्त्व की रूपरेखा)" त्यांनीही कझेन्सच्या कार्याचा आधार घेतला आहे. या समन्वेषणात मला खूप लोकांची मदत झाली. त्या सर्वांचा नामोल्लेख करणे शक्य होणार नाही. तरी पण माझे स्नेही श्री. विलास कुळकर्णी, श्री. पाटणकर, श्री. पितळे, श्री. अंमईकर, श्री. मेश्राम यांची खूप मदत झाली. या सूचीत आम्ही काही तक्ते देत आहोत. त्यामधील अनुक्रम असा. सर्वप्रथम विदर्भातील प्राचीन मूर्ती, तदनंतर कृत्रिम शैलगृहे, नैसर्गिक गुंफा, स्मारकस्तंभ, मंदिरे, वास्तुअवशेष व शेवटी किरकोळ अवशेष. मूर्तीमध्ये मूर्तीचा प्रकार, आयुधे, काही वैशिष्टये असा क्रम असेल तर कृत्रिम शैलगृहात; भौगोलिक स्थान, संख्यात्मक कक्ष, पाषाणप्रकार, व शिलालेखीय उपलब्धता असा क्रम असेल. प्रत्येक पुरावशेषासाठी वेगळी प्रस्तावना देण्याचे येथे प्रयोजन नाही व त्याची आवश्यकताही नाही. ही फक्त सूची आहे. प्राचीन इतिहासाच्या अभ्यासकांना मदत व्हावी हा हेतू. माहिती स्वतः जाऊन पाहून, (१ –२ अपवाद वगळता) नंतरच दिली आहे. तथापी दिशा, अंतर, अभ्यासान्ती माझे मते ह्यामध्ये काही त्रुटी असणारच, त्याबद्दल क्षमस्व. ही विदर्भाची शिल्पसंपदा संरक्षणाचे कार्य केवळ शासनाचे नाही तर आपणा सर्वांचे आहे.

विदर्भातील प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन मूर्तींची सूची–तक्ता क्र. १

क्र.	मूर्तीचा प्रकार	मूर्तीची वैशिष्ट्ये
	भंडारा जिल्हा	
१.	श्रीगणेशरूपी भृशुंडी शिल्प	चतुर्भुज, उंची १० फूट ४ इंच, शिरोभागी जटामुकुट, चेहऱ्यावर मिशा, भ्रूमध्यशुंडीत सुखासन, मूर्ती पूर्ण शेंदराने माखली आहे.
२.	सरस्वती (पद्मपूर)	चतुर्भुज, उंची ४ फूट ७ इंच, पाषाण काळा चकचकीत, वीणा, ताडपत्र व कमलपुष्प हातात आहे. पादपट्टावर देवनागरीत शिलालेख आहे. त्याचे वाचन आम्ही (रा) मरायण पुत्रभट्ट(द्र) देव असे केले आहे.
३.	हयग्रीव (संशोधन सुरू आहे. हयग्रीव असावी.)	चतुर्भुज, उंची ३ फुट ७ इंच, पाषाण लालसर रवाळ सच्छिद्र (Porous), जबीया, शंख, अश्वमुख (मृत-राक्षस हयग्रीव) व कमलपुष्प. मुखमंडल भग्न पण अश्वानुरूप समोर निमूळते असे दिसते.
४.	चतुर्विंशतिका-चोवीसी	एकाच शिळेवर मध्यभागी तीर्थंकर व इतर बाजूंना ४–३–२ च्या रेषेत सभोवताल २३ तीर्थंकर. नाग अस्पष्ट दिसतो. मूर्ती पट्टाची. उंची ४ फूट ७ इंच. प्रस्तर लालसर सच्छिद्र.
५.	स्त्री-शिल्पे	२ स्त्री शिल्पे, द्विभुज असल्याने मानवी आहेत. वेशभूषा, केशभूषा, त्रिभंगात उभी राहण्याची पद्धत, शिरोमुकुट अंलकरण युक्त, मंदिराच्या बाहेरही खंडित शिल्पे आहेत.
६.	श्री विष्णू	चतुर्भुज, उंची ३ फूट ८ इंच, प्रस्तर लाल चकचकीत शंख, चक्र, गदा, पद्म, समभंग, अलंकरण युक्त.
७.	लज्जागौरी	मस्तकविहीन उत्तानपाद नग्न देवीची मूर्ती. जंघा, स्तन शिल्पित केले आहे. योनी व स्तन–मातृदर्शक. उंची १॥ फूट, प्रस्तर राखडी.
८.	पार्श्वनाथ	मूर्तीचा शिरोभाग भग्न (पण मस्तक बाजूला पडले आहे) वक्षस्थलावर श्रीवत्स चिन्ह. शिरोभागी ७ फणाचा नाग, कान लांब, उभय बाजूस हस्ती अभिषेक, कमलावर पर्यंकासन.

भौगोलिक स्थान	कालमापन (अंदाजे) Approximately
भंडारा गावाच्या पूर्वेस ६ कि. मी. मेंढा नावाचे ग्राम आहे. येथे मूर्ती आहे. श्रीमंत भोसलेकालीन देवालयात आहे.	कालनिर्णय–इतर (तुलनात्मक, अंदाजे) पुरावशेषांच्या अभ्यासावरून अंदाजे इ. स. चे १२-१३ वे शतक.
आमगांवाच्या जवळ पद्मपूर या प्राचीन गावी. एका मंदिराच्या (राधाकृष्ण) प्रदक्षिणापथावर आहे.	शिलाक्षराच्या अक्षरवाटिकेवरून इ स. चे १० वे शतक अंदाजे असावे. (टीप–अशीच १ स्त्रीप्रतिमा शेतात एका वृक्षाखाली पडली आहे. खूप झिजली आहे)
भंडारा गावात खांब तलावाशेजारी नीलकंठेश्वर मंदिरासमोर आहे.	विष्णू अवतार, ऊर्ध्वमेढ शेल्याचे अंकन..यावरून अंदाजे इ. स. चे ५–६ वे शतक (अद्याप संशोधन सुरू आहे.)
भंडारा गावात खांब तलावाशेजारी शीतलामातेच्या मंदिरात सिमेंटमध्ये पक्की केली आहे. बाजूला इतर जैनशिल्प पट्ट आहे.	अंदाजे ४००–५०० वर्षे प्राचीन म्हणजे इ. स. चे १४ वे १५ शतक.
,, ,, ,,	राष्ट्रकूट कालखंड म्हणजे इ. स. चे ९ वे शतक अंदाजे शिल्पसाम्य वेरूळ स्त्री–प्रतिमेशी दिसते.
भंडारा गावाजवळीक मेंढा या गावी गोसाव्यांच्या समाधीजवळ.	यादव कालखंड इ. स. चे १३ वे शतक
भंडारा जिल्ह्यात नागरा या गावी एका घुमटीत स्थित आहे. येथे उत्खननात भाजक्या विटांचे मंदिर आढळले आहे.	इ. स. चे ९ वे १० वे शतक अंदाजे.
आमगाव जवळ पद्मपूर येथे एका शेताच्या बांधावर आहे.	मध्ययुगीन कालखंड इ. स. चे १० वे ते १२ वे शतक.

क्र	मुर्तीचा प्रकार	मूर्तीची वैशिष्टचे
९.	श्री विष्णू	मूर्ती चतुर्भुज, मूर्तीसन्मुख आहे, शंख, चक्र, गदा, पद्म उभय बाजूस सेवक, सेविका, त्यांच्या हातात चवया (चवऱ्या) एका शिळेचा हा मध्यपट्ट असावा. सैकत प्रस्तराची मूर्ती आहे.
१०.	चतुर्भुजदेव-द्विभुज देवी	उंची २ फूट १० इंच हातात शुळ व गदा. देवीच्या हातात कलश, उजवा हात मोकळा.
नागपूर जिल्हा		
१.	भैरवमूर्ती	प्रचंड, शरीर पीळदार रसरशीत व सौष्ठवपूर्ण मूर्ती; ६ फूट उंच वलय, नागपाश, डमरू, नरमुंड, फळ' खडग्, अंकुश, त्रिशुळ, नरमुंडस्त्राव, रक्तपानास कुत्रा उत्सुक, शिरोमुकुट उभय बाजूस दोन शक्तिगोरीका दिदिनीका.
२.	गणेशमूर्ती	ओबडधोबड, लाल, वालूकाश्म, चतुर्भुज, डाव्या हातात वर्तुळाकार गोळयांची उतरण. सोंड किंचित वाकलेली ही मूर्ती कदाचित नवग्रहपट्ट गणेशमूर्ती असावी.
३.	सूरसुंदरी किंवा यक्षिण	ही मूर्ती स्त्रीची (मादी) वाटते, पण उरोज व शरीराची ठेवण पाहून माकडीण असावी असा भास होतो. पण ही कदाचित सूरसुंदरी किंवा यक्षिणी असावी.
४.	सुर्यमूर्ती	उंची ३ फूट ७ इंच, काळा पाषाण, मुकुट, चतुर्भुज. ही मूर्ती खूपच भग्न असून प्रथमदर्शी नृसिंहाची वाटते दोन हातात कमलपुष्पे, दोन हात भग्न आहेत. उभय बाजूंना एक एक धावता घोडा दाखविला आहे (भग्न)
५.	नाग (पंचमुखी)	उंची ४ फूट ७ इंच, पाषाण राखडी, गुळगुळीत, पिवळसर झाक. वेटोळे ७, पाच मुख, त्यावर ५ मुकुट, ५ नेत्रजोडचा, मूर्तीच्या बाजूला २ छिद्रे, मूर्ती अडकविण्यासाठी.
६.	अष्टभुजा देवी	लालसर ठिपक्यांचा प्रस्तर, उंची २ फूट २ इंच, अष्टभुजा-सिंहवाहिनी. आयुधे स्पष्ट दिसत नाही. मूर्ती एका विहिरीत आहे (पायऱ्यांची विहीर) बाजूला २ कड्या. येथे झुलता पूल असावा. (टीप : नगरधनच्या तलावाशेजारच्या शिवालयातील वृक्षाखाली प्रतिमा. स्थानिकांनी कुबेर प्रतिमा असल्याचे सांगितले)

भौगोलिक स्थान	कालमापन अंदाजे (Approx)
आमगाव जवळ पद्मपूर येथे एका प्रचंड खडकावर ही मूर्ती आहे. खडकावर शिडी लावून चढावे लागते.	मध्ययुगीन कालखंड इ. स. चे १० वे ते १२ वे शतक.
आमगावच्या जवळ पद्मपूर रस्त्यावर एका टेकडीवर आहे. हिला भवभूतीची टेकडी म्हणतात.	मध्ययुगीन कालखंड इ. स. चे १० वे ते १२ वे शतक.
नागपूर जिल्ह्यात श्रीगणेशक्षेत्र आदाशाला एका वृक्षाखाली आहे. तेथे काही इतरही भग्न मूर्ती आहेत.	राष्ट्रकुट कालीन इ. स. चे ९ वे, १० वे शतक.
नागपूर जिल्ह्यात मांढळ तलावाच्याकाठी झाडीत आहे. राष्ट्रीय विद्यालयाच्या बाजुचा तलाव.	गोंड कालीन (अशा मूर्ती श्रीमंत गोंड–भोसले कालीन अनेक मंदिरात आढळतात) इ. स. चे १५ वे शतक.
नागपूर जिल्ह्यात मांढळ तलावाच्या काठी झाडीत आहे. राष्ट्रीय विद्यालयाच्या बाजूचा तलाव.	मध्ययुगीन इ. स. चे ११ वे, १२ वे शतक अशीच १ भव्य मूर्ती आरमोरी, जि. गडचिरोली येथे आहे.
रा. स्व. संघ कार्यालय (महाल संघ बिल्डिंगच्या) बाजूला असलेल्या हनुमान मंदिरात आहे. इमारती मागे एक वराहही आढळतो.	कै. डॉ. वाकणकरांचे मते ही परमारकालीन मूर्ती असावी (मूर्ती खूपच भग्न आहे.) इ. स. चे १२ वे शतक.
महालमधील श्रीमंत भोसले यांचे राजवाड्याच्या बाजूला श्रीलाडसांवगीकर यांचे घराच्या अंगणात. टीप : येथे दरवाज्याजवळ अजून एक पुरुष प्रतिमा आहे. पण ती अर्वाचीन, खूपच अलीकडची वाटते.	श्रीमंत गोंड नृपतीचे किंवा श्रीमंत भोसले यांचे काळातील. इ. स. चे १६ वे, १७ वे शतक.
नागपूर जिल्ह्यात रामटेकजवळ नगरधनच्या किल्ल्यातील मोठ्या बावडीच्या दुसऱ्या मजल्यावर एका विथिकेच्या (Gallary) मध्यभागी स्थानापन्न आहे. मूर्ती सुबक आहे.	यादवपूर्व कालीन म्हणजे इ. स. चे ११ वे किंवा १२ वे शतक

क्र.	मूर्तीचा प्रकार	मूर्तीची वैशिष्ट्ये
७.	भवानी माता	आज देवीचे केवळ खांद्याच्या वरचे मुखकमल दिसते. करंड, मुकुट, कानात कर्णभूषणे, डोळे बटबटीत, चेहऱ्यावरील भाव रुद्र. साम्य माहूरची रेणूका, अमरावतीची अंबाबाई व कोराडीची एकवीरा ह्या मूर्तीशी.
८.	नंदीराज शिल्प	अतिशय सुंदर, सुबक व आकर्षक नंदी, संगमरवरी प्रस्तराचा. पाय दुमडलेले, गळ्यातील घंटा, वेसण झूल गळसरी व चेहऱ्यांचे भाव जिवंत वाटतात. समोर नंदीचा मालक पावा वाजवतोय, मानवमूर्तीही सुंदर कोरली आहे. इतका सुंदर नंदीराजशिल्प संपूर्ण विदर्भात नाही. (वणीचा नंदीही सुंदर आहे. पण ही मूर्ती आगळीच.
९.	पार्श्वनाथ	उंची १ फूट १० इंच, पाषाण लालसर पण अत्यंत ठिसूळ (Britille) पद्मासन, शिरोभागी ५ फणांचा नाग. मूर्तीच्या उजवीकडेही एक प्रतिमा दिसते पण ओळखता मात्र येत नाही. शेंदूर फासल्याने स्वरूप निश्चित कळत नाही. पण मूर्ती मुळात सुंदर असावी.
१०.	कीचक युक्त स्तंभशीर्ष	हा स्तंभशीर्ष म्हणजे नागपूरच्या प्राचीनतेचा अत्यंत महत्त्वपूर्ण पुरावा होय. स्तंभाच्या ४ ही बाजूंना चतुर्भुज कीचक शिल्प आहे. हे कीचक (महाभारतीय राक्षस नव्हे, देवता आहे ही) आपल्या अंगावर वास्तूंचा संपूर्ण भार पेलत आहेत असे शिल्पीला दर्शवायचे आहे. अलंकार, वलय, कर्णभूषणे, कडी असे लेवून शिल्प आहे. हा स्तंभाचा वरचा भाग आहे, ह्यावर तुळी व छत असावे.
यवतमाळ जिल्हा		
१.	किरातार्जुनीय शिव (अनुग्रह मूर्ती)	उंची २ फूट ८ इंच, पाषाण रंग दिल्याने मूळ स्वरूप कळत नाही. चतुर्भुज–डाव्या हातात धनुष्य व डमरू (नादब्रह्म) उजवे २ हस्त अनुक्रमे खड्ग व त्रिशूळधारी; कपाळावरील नेत्र उभा (कुषाणकाळात तो आडवा असतो), शिवाने उजवा पाय आक्रमकतेने पुढे टाकला आहे. मूर्ती अर्जुनावरील अनुग्रह दर्शविते.
२.	पार्वती शिल्प (भग्न)	मूर्ती आज ४ फूट ८ इंच पण कंबरेपासून भग्न. पाषाण वालुकायुक्त सच्छिद्र. हे शिल्प खूपच भव्य आहे. करंड मुकुट, व इतर अलंकार, भव्य रसरशीत शिल्प. सर्वत्र यादवकालीन किंवा यादवपूर्वकालीन मंदिराचे अवशेष, आमलक स्पष्ट दिसतो.

मूर्तीचे भौगोलिक स्थान	कालमापन अंदाजे (Approx)
नागपूर जिल्ह्यात भंडारा रोडवर पार्डी नावाचे गाव आहे. तेथून डावीकडे पूनापूर हे गाव आहे, ह्या गावाशेजारी मूर्ती आढळली आहे.	श्रीमंत भोसलेकालीन इ. स. चे १८ वे शतक
नागपूर जिल्हा–काटोल तालुका मेटपांजरा रेल्वे स्थानकावर उतरून उत्तर दिशेस ६ कि मी. जांमुळझरा नावाचे खेडे आहे. तेथे एका शिवालयात हा नंदी स्थित आहे. देवालय भोसलेकालीन आहे.	एकंदर मंदिर व स्थानिक वास्तुशिल्पाचा अभ्यास करता नंदी फार जरी प्राचीन नाही तरी आजपासून २००–२५० वर्षे तरी जुना असावा. इ. स. चे १७ वे १८ वे शतक.
नागपूर जिल्हा, भिवापूर तालुका जवळील ग्राम येथे गोबर गॅससाठी खड्डा खणताना श्री. देवरावजी डवरे यांना आढळली. त्यांचे अंगणात मूर्ती आहे.	कालमापन अंदाजे इ. स. चे १४ वे किंवा १५ वे शतक. जैनशिल्पाच्या अभ्यासकांनी अभ्यास करावा ही विनंती.
नागपुरात महालमध्ये खिडकीच्या मारुतीमागे एका कोपऱ्यावर हा स्तंभशीर्ष आहे. जमिनीपासुन हा केवळ २ फूट उंच आहे. ह्या आकाराचा उत्खनन केल्यास स्वरूप स्पष्ट होईल. पण महत्त्वपूर्ण दुवा नागपूरच्या प्राचीनतेचा	इ. स. चे १० वे शतक (Decorative Motif) या संदर्भात नागपूरला महालमध्ये एका इमारतीचा पायवा खणतांना कै. डॉ. वाकणकर, श्री कुळकर्णी व श्री. चितळे यांना परमारकालीन सूर्ययुक्त मृदभांडयाचे तुकडे आढळले होते. म्हणजे नागपूरची प्राचीनता केवळ गोंड–भोसलेकालीन नाही तर त्यापेक्षा अधिक आहे. (टीप : यासाठी डॉ. विजय काकडे यांचे मार्गदर्शन लाभले.)
जिल्हा यवतमाळ, तालुका वणी, ग्राम शिरपूर (गावात खूप प्राचीन अवशेष आहेत) (पूर्वी टेकडीमागे एका खोबणीत मी स्वत: गणेश शिल्प पाहिले होते) कदाचित ह्या मूर्तीच्या पादपट्टावर शिलाक्षरे असावीत.	मूर्ती अंदाजे मध्यमयुगीन पण यादवपूर्व कालीन वाटते. इ. स. चे ११ वे ते १२ वे शतक. अभ्यासासाठी स्थानिक बँकेचे मॅनेजर श्री. उपाध्ये यांची खूप मदत झाली.
यवतमाळ जिल्हा–वणी तालुका शिरपूर गावाच्या बाहेर एका शेतात वृक्षाखाली हे सर्व तुकडे आढळले. ह्याच शिरपुरात एका बावडीत मैथुन शिल्प आहे (ते प्राचीन वाटते.)	कालखंड-भव्यतेच्या व मूर्ती अभ्यासानुसार राष्ट्रकूटकालीन वाटते इ. स. चे ९ वे १० वे शतक (या गावातच उत्खननाची आवश्यकता. (Horizontal Exavation)

क्र. मूर्तीचा प्रकार	मूर्तीची वैशिष्टये
३. नृसिंहमूर्ती	एकाच पाषाणावर उठावात, पाषाण काळसर, हिरण्यकश्यपू निर्दालन–१९६६ साली घराच्या बांधकामाचे वेळी आढळली. उंची ७ फूट (पूर्ण पाषाण, प्रत्यक्षात ५ फूट)
चंद्रपूर जिल्हा	
१. पार्वती शिल्प (उमा, गौरी, अपर्णा)	उंची २ फूट ४ इंच. काळा पण कठीण पाषाण, प्रतिमा अप्रतिम, समभंग, चतुर्भुज खालील दोन हातात अक्षमाला व कमंडलू, वरील दोन हातात अनुक्रमे शंखात लिंग व गणपती, किरीट मुकुट मूर्तीच्या उभय बाजूंना २ प्रतिमा, अत्यंत देखणी, सुंदर
२. अर्धनारीनटेश्वर मूर्ती (काही विद्वानांच्या मते) डॉ. नागलिंगाचार्य बंगलोर यांचे मते ब्रम्हा–विष्णू–महेश–एकदेही उत्पत्ती–स्थिती–लय संशोधन सुरू आहे.	मूर्ती उंची ४ फूट, वरचा भाग पुरुषाप्रमाणे व खालचा भाव स्त्रीत्वदर्शक वाटतो. मूर्ती चतुर्भुज, २ हातात डमरू, त्रिशूळ. मूर्तीच्या जवळ शंख व गदा.
अकोला जिल्हा	
३. अजितनाथ–जैन तीर्थंकर मूर्ती	उंची ३ फूट, मूर्तीच्या बाजूंना हत्ती व सिंह दिसतात. मध्यभागी रथचक्र व उभय बाजूस काही प्रतिमा. छातीवर वत्सचिन्ह. मूर्ती (लांच्छनावरून) अजितनाथाची असावी. जैन मूर्तीअभ्यासकांनी अभ्यासावी.
गडचिरोली जिल्हा	
१. किरातवेषधारिणी पार्वती	उंची ४ फूट ७ इंच. काळसर पण तांबूस वालुकाश्म प्रस्तर, मूर्ती चतुर्भुज, डाव्या हातात धनुष्य व डमरू तर उजवे दोन हस्त अनुक्रमे आशीर्वाद मुद्रेत व त्रिशूळ दंड पेलताना दिसतो. चेहऱ्यावरील रौद्र भाव, नेत्रात विजीगीषु मुद्रेची ऐट. एखाद्या विजेत्या योद्धयाप्रमाणे उभे राहण्याची ऐट. कमरेखालचे वस्त्र चर्म वस्त्र असावे. नेहमी असणारा कुत्रा मात्र दिसत नाही. मूर्ती इतकी लावण्यवती आहे की अवघ्या शरीराला नेत्र फुटावे व सर्वांगाने न्याहाळावी. इतकी सुरेख मूर्ती विदर्भात मला कुठेही आढळली नाही.

मूर्तीचे भौगोलिक स्थान	कालमापन अंदाजे (Approx.)
जिल्हा यवतमाळ–रुई ग्राम	कालखंड निश्चित ठरविता येत नाही नृसिंह शिल्प जरी विदर्भांत वाकाटककाळापासून मिळतात तरी ही मूर्ती फार प्राचीन नसावी. कर्नाटकातील हम्पी शिल्पाशी (नृसिंह) साम्य.
चंद्रपूर जिल्हा–चिमूर तालुका नेरी ग्राम. (पादपीठावर शिलालेख आहे पण त्यात कालोल्लेख नाही. फडणीसाच्या तलावाशेजारी, एका हेमाडपंथी देवळाजवळ मूर्ती आहे)	शिलाक्षराच्या अक्षरवाटिकेवरून (Style of alphabets) इ. स. च्या १२ व्या शतकातील वाटते. ही मूर्ती बाजुच्या हेमाडपंथी मंदिरातील मंडळीतील नाही हे विशेष (संदर्भ–डॉ. मेश्रामांचा लेख.
यवतमाळ जिल्हा–कळंब ग्राम (प्रसिद्ध चिंतामणी कळंब) सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी श्री. सगणे यांनी डॉ. नागलिंगाचार्यांशी चर्चा केल्यावर या विद्वानांनी ब्रह्मा, विष्णू, महेश असा निष्कर्ष काढला.	कालनिर्णय सांगता येत नाही तथापी अभ्यासानुसार प्राचीन आहे एवढेमात्र निश्चित. (मूर्ती मुंबईला नेण्यात आल्याचे कळते) त. भा.
अकोला जिल्हा–तालुका मूर्तीजापूर; राजनापूर खिनखीनी ग्राम गाव अतिशय प्राचीन, विपुल अवशेष विस्मृत उत्खननाची आवश्यकता.	जैन मूर्तीचा कालखंड ठरवितांना खूपच अडचण पडते. कारण मूर्तीची वशिष्टये निश्चित ठरलेली असतात. तथापि यादवपूर्व काळ असावा.
गडचिरोली जिल्हा–वैरागड या गावी बैलगाडीचा रस्ता तयार करीत असतांना आढळली श्री. सि. ह. क्षीरसागर यांना (२१ जानेवारी १९८७) मी या मूर्तीकडे सतत १॥ तास पहात होतो. मूर्तिशास्त्राचा विद्यार्थी म्हणून तरी मला ही मूर्ती खूपच आवडली. सर्वांगसुंदर असेच गोजिरे हिचे रूप आहे.	कालनिर्णय सुलभतेवरून करायचा म्हटला तर तो अर्वाचीन वाटतो. पण मूर्ती वैशिष्टयाची प्राचीनता या दृष्टिकोनांतून निरीक्षण केल्यास यादवपूर्व कालातील (इ. स. चे ११ वे १२ वे शतक) वाटते. श्री. पंढरीनाथ जुआरे यांचो (आरमोरी) या अभ्यासात खूपच मदत झाली.

क्र.	मूर्तीचा प्रकार	मूर्तीची वैशिष्टये
२.	सूरसुंदरी किंवा यक्षिणी ?	भव्य व विशाल प्रस्तर स्त्री-प्रतिमा, ७ फूट ८ इंच उंच. पाषाण तांबडा पण पापुद्रयाचा (Slices). पहिल्या दृष्टिक्षेपात तर ही माकडीणची (female Monkey) वाटते. गावकरीही चक्क अंजनी माता म्हणतात. पायात तोरड्या, गळयात लॉकेट सारखे पदक, हातात वलये शिरोभागी मृकुट; कर्णफुले, डोक्यावर पुच्छासारखा भाग पण एका श्रेष्ठ संशोधकाच्या मते उत्तरीयाचा उडता भाग, पृथुलनितंब, पोटावरील वळया, उन्नत उरोज मात्र मुळीच नाही. मूर्तीच्या भव्यतेवरून ही यक्षीण तर नसावी ? संशोधनास वाव आहे.

टिप:– चंद्रपूर जिल्ह्यात मांडकजवळ देवलावाडा या गावाजवळही सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. वि द. कुळकर्णी यांनी ४ मूर्ती उजेडात आणल्या आहेत (जनवाद दिनांक १६ जुलै १९८९)· या मूर्तीचा ओझरता उल्लेख श्री अ. ज. राजूरकरांनीही आपल्या चंद्रपूरचा इतिहास या ग्रंथात केला आहे (पहा चंद्रपूरचा इतिहास पृष्ठ क्र. ४१, परिशिष्ट) पण प्रत्यक्ष त्या पाहिल्या नसल्याने त्यांची वर्णने यथावकाश देईन. आता नाही. या पुढील अंकात शैलगृहे (कृत्रिम, नैसर्गिक) स्मारक स्तंभ व इतर अवशेष या बद्दल माहिती देईन.

युगवाणीला खालील विषयांवर टिपणे हवी आहेत. या व्यतिरिक्तही इतर विषयांवर देखील.

१. अलौकिकतावाद, लौकिकता आणि रसव्यवस्था
२. वाङ्मयीन अनास्थेची सामाजिक-राजकीय मीमांसा
३. शासन, साहित्यिक आणि बांधिलकी
४. सफदर हाश्मी
५. पथनाट्याचे माध्यम स्वरूप
६. मराठी नियतकालिकांची अस्तंगतता
७. निखळ वाङ्मयीन नियतकालिके
८. लिटिल मॅगझीन : भूमिका, कार्य आणि भविष्य
९. विजय तेंडुलकर
१०. साहित्यातील प्रचार आणि प्रचार-साहित्यातील साहित्य
११. महेश एलकुंचवार
१२. सौ जयश्री यत्ते–भट
१३. सत्यदेव दुबे
१४. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रातील संवाद-संकल्पना
१५. साहित्यातील संवादाचे संवादशास्त्रीय स्वरूप
१६. कलाप्रकारांचे परस्परसंबंध
१७. हुसेन
१८. हेब्बर
१९. रझा
२०. अमृता शेरगिल
२१ स्ट्रक्चरॅलिझम

मूर्तीचे भौगोलिक स्थान	कालमापन अंदाजे (Approx.)
गडचिरोली जिल्हा–आरमोरी तालुका व आरमोरी ग्राम एका हेमाडपंथी मंदिराच्या प्रांगणात. मला मात्र हे मंदिर हेमाडपंथी वाटत नाही. हे मंदिर त्याहीपेक्षा प्राचीन असावे. प्रत्येकच मध्ययुगीन मंदिराला हेमाडपंथी म्हणण्याची पद्धत दिसते, त्यातही संशोधनास वाव आहे. (ह्याच जिल्ह्यात मला वैरागडला यादवपूर्वकालीन मंदिर आढळले आहे.)	कालनिर्णय साधारणपणे इ. स. चे ११ वे १२ वे शतक असावे. मात्र ही मूर्ती विदर्भातील अत्यंत वैशिष्टयपूर्ण ठरू शकते, कारण स्त्रीत्वदर्शक पुष्ठ स्तन यात नाही.

श्रीपाद चितळे
कोठी रोड, महाल, नागपूर

॥ पुनर्विचार : शुद्धलेखनाचा ॥

[प्रश्नावली]

[अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखनाच्या नियमांमध्ये सुधारणा सुचविण्याकरिता महामंडळाने प्रा. गं. ना. जोगळेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केलेली आहे.

या समितीने आपले कामकाज सुरू केलेले असून या विषयासंबंधाने विद्वानांची मते एकत्रित करून त्यावर विचार करण्याकरिता एक प्रश्नावली तयार केलेली आहे.

या विषयावरील चर्चा युगवाणीच्या अंकातूनही वारंवार होत असतेच.

युगवाणीचे वाचक, लेखक, संशोधक, अभ्यासक शुद्धलेखनासंबंधाने वेळोवेळी विचार व्यक्त करीत असतात.

या पूर्वी १९६२ या वर्षी शुद्धलेखनाचे नियमात काही सुधारणा करण्यात आल्या होत्या. या पुढेही कदाचित पुन' साधारणपणे पंचवीस–तीस वर्षे नियम–सुधारणा संभवणार नाही. हे लक्षात घेता महामंडळाने तयार केलेली शुद्धलेखन प्रश्नावली संबंधितांच्या सोयीकरिता प्रकाशित करीत आहोत. संबंधितांनी कृपया त्यांची उत्तरे, सूचना इ. अ. भा. मराठी साहित्य महामंडळ द्वारा, मराठी साहित्य परिषद, टिळक रोड, पुणे यांचेकडे पाठवाव्या.]

[विनंती : स्वतंत्र कागदावर एकेक प्रश्न व त्याचे उत्तर असा क्रम कृपया ठेवावा.]

१. महामंडळाचे शुद्धलेखनाचे प्रचलित नियम समाधानकारक आहेत काय ? नसल्यास, कोण-कोणत्या बाबतीत सुधारणा होणे आवश्यक आहे असे आपणास वाटते ? का ?
२. "ऱ्हस्व-दीर्घ " याबद्दल मराठी लेखनात कोणते तत्त्व अनुसरावे असे आपणास वाटते ?
३. अनुस्वारांच्या लेखनाबद्दल कोणते धोरण अनुसरावे असे आपणास वाटते ?
४. " तत्सम " शब्दांचे मराठी लेखन करताना कोणती भूमिका असावी असे आपणास वाटते ? " तत्सम " या संज्ञेत केवळ संस्कृतचा अंतर्भाव करावा की अन्य भाषांचाही ?
५. लेखन उच्चारानुसारी असावे असे आपणास वाटते का ? नसल्यास का नाही ?
६. परसवर्णांच्या लेखनाच्या बाबतीत काय धोरण असावे असे आपणास वाटते ? परसवर्णांचा विकल्प ठेवावा की ठेवू नये ?
७. जोडाक्षरांच्या लेखनाबाबत कोणते धोरण असावे असे आपणास वाटते ? उदाहरणार्थ, खालीलपैकी कोणते लेखन आपणास योग्य वाटते ? का ? (क्रम-क्रम-क्रम-क्‌रम), (शुद्ध, शुद्‌ध), (सल्ला, सल्ला सल्‌ला), (भक्त, भक्त, भक्‌त)
८. दंतमूलीय व्यंजने (उदा–चमचा, जहाज, झरा) आणि तालव्य व्यंजने (उदा.–चमत्कार, विजय, झवक) यासाठी सध्या एकच लेखनचिन्ह वापरते जाते. ही स्थिती बदलावी असे आपणास वाटते काय ? असे असल्यास कोणत्या उच्चारांसाठी कोणती चिन्हे आपण सुचवू इच्छिता ?

९. व्याकरणविषक घटकांना लेखननियमात स्थान द्यावे असे आपणास वाटते काय? (उदा.–अनेकवचन, सामान्यरूप, सामासिक शब्द इ.) असे स्थान देऊ नये असे आपणास वाटत असल्यास त्यांची कारणे कोणती?

१०. मराठी लेखनाच्या दृष्टीने देवनागरी लिपीत काही बदल (किंवा सुधारणा) करणे आपणास आवश्यक वाटते काय? असल्यास कोणकोणते बदल आपण सुचवू इच्छिता?

११. मराठीसाठी रोमन लिपीचा स्वीकार करावा असा काहीजणांचा प्रयत्न आहे. यासंबंधी आपली भूमिका काय आहे? रोमन लिपीचा स्वीकार करावा किंवा करू नये असे आपले मत असल्यास त्याची कारणे कोणती?

१२. लेखनाच्या नियमात काही बदल (किंवा सुधारणा) केल्यास नवे नियम किमान किती काळ राबवावेत, असे आपणास वाटते?

१३. प्रश्नावलीतील वरील कलमांखेरीज आपणास शुद्धलेखन, देवनागरी लिपी इ. बाबतीत काही सुचवावयाचे आहे काय? (कृपया आपल्या सूचना तपशीलवार द्याव्या.)

लेखकांसाठी सूचना

१. मजकूर कागदाच्या एका बाजूने लिहिलेला व सुवाच्य असावा.

२. पुरेसे पोस्टेज नसलेले लेखन परत केले जाणार नाही. स्थळप्रत ठेवावी, नाहीतर पुरेसे पोस्टेज पाठवावे.

३. कवितेची पोच दिली जात नाही. निर्णयही दिला जाणार नाही. तीन अंकापर्यंत कविता न आल्यास ती अस्वीकृत आहे असे समजावे. कवितेसंबंधी कुठलाही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही.

४. अनाहूत लेख, कथा, ललित वा वैचारिक निबंध ह्याबाबत निर्णय हवा असल्यास पत्ता लिहिलेले एक पोस्ट कार्ड पाठवावे. गद्याबाबत निर्णय कळवल्यानंतरही, तावडतोब प्रसिद्ध होईलच असे नाही. यथावकाश प्रसिद्ध होईल.

५. अनाहूत समीक्षणे प्रसिद्ध होणार नाहीत. 'युगवाणी' कडून मागवली गेलेली समीक्षणेच प्रसिद्ध होतात.

६. 'युगवाणी' साहित्यप्रेमाला, साहित्याला मोकळी वाट देते. पण ते साहित्य अभिरुची संपन्न असावे.

सुप्रसिद्ध कथाकार श्री. योगेंद्र मेश्राम यांची 'माझं गाव कुठाय ?' ही अलीकडची कादंबरी दलितांच्या सामाजिक चळवळींना 'व्यास' करून ग्रामीण जीवनाच्या सामाजिक पार्श्वभूमीवर पिढयान् पिढयापासून चालत आलेला संघर्ष हा या कादंबरीचा विषय आहे. तो तेवढयाच सामर्थ्याने योगेंद्र मेश्रामांनी चित्रित केला आहे. रूढिवादी आणि बुद्धिवादी, जातिभेदवादी आणि अभेदवादी किंवा सुष्ट-दुष्ट, ढोंगी-प्रांजळ, स्थितीप्रिय-परिवर्तनवादी अशा परस्परविरुद्ध दोन प्रवृत्तींमध्ये चालत आलेला संघर्ष एकामागोमाग एक अशा परिणामकारक घटना-प्रसंगातून ताकदीने व जिवंतपणाने उभा झाला. अभिव्यक्तीचीही ताकद इथे दाद घेऊन जाते अंतर्मुख करते. मेश्रामांचे समाजजीवनाचे सूक्ष्म अनुभव-निरीक्षण आणि माणसांच्या स्वभावाचे वेगळाले नेटके रेखाटन त्यातून पाहण्यासारखे आहे.

मुखपृष्ठ-चित्रही, सुंदर, आकर्षक. त्यात दलित जीवनाचे मूर्तिमंत काव्य आहे. पण या बाह्य सौंदर्याप्रमाणेच कादंबरी खरी सुंदर आहे, ती तिच्या अंतरंगाने अंतर्बाह्य एक देखणं रूप तिला लाभलेले आहे. त्यावर काही लिहिण्यासाठी प्रत्यक्ष लेखकाबरोबर बोलणं करावं, त्यातून कादंबरीची मुळातून उकल होईल, असे वाटले. योगेंद्र मेश्रामांची भेट घडवली. चर्चा केली. अगदी सहज केलेली 'चर्चा' चांगलीच रंगली. ती अशी :

प्रश्न : [प्रा. लिहितकर]-कादंबरीचं-'माझं गाव कुठाय ?' हे नाव अर्थपूर्ण आहे. त्यामागे दलित-जीवनाचा भक्कम संदर्भ आहे. पण त्यातला नायक आपल्या गावाचा शोध घेण्यापेक्षा समाज-जीवनाचा, माणुसकीच्या तत्त्वाचा-प्रवृत्तीचा म्हणा, अधिक बारीक शोध घेतो, असे वाटते. 'माझ्या गावाचा' शोध तुम्हाला कोणत्या अर्थाने अभिप्रेत आहे ?

उत्तर : [योगेंद्र मेश्राम]-तुम्हाला म्हणजे 'दलित' जाणिवेच्या वाचकांना ज्या अर्थाने वाटतो, तोच अर्थ मला अभिप्रेत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी-'मला माझी जन्मभूमी नाही' असे म्हटले होते. त्या उद्गारामागे जो संदर्भ, अर्थ व आशय उभा आहे, तसाच अर्थ-आशय 'माझं गाव कुठाय ?' या नावामागे आहे. त्यातला नायक चेतव याला – आपल्या प्रत्येकाला असतं, तसं जन्मगाव तर आहे, पण त्याने आपलं म्हणावं, असं ते 'गाव' नाही. दलितांसाठी जे गाव धर्मरूढीच्या आंधळया अवडंबरांनी भरलेले आहे, उच्चनीचपणा, भेदभाव आणि जातिभेदाचा कोंडवाडा आणि अन्याय जुलुमांचा अड्डा बनलेले आहे – ते गाव दलित अस्पृश्यांनी आपलं कसं म्हणावं-मानावं ? त्यातून जो संघर्ष उफाळतो, त्याच्या कार्यकारण भावाचा शोध लावण्याचा प्रयत्न नायक करतो. तो चिंतनशील प्रकृतीचा विचारवंत माणूस. तेवढाच कृतीशील त्याच्या उक्ती व कृतीतून हेच व्यक्त होते, की समता-न्यायवादी, मानवतावादी आणि करुणा व मैत्रीपूर्ण आचार विचाराच्या लोकांचे गाव हेच चेतवचं आणि दलित बौद्धांचं खरं गाव राहणार असते. अशा गावाचाच तर तो शेवटपर्यंत शोध घेत असतो-'माझं गावं कुठाय ?'-पण असं गाव त्याचं जन्मगाव नसते, म्हणून माणसातल्या जनावराबरोबर तो झुंज देत असतो.

प्रश्न : (मध्येच)-झुंज तर तो प्रत्यक्ष भयंकर अशा ढाण्या वाघाबरोबरही शेवटी देतो. तो प्रसंग अगदी चित्तथरारक झालेला आहे. प्रसंगोचित परिसर उभा करून तुम्ही उत्कृष्ट वातावरण-निर्मिती साधली आहे, पण त्या वाघाच्या झुंजीतून तुम्हाला काय सुचवायचं आहे ?

उत्तर : हेच, आता जे मी बोललो, माणसातल्या जनावराबद्दल. हिंस्त्र जनावरापेक्षाही भयंकर असलेल्या क्रूर-मग्रूर माणसाबद्दल. शेवटचा तो भयंकर नायक-नायिकेवर गुदरलेला जीवन मरणाचा प्रसंग प्रतिकात्मक आहे. हे तुमच्या लक्षात आलंच असेल ते घनदाट जंगल. तो

ओढा, तो गुंफा, टेकडी वगैरे एका ऐतिहासिक सत्याच्या संशोधनाला सहाय्यभूत व्हावीत, असाही एक हेतू त्या वातावरण–निर्मितीमागे आहे.

प्रश्न : हं, ही सूचकता आहे ! एक सांगा, डॉक्टर, तुमच्या कादंबरीची ही समर्थ झेप–ही पहिलीच नाही का,–पाहून असं वाटते, की या विषयाऐवजी कादंबरीसाठी एखादा नवा अनोखा विषय घेतला असता, तर ही कादंबरी खूप खळबळजनक झाली असती. असं नाही का वाटत ?

उत्तर : त्याचं काय आहे, 'खळबळजनक–खळबळजनक' हा शब्द अलीकडे साहित्यातली एक 'फॅशन, ठरला आणि गुळगुळीत झाला आहे. कादंबरीसाठी उचललेला नवा आशय, स्वर्गातला अधांतर किंवा एखाद्या निर्जन प्रदेशातला बिकट नवा कोरा विषय की झाली खळबळजनक ! रातोरात मोठा कादंबरीकार लेखक ! आणि त्यात काय, तर इव्हु–आदमच्या वा नर–मादीच्या रूपात अतीव लैंगिकतेचे नग्न प्रदर्शन आणि नंतर क्रौर्याचे ! ती कृती आणि असामान्य कलाकृती ! प्रस्थापित मराठी कादंबरी साहित्यात हेच चालत आलं आहे. आपल्याला अशी अफलातून भव्यदिव्य 'कलेसाठी कला'कृती घ्यायचीच नाहीये.

प्रश्न : प्रस्थापित मराठी साहित्याचं असं आहे खरं, मी ''दलित' कादंबरीचं म्हणत होतो–

उत्तर : हो, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे दलित चळवळीच्या, समाजजीवनाच्या विषयावर काही अंगाने लेखन झाले असेल, पण अजूनपावेतो 'दलित जीवन' संपूर्ण अंगाने आलेले नाही. अजून वेगवेगळ्या अंगाने हे जीवन–त्याची विविध रूपे आविष्कृत व्हावयाचीच आहेत, असे मला वाटते. म्हणून सामाजिक जीवनाच्या व चळवळीच्या एका विशिष्ट अंगाने, कादंबरी रूपाने ते आणावे, असे मला वाटले. दलितांचे समाजकारण व राजकारण हे गेल्या काही वर्षांपासून भलतीकडेच वाहत चालले आहे. त्यांची पावले–पवित्रे कुठेतरी चुकत भरकटत आहेत. का असे वाटल्यावरून लेखकाने निर्लेपपणाने चळवळभूत सामाजिक जीवनाला उजागर करण्याचा, नवं काही सुचविण्याचा या कादंबरीतून काही ठिकाणी प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला. हे आपण वाचक–विचारवंतांनीच ठरवायचं आहे. पण मुख्य 'दलित जीवन व संघर्ष' हाच खरा या कादंबरीचा विषय आहे, त्यावर विचारा.

प्रश्न : त्यावर थोडे निवेदन असं की–तुम्ही या जीवनाच्या एका वेगळ्या संघर्षमय रूपाचा नेटका वेध घेतला आहे, हे खरं. त्यात केलेली अनुभवांची सूक्ष्म उकल, दिलेला नवा संदर्भ या दृष्टीने

चर्चा

डॉ. योगेंद्र मेश्राम
+ प्रा. भाऊसाहेब लिहीतकर

[माझं गाव कुठाय ?
या कादंबरीच्या निमित्ताने]

कादंबरीचा विषय नवाच आहे एकूण कथानक हे रोचक, उद्‌बोधक आहे. परिणामकारक आहे. त्यातील आशयसंपन्नता वाचकाला अंतर्मुख करणारी, विचारप्रवृत्त करणारी आहे, यात शंका नाही. मुख्य कथानकाबरोबर उपकथानकेही आकृष्ट करतात. एकात बापू कांबळे व रखमाची जोडी येते. शेवटपर्यंत आपला प्रभाव सोडून जाते. त्यापेक्षाही दीर्घकाळ लक्षात राहणारी वाघ्याशेर-गजरा या दलित-आदिवासी जोडीची जीवनकहाणी आहे. ती मनावर शौर्याचा तसा करुणा-दुःखाचा गडद परिणाम करून जाते. अस्वस्थ करते. नेमक्या घटनातून अत्यंत संयमाने व तेवढयाच बेमालूम कलात्मक पद्धतीने गजरा-वाघ्याची कथा तुम्ही चित्रासारखी उभी केली आहे. आता मुख्य कथानकात नायिका म्हणून स्नेहा ही ब्राह्मणकन्या आलेली आहे. नायक चेतवबरोबर तिचं प्रेम-एक डोळस समंजस प्रेम-चित्रित केलं आहे. ते स्वाभाविकपणेच पुढे वाहत जाते. हळुवार फुलते आणि तरुणसुलभ भावनांची शेवटी तृप्तीही करते. त्यांचे लग्न दाखविलं नाही. कारण तसा अवसरच कथेच्या धावत्या ओघात लेखकाला सापडलेला नाही हे लक्षात येते. दुसरं कारण-ही दोघंही एकमेकाशी समरस झालेली ध्येयवादी-स्वतःला समाजकार्यात झोकून दिलेली माणसं. त्यांना वेगळा विचार करायला उसंत नाही, हे खरं. पण त्यातच कादंबरीचं खरं सामर्थ्य आहे. त्यात हा सहप्रेमाचा भाग तुम्ही अत्यंत संयमित, सूचक शब्दात व्यक्त केलेला आहे. तो सहजसुंदर, स्वाभाविक झालेला आहे. हे कलात्मक सौंदर्य या कादंबरीचं आकर्षण आहे. वासनाविकारांचा त्यात अजिबात कल्लोळ नाही आणि–

लेखक : (मध्येच) तुम्ही हे कथानक नीट समजून घेतलंत, तेव्हा हा आस्वाद घेता आला. भाऊसाहेब तुम्ही तर एखाद्या कसलेल्या समीक्षकावर ताण करीत आहात !

प्रश्न : मी आणि समीक्षक ? (मी मोठ्याने हसतो. लेखक साथ देतो.) बरं, इथे एक प्रश्न आहे, की तुम्ही ब्राह्मण-पोरीच्या जागी दलित महार पोरगी दाखवली असती तर ? त्यात रोटीबेटी-व्यवहारातून-बाबासाहेबांच्या मतानुसार जाति-निर्मूलनाचा भाग तुम्हाला व्यक्त करावयाचा असेलही. पण आजचे पुरोगामी म्हणविणारे सर्वच ब्राह्मण आतून-बाहेरून दलितांबरोबर असे-समरस झालेले आहेत, असं तुम्हाला वाटते का ?

उत्तर : हं, हा प्रश्न आहे. त्यातला पहिला मुद्दा घेऊ. नायक-नायिकेचा. नंतर ब्राह्मण-समरसतेचा. तुम्हाला खरं सांगू भाऊसाहेब, मला हा नायक-नायिकेचा मुद्दाच आवडत नाही. निदान प्रचलित कथा-कादबऱ्यातील नायक-नायिकेची संकल्पना मला पसंत नाही.

प्रश्न : कशी काय ? कोणती ?

उत्तर : त्यातला नायक जनसामान्यांपेक्षा फूट भर उंच. असाधारण, उदात्त वगैरे, असा मुद्दाम उभा केला जातो. 'माझं गाव कुठाय ?' मधील नायक-नायिका तसे नाहीत. त्यांचं उदात्तीकरण मी केलेलं नाही. चेतव हा प्रस्थापिताप्रमाणे आदर्श वा उदात्त नायक अजिबात नाही. त्याच्या जीवनाची ही कहाणी आहे. चेतव जो आहे तो परिस्थितीने घडविलेला माणूस. लहानाचा मोठा होतो. सामान्यात सामान्यांसारखंच उपेक्षेच, दुर्भिक्षतेचं जीवन जगतो. भोगतो. अर्थात, बिकट-प्रतिकूल परिस्थितीला ओलांडून आपली प्रगती साधणाऱ्या आजच्या काही दलित तरुणांप्रमाणे तो महत्त्वाकांक्षी, ध्येयवादी तरुण आहे. त्याचा सामाजिक उत्थानासंबंधीचा ध्येयवाद अधिक प्रखर आहे. त्यामुळेच तो सामान्य असूनही प्रभावी कार्यकर्ता बनतो. तो आजच्या काही कवी-कार्यकर्त्याप्रमाणे निव्वळ बोलका निष्क्रीय माणूस नाही. तर खरा कृतीशूर कार्यकर्ता आहे. तो त्यांचा प्रतिनिधी. आपल्या येथे असा एखाद दुसरा कार्यकर्ता पुढारी असेल ना ? त्याचे, पर्यायाने बाबासाहेबांचेच, एक रूप हा नायक आहे, असे आपण म्हणू शकतो. स्नेहा ही सुद्धा प्रचलित नायिकेप्रमाणे आगळी-वेगळी असामान्य स्त्री नाही. चेतवप्रमाणेच ती लोकात मिसळणारी आणि बापाप्रमाणे समाजसेवेची कळ जगणारी व जपणारी आहे अर्थात् ब्राह्मणातील काही महिला

असतात, तशी स्नेहा ही पुरोगामी विचाराची, बुद्धिवादी, विवेकशील वृत्तीची. आजच्या चार चौघींसारखीच एक सुसंस्कृत स्त्री आहे...आता तिलाच म्हणजे एका ब्राह्मण कन्येलाच लेखकाने 'नायिका' म्हणून का निवडले ? एखाद्या दलित-बौद्ध तरुणीला का नाही ? असा रास्त प्रश्न वा शंका निर्माण होणं साहजिक आहे. परंतु त्याचं उत्तर हे की-मी जाणून वा हेतुपुरस्सर तिला 'नायिका' म्हणून निवडलेलंच नाही, किंवा जराही ओढून-ताणून आणलेलं नाही. तुम्ही पहा, ती सहज-स्वाभाविक परिस्थितीत बालवयापासूनच चेतनच्या सहवासात येते आहे तर येऊ द्या-असं झालं आहे. कमीअधिक प्रमाणात त्या दोघांच्यात असलेलं-जुळवून आणलेलं नव्हे-प्रेम हे इथे जातीधर्मातीत आहे.

प्रश्न : हे खरंच आहे. आता कादंबरीतील ब्राह्मण जवळीकीबद्दल तुमचं मत-

उत्तर : हो, तेच सांगतो आहे. आता ही नायिका ब्राह्मणातली म्हणून ब्राह्मणांना जवळ करण्याचा लेखकाचा काही सामाजिक उद्देश असू शकतो, असावा, ही शंका तशी रास्त आहे. आपल्या बौद्धिक-मानसिक विचारांचा आणि सामाजिकतेचा मनापासून स्वीकार करणाऱ्या 'ब्राह्मण' माणसाला किंवा कोणालाही आपण दुरावण्याचे कारण नाही. डॉ आंबेडकरांनी सुद्धा ब्राह्मण माणसाला न झिडकारता ब्राह्मण्यग्रस्त प्रवृत्तीच्या माणसाला धिक्कारले होते. ब्राह्मण्यग्रस्त ब्राम्हण माणूस तर आपला पहिला शत्रू पण तो बुद्धिवान प्राणी म्हणून त्याला निदान समजून घेता येते. पण ब्राम्हणेतर समाजातील शुद्ध ब्राम्हण्यग्रस्त, विचारहीन, रूढी-जातीयवादी वृत्ती तर दलितांची साक्षात 'शत्रू' म्हणून हा विरोध, हा विद्रोह. अर्थात, हा विद्रोह वृत्तीबरोबर आहे, व्यक्तीबरोबर नाही. मात्र आजच्या पुरोगामी म्हणविणाऱ्या काही एका ब्राम्हणी वृत्ती-नीतीलाही डोळसपणे तपासून घेणे दलित चळवळीला तेवढेच आवश्यक आहे हे खरे. हे मान्य आहे.

आपल्या बौद्धिक-मानसिक विचाराचा आणि सामाजिकतेचा मनापासून स्वीकार करणाऱ्या 'ब्राह्मण' माणसाला किंवा कोणालाही आपण दुरावण्याचे कारण नाही. डॉ. आंबेडकरांनीसुद्धा ब्राह्मण माणसाला न झिडकारता ब्राह्मण्यग्रस्त प्रवृत्तीच्या माणसाला धिःकारले होते.

प्रश्न : कादंबरीचे कथानक, पात्रे व प्रसंग तुम्ही सहजपणे तरीही कलात्मकरीत्या उभे केलेले आहेत. त्यात कृत्रिमता नाही, म्हणून एक सहज सौंदर्य या कादंबरीला लाभलेलं आहे. त्यात एक-दलित साहित्यावर प्रस्थापितांकडून होणारा, आरोप याही ठिकाणी असा की-या सांस्कृतिक-सामाजिक चळवळीच्या संदर्भात तुम्ही जे भाष्य केलं आहे, त्यात समीक्षकाला प्रचाराची भूमिका वाटली, तर त्याचं समर्थन तुम्ही कसं कराल ?

उत्तर : प्रस्थापित मराठी समीक्षकांना काय वाटते, हा लेखकापुढे प्रश्न नव्हता व नाही. दलित साहित्याचीही एक चळवळ आहे, आणि ती जिवंतपणे चालत आहे. त्यात अस्थानी येणारी प्रचारात्मकता किंवा अभिनिवेश कलाकृतीला मारक ठरत असेलही कदाचित. पण चळवळीतील सामाजिक लढाईचे वातावरण निर्मायला नेमक्या ठिकाणी व नेमक्या वेळेवर वाजणारी प्रचार अभिनिवेशाची दुंदुभी ही युद्धातल्याप्रमाणे आवश्यक असते, असे मला वाटते. जर येथेही ती भूमिका क्वचित ठिकाणी आली असली, तर या चळवळीला व सामाजिक प्रबोधनाला ती सहाय्यभूतच ठरावी. कथा-कादंबरीतील विषयाला व वातावरणनिर्मितीला कधी कधी ती भूमिका स्वीकारणे आवश्यक वाटते. ती विषयाला साजेशी-प्रमाणशीर मात्र हवी.

प्रश्न : असं, मला हे पटते. शिवाय येथे तशा अभिनिवेशाला वा प्रचारकतेला तुमच्या प्रभावी भाषा आणि विचार सौंदर्याने फारसे वर येऊ दिलेलेच नाही. प्रचार हे प्रबोधनाचे साधन होत असेल, तर मारक काय आहे त्यात ? आणि अभिनिवेश-मला तर वाटते, आपल्या या साहित्याचा 'अलंकार' मानला पाहिजे. दुसरे, दलित जीवनाच्या आशयाला व परिपोषणाला जराही धक्का लागू न देता तुम्ही जे कलात्मक सौंदर्य साधले आहे तो भाग या कादंबरीचा मोठेपणा सिद्ध करणारा आहे यात शंका नाही. पण याच अनुषंगाने एक प्रश्न म्हणजे भाषासौंदर्य वा लालित्याच्या आणि कलात्मकतेच्या नादी लागून कधी 'दलित' जीवनाचा आशयच जर हरवला किंवा गौण झाला तर दलित साहित्याची – जसे काहीचे झाले आहे – तसे प्रस्थापित साहित्य होऊन जाण्याची भीती नाही का ?–तुम्हाला काय वाटते ?

उत्तर : मला तसे काही नाही वाटत. साहित्य कलात्मकदृष्ट्या प्रस्थापित होऊ दे. दलित साहित्य आपल्या ध्येय–दिशेनं, आपल्या जिवंत आशयासह आपल्या जागी 'प्रस्थापित' झालंही पाहिजे, पण मराठी प्रस्थापितांच्यासारखं नव्हे, तर प्रतिष्ठित झालं पाहिजे, आपलं वेगळंपण राखून.... 'दलित' साहित्यिक मात्र एका अर्थाने प्रस्थापित होऊ नयेत, असं वाटते. आज काही झालेले दिसतात तसे.

प्रश्न : कोणत्या अर्थानं ?

उत्तर : म्हणजे दलित साहित्यिक 'प्रस्थापितांचे, प्रस्थापितांतले' होऊन जाऊ नयेत, नाही का ? आणि हाच चिंतेचा भाग आहे, असे मला वाटते. साहित्य 'कलात्मक' होण्याची भीती नाही. उलट ती 'रीती' आपण सुद्धा हाताळली पाहिजे. कारण दलित साहित्य अखेर साहित्य आहे. आणि कला पण आहे. दलित लेखक सुद्धा कलात्मक वाङ्मय तेवढ्याच ताकदीने लिहू शकतो, तो आज कुणाच्या मागे नाही, हे दिसलं पाहिजे. कलात्मकतेच्या संदर्भात एक गैरसमज दिसतो. तो हा की–साहित्य (इथे कथा–कादंबरी, एखादं 'बलुत' सारखं आत्मवृत्त) कलात्मक झालं, की जीवनाचा आशय हरवतो पण मला असं वाटत नाही. उलट कलात्मक साहित्य हे जास्त परिणामकारक, हृदयाला भिडणारं आणि आव्हानप्रद बनते. हे खरं आहे. म्हणून दलित साहित्यानं कलात्मक असायला–व्हायला हवंच आहे. सामाजिक बांधिलकीचं कलात्मक साहित्य वेगळं आणि निव्वळ कलाकुसरीचं वा कारागिरीचं साहित्य वेगळं. त्यातला अनुभव नकली ठरतो. आणि आशय गळू लागतो. दोन्ही हरवतात. आणि पुढे ते साहित्य, सामाजिक बांधिलकीचे बंध झुगारणाऱ्या 'कलावादी' वाङ्मयात जाऊन बसते. दलित साहित्य असं 'कलेसाठी कला'वादी कधीच असणार नाही. ते कलात्मक जरूर असलं पाहिजे. मात्र आम्हीही सुरुवातीला ओबडधोबड, धारदार दगडधोंडेच फार हाणले. ते पुरे झाले. आता आम्हाला सुद्धा बंदुकीच्या गोळ्या चांगला नेम साधून छान झाडता येतात. तोफ/मशीनगन्स चालविता येतात. हे आमचं केवळ वाङ्मयकौशल्यच (कलात्मकता) नाही, तर आमचं साहित्य हे आमचं युद्ध-कौशल्यसुद्धा आहे. दलित साहित्य हे आज दलित चळवळीचं 'हत्यार' झालं आहे म्हणतात; ते या अर्थानं...हे विषयातर होत आहे का ?

प्रश्न : नाही नाही. उलट तुमची 'भट्टी' आज चांगली जमली–चेतलेली दिसतेय.

उत्तर : आता 'आगच' समोर असल्यावर...मग काय ! (आम्ही दोघंही हसतो)...कधी कधी असं होतंच, संसर्गानं.

प्रश्न : बरं ! पुन्हा एक–तसं त्यावर बोलणं झालंय. तरी मला तुमचा चेतव हा नायक थोडा अधिक मोठा, 'ब्रॉड' वाटतो. वास्तवात असं आहे का ?

उत्तर : नसायला काय झालं ! (गमतीने)–तुम्हाला त्याचा हेवा वाटतो का ? त्याचं असं आहे, माझ्या दृष्टीतून, की–चेतव हा नव्या विचारयुगाचा–आंबेडकरी युगाचा म्हणून या,

प्रखर बुद्धिवादी प्रतिनिधी आहे. सामाजिक क्रांतीचा एक पाईक आहे. तो साहजिकच दलित-ग्रामीण नेतृत्वावर व विचारावर मात करतो. म्हणून तो त्यांच्या तुलनेत मोठा 'ब्रॉड' वाटतो. हे आलेच. ग्रामीण तशाच शहरी-केंद्रीय चळवळं मागील संघर्षाची उर्मी एकच; परंतु एकूण चळवळं चे लढ्याचे मार्ग स्वार्थ-प्रेरणेनं संकुचित झालेले. म्हणून तोकडे पडतात. ते मार्ग अथवा ती साधने भक्कम अशा कोणत्या ठाम आणि नव्या विचाराच्या पायावर उभारली जावीत, हे नायक चेतव सुचवितो. आणि दलित चळवळीला नव्या जोमाच्या विचारवंत तरुणांनी आपल्या खांद्यावर वाहून नेणे कसे आवश्यक आहे, हे तो प्रत्यक्ष आपल्या कृतीने दाखवून देतो. म्हणजेच तो काही बोलघेवड्या कार्यकर्त्यापेक्षा मोठा वाटतो. पण तो तसा 'ब्रॉड' नाही. पराकोटीतला नाही, तर सामान्यांमधूनच पुढे आलेल्या तरुण कार्यकर्त्यांपैकीच एक आहे. त्यांचाच तो एक डोळस नि बुद्धिवादी प्रतिनिधी आहे. आणि तळमळीचा विचारवंत आहे.

प्रश्न : तुमच्या त्या नायकाप्रमाणेच तुम्हीपण बहुधा अंतर्मुख वगैरे—

उत्तर : तो नायक शेवटी माझाच आहे ना ! (हसत—)

प्रश्न : तो तुम्ही घडवलेला आहे, हे ठीक. पण कमी-अधिक फरकाने आपलं सगळ्यांचं जीवन या 'माझं गाव—' मधल्या चेतवसारखं—असंच पंख खुडलेलं नव्हतं का ? हाल अपेष्टा, उपेक्षा—अवमान नि दुःखाने भिजलेलं, झिजलेलं, व्यथामय, आताही आपण हसत-खेळत ते जगलो नाही, तर हे जगणं-करणंच मुष्किल होऊन जाईल, नाही का ?

उत्तर : वा ! जगण्याचं हे तत्त्वज्ञान सुंदर आहे तुमचं, भाऊसाहेब !

आम्हीही सुरुवातीला ओवडधोवड, धारदार दगडधोंडेच फार हाणले. ते पुरे झाले. आता आम्हालासुद्धा बंदुकीच्या गोळ्या चांगला नेम साधून छान झाडता येतात. तोफ / मशीनगन्स चालविता येतात. हे आमचं केवळ वाङ्मयकौशल्यच (कलात्मकता) नाही, तर आमचं साहित्य हे आमचं युद्धकौशल्यसुद्धा आहे.

प्रश्न : चेतवचंही तत्त्वज्ञान शेवटी असंच, यासाठीच नाही का ? आपल्या समाजकार्यकर्त्यांनी ही प्रेरणा घ्यावी. तुम्ही त्याला जरा अधिक उत्कट रसरशीत दाखविलेला आहे तो—

उत्तर : (मध्येच) हो, त्यात त्याचा बुद्धिवाद, त्याचा सामाजिक विचार, त्याची महत्त्वाकांक्षा; धडपड, जीवनाला व दुःखाला सामोरे जाण्याची धडाडी-बऱ्याच गोष्टी आहेत. शिवाय आनुषंगिक घटना, प्रसंग, उपकथानके....साहित्याचीही अंगे आहेत. त्या संबंधानं आणखी काही आपण बोललं पाहिजे.

प्रश्न : हो, पुष्कळ काही आहे. वेगवेगळ्या दृष्टिकोनातून या कादंबरीवर चर्चा होण्यासारखी आहे. ती अन्यत्र होऊ दे...अं, शेवटी एक, मला तुमची नीट ओळख नव्हती, कालपर्यंत. ती या कादंबरीनं करून दिली. तिचे आभार—(आम्ही दोघंही हसतो.)

उत्तर : (त्याच सुरात—) वरं वरं !....मला माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचं स्वभावचित्रण बऱ्यापैकी करता येतं तर !

आम्ही येथे चर्चा थांबवतो...नव्हे, ती पुढच्या वेळेसाठी राखून ठेवतो. खरोखर असे अनेकविध 'डायमेन्शन्स' आणि संदर्भ या गुणी कादंबरीला लाभलेले असल्याचा प्रत्यय वाचकाला आल्याशिवाय राहत नाही. तिच्या सुरुवातासंबंधी व तिच्या लेखकासंबंधी येथे थोडे लिहावेसे वाटते.

चंद्रपूर जिल्ह्यातील एका खेडेगावातून नागपुरात येऊन स्थायिक झालेला हा माणूस. अजूनपावेतो त्याला न मिळालेल्या मनासारख्या 'गावाच्या' शोधात. इंदोरा झोपडवस्तीच्या शेजारीच (नागसेन नगर) राहणे. डोळ्यात भूक, उत्सुकता, सहजगत्या कुणाच्या डोळ्यात न भरण्यासारखं व्यक्तिमत्त्व, राहणंही साधंसुधं. पण मनात-डोळ्यात व डोक्यात तुडुंब काही भरलेलं चिंतन. बहुधा अंतर्मुख, विवेकी स्वभाव. अहंकाराचा स्पर्श नाही. तो सहनच होत नसावा. हा निगर्वी पण मानी माणूस. कुठलाही मुखवटाधारी नाही. तसा अलिप्त, आपलं आपणात. आपल्यापरीने व मगदुराप्रमाणे सतत काही लिहित-करत-बोलत रहायचं, प्रसिद्धीसाठी हपापलेपणा त्याच्या गावी नाही. 'माझं गाव कुठाय'मध्ये योगेंद्र मेश्रामांच्या अशा विवेकी चिंतनशील व्यक्तित्त्वाचं नि विचारांचंच तर प्रतिबिंब उमटलेलं आहे ना ! ते त्यांचं एक व्यक्तिविश्वच नसेल का ? त्यांचं व्यक्तिजीवन समजण्यासाठी मात्र आत्मवृत्त अद्याप यावयाचं आहे. त्याची वाट आहेच!

ही त्यांची पहिलीच कादंबरी मात्र देखणी आहे. गुणवान आहे. तिला सामाजिक चळवळीची व दलित जीवनाची भक्कम पार्श्वभूमी आहे. प्रसंगोचित वातावरण-निर्मिती आणि रोचक ठोसदार असा कथानकाचा घटनाक्रम. त्याचा संबंध तोल शेवटपर्यंत एका सामर्थ्याने टिकवून धरणारी मेश्रामांची अभिव्यक्तीची शैलीच जोरदार आहे. सुंदर भाषाशैली आहे. ती वेगवती-ओघवती आहे. मानवी मनाचा शोध व वेध घेत घेत शेवटपर्यंत ती वाचकांची उत्सुकता वाढवीत नेते. त्याला धक्के देते. अस्वस्थ नि अंतर्मुख करते. दुसरे, वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीतून या कादंबरीत जिवंतपणा, नाट्यमयता आणि काव्यात्मकता बऱ्याच ठिकाणी येते. भाषेचे सौंदर्य, नवनवीन सुंदर शब्दांनी विचारांची मनोज्ञ गुंफण, विचारप्रगल्भता त्यामुळेच ती काही ठिकाणी भावपरिपोषणापेक्षा विचारांच्या गुंफेत गुंतल्यासारखी सुद्धा वाटते. म्हणूनच भावनाशतेला भिरकावून देणारा बुद्धिवाद इथे प्रभावी ठरतो. तो प्रखर आहे. त्यामुळे आणि तिच्या वाङ्मयीय कलात्मकतेमुळे वाचकांचे डोके व मन नव्याने तेजतररीत होत जाते...आपल्या-तुपल्याचे ती चांगलेच 'ब्रेनवाश'देखील करते ! या सगळ्या दृष्टीतून वाचकांच्या मनाची 'ग्रीप' घेण्याची ताकद या कादंबरीत पुरेशी आहे. आशय-विषयाने ती खळबळजनक नसेल, पण एक जळजळीत व वेधक कलाकृती नक्कीच आहे.

अशी-'माझं गाव कुठाय ?' ही कादंबरी. एक उत्कृष्ट साहित्यकृती. ती मराठीकादंबरी-वाङ्मयात एक मोलाची भर ठरावी. चर्चेत लेखकाने म्हटल्याप्रमाणे-दलित साहित्य हे कलावादी नाही. ते खरे कलात्मक वाङ्मय आहे. ('याम्हाला सुद्धा आता ओबडधोबड दगडधोंड्याऐवजी बंदुकाही चांगला नेम धरून चालविता येतात !' म्हणून ते मराठी साहित्यात आगळे वेगळे आणि उत्कृष्ट साहित्य ठरले आहे. याचं प्रत्यंतर 'माझं गाव कुठाय ?' वाचून आल्याशिवाय राहत नाही.

सदर कादंबरीतून डॉ. योगेंद्र मेश्रामांना या समाजाला, चळवळीला मनापासून विशेष काही सांगायचंय. ते सांगितलं आहे. पण ते पूर्ण सांगून झालेलं नाही. कादंबरीचा 'शेवट' वाचून हे आपल्या लक्षात येते. तो कलात्मक, सूचक आहे. एकूण ही कादंबरी खूप काही आशावाद देणारी; समाजप्रबोधक आणि अनुभव समृद्ध व आशय सुंदर अशी एक सामर्थ्यवान साहित्य कृती आहे, यात शंकाच नाही. ■

प्रा. भाऊसाहेब लिहितकर
५०, सानेवाडी, वर्धा

'माझं गाव कुठाय ?' (कादंबरी);
ले.-योगेंद्र मेश्राम/कौस्तुभ प्रकाशन,
२९/अ, महाराणा प्रतापनगर, नागपूर-१२
मूल्य : १५/-

लेखन, देवनागरीचे !

: दिवाकर पुरुषोत्तम मोहनी

आपण भारतीय आपल्या भाषा अनेक लिपीं-मध्ये लिहीत असलो तरी सर्वाधिक वापर देवनागरीचा आहे. हिन्दी, मराठी, नेपाळी आणि संस्कृत ह्या चार भाषा नागरीमध्ये लिहिल्या जातात. नागरी ही मूलतः संस्कृतभाषा लिहिण्या-साठी निर्माण झाली आहे. ह्या लिपीमध्ये एकच वर्ण निरनिराळ्या पद्धतीने लिहिण्याची सोय आहे उदा. संत हा शब्द घ्या. हा शब्द अशासाठी घेतला की त्या शब्दाशी निगडीत लोकमान्य टिळकांविषयी एक आख्यायिका आहे टिळकांच्या लहानपणी त्यांच्या शिक्षकांनी त्यांना शुद्धलेखन लिहावयाला सांगितले व त्यामध्ये संत हा शब्द तीनवेळा आला; तो त्यांनी संत, सन्त आणि सन्‌त असा लिहून गुरुजींची शाबासकी मिळविली अशी ती कथा आहे. संतमधील सं हे एकच अक्षर नव्हे तर इतरही अनेक अक्षरे वा जोडाक्षरे वेगवेगळ्या पद्धतीने लिहिली जाऊ शकतात. उदाहरणादाखल भक्त / भक्त / प्रश्न / प्रश्न, क्रांति / क्रान्ति / क्रांति, गजवक्त्र / गजवक्त्र एवढेच शब्द घेऊ या. ह्यांपैकी शुद्ध वा ग्राह्य रूपे कोणती ? आणि ती तशी का ह्याचा आपण शोध घेऊ त्यासाठी अक्षर म्हणजे काय ? वर्ण आणि अक्षर यात काही फरक आहे काय ? ह्या गोष्टी विस्ताराने पाहाव्या लागतील.

अक्षराश्रित लिपी

नागरी लिपी ही अक्षराश्रित आहे आणि अक्षरे स्वराश्रित आहेत. हा रोमन लिपीपेक्षा वेगळा, स्वरव्यञ्जने एकत्र (एकमेकांना जोडून) लिहि-ण्याचा प्रघात निदान अशोककालीन ब्राह्मीपासून आहे आणि नागरीतर भारतीय लिपीमध्येही आहे; इतकेच नव्हे तर एका भारतीयेतर (आफ्रिके-मधील इथियोपियन) लिपीमध्येही तो आढळतो,

नागरी अक्षराश्रित आहे म्हणजे काय ? त्यासाठी अक्षर म्हणजे काय ते आधी पाहू. माझ्या मते अक्षराची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल. 'नागरीतील अक्षर हे एका स्वराचा अथवा एक किंवा अनेक व्यञ्जनांसहित उच्चारलेल्या एकाच स्वराचा बोध करून देणारे दृष्टिगम्य चिह्न होय.' म्हणजे काय तर प्रत्येक अक्षरामध्ये स्वर असणारच. एकच स्वर असणार. कोठे नुसता स्वर, कोठे एक व्यञ्जन आणि एक स्वर तर कधी अनेक व्यञ्जने आणि एक स्वर असणार. ही एका अक्षरामध्ये जास्तीत जास्त पाच व्यञ्जनांची संख्या आढळात आली आहे. पाच व्यञ्जनांचे अक्षर असलेला कार्त्स्न्यं हा एकच शब्द मला माहीत आहे. धाष्टर्यं मध्ये चार व्यञ्जने आहेत.

स्वर बहुधा प्रत्येक अक्षराच्या शेवटी येतो. क् + अ = क, क् + आ = का, क् + इ = कि ह्याप्रमाणे. पण तो अक्षरामध्ये व्यञ्जनाच्या आधीही येऊ शकतो. काही शब्द व्यञ्जनान्त असतात. त्यांनाच हलन्त असेही म्हणतात. क्वचित्, विद्वान्, तडित्, विद्युत् हे सर्व दोन अक्षरी हलन्त वा व्यञ्जनान्त शब्द आहेत वाक्, धिक् हे एका-क्षरी हलन्त शब्द आहेत. त्यातील स्वरांच्या दोनही अंगांना एकएक व्यञ्जन आहे. पहिले स्वरान्त व्यञ्जन अहे तर दुसरे स्वरादि व्यञ्जन आहे. प्रत्येक अक्षरामध्ये किंवा वर्णामध्ये एक स्वर असणे आवश्यक आहे. शब्दामध्ये जितके स्वर तितकी अक्षरे. विद्वद्रत्न, धृष्टद्युम्न, छन्दःशास्त्र' ह्या शब्दांमध्ये प्रत्येकी सात व्यञ्जने आणि चार स्वर आहेत. चार स्वर म्हणून चार अक्षरे. वाक् आणि धिक्मध्ये एकेक व स्वर म्हणून ते एकाक्षरी शब्द होत. धाष्टर्यं, कार्त्स्न्यं हे दोन अक्षरी व्यञ्जनान्त शब्द आहेत. कारण त्यांत दोन स्वर आहेत. त्यांतील अन्तिम व्यञ्जन अनुस्वाराच्या साह्याने दाखविले आहे. नारायण, रामायण, विद्वद्रत्न हे सारे अकारान्त म्हणून स्वरान्त शब्द आहेत; व म्हणून त्यांमधली

सर्व अक्षरे अजन्त (स्वरान्त) आहेत. संस्कृत भाषेला शब्दांचे समास व समास करताना स्वरसंधी वा व्यञ्जनसंधी हवे असतात. तिच्यात सुटे शब्द नसतात. त्यामुळे गणेश + उत्सव = गणेशोत्सव, गणपति + उत्सव = गणपत्युत्सव अशी रूपे होतात त्याचप्रमाणे श्रीमत् + भगवत् + गीता = श्रीमद्भगवद्गीता असे होते. व श्रीमत्-भगवत्-गीतामध्ये सात स्वर असल्यामुळे श्रीमद्भगवद्गीता असा सप्ताक्षरी शब्द तयार होतो

थोडक्यात काय तर प्रत्येक अक्षरामध्ये एका स्वराचे अस्तित्व अत्यावश्यक आहे. तो स्वर बहुधा व्यञ्जनानन्तर पण काही शब्दांच्या शेवटी व्यञ्जनांच्या आधी असतो असे म्हणता येईल. एका अक्षरामध्ये एकच स्वर असतो हे खरे असले तरी त्याला म्हटल्यास एक अपवाद आहे. ऐ (अइ) आणि औ (अउ) हे दोन स्वर वास्तविक संयुक्त स्वर आहेत. परंतु ते एकत्र लिहिण्याचा आणि त्यांचे एकच अक्षर मानण्याचा प्रघात संस्कृतमध्ये आहे. मराठीत तो तसा काटेकोर नियम नाही. त्यामुळे मराठीत दऊत आणि दौत असे दोनही प्रकारांनी लिहिलेले आढळते.

श्रीमद्भगवद्गीता ह्या शब्दात जरी सर्व अक्षरे स्वरान्त असली तरी पुढे येणाऱ्या अक्षरातील आद्यव्यञ्जनाचा उच्चार मात्र आघातसौकर्यासाठी आधीच्या स्वराबरोबर होत असतो. म्हणजे उच्चारताना श्रीमद्-भगवद्-गीता असे व विद्वद्रत्न ला विद्-वद्-रत्-न असेच म्हणावयाचे असते.

वर्ण आणि अक्षर हे दोन शब्द आपण एकाच अर्थाने वापरत असतो. पण त्यांच्या अर्थांमध्ये फरक आहे असे मला वाटते. वर्ण आणि अक्षर ह्यांची आकृती सारखीच असते. पण ज्यावेळेला ती आकृती फक्त उच्चारमात्र दाखवीत असते त्यावेळेला तिला वर्ण म्हणावे व ज्यावेळी ती अर्थबोध करून देत असते त्यावेळी तिला अक्षर म्हणावे असे मला वाटते. क का कि की कु कू कृ कॄ के कै ही वर्णमाला पण हे वर्ण शब्दांमध्ये वापरले गेले व त्यांना अर्थ प्राप्त झाला की त्याच आकृतींना अक्षरे म्हणावे. बघा, माझे म्हणणे पटते का ?

वर्ण हा विभाजनीय आणि अक्षर हे अविभाज्य होय–अशी माझी धारणा आहे. त्याचप्रमाणे वर्ण ह्या निरर्थक अक्षराकृती व अक्षरे हे सार्थ वर्ण होत असेही म्हणता येईल.

अक्षरे असोत वा वर्ण असोत त्यांच्या उच्चारामध्ये जसा स्वर असतो तसेच त्यांच्या आकृतीमध्ये स्वरचिह्न असतेच. केवलव्यञ्जनाचा सुटा स्वरविहीन उच्चार अशक्य आहे असे जाणून आमच्या लिपिकारांनी कोणत्याही स्वतंत्र उच्चाराचे चिह्न घडविताना त्यामध्ये स्वरचिह्न आहेच अशी खात्री करून घेतली. आणि त्याचप्रमाणे एका अक्षरामध्ये दोन स्वरचिह्ने येणार नाहीत अशी शक्यतोवर काळजी घेतली. मूलाक्षरांमध्ये केवलव्यञ्जने वापरली नाहीत; त्यामध्ये अ हा स्वर समाविष्ट करून व्यञ्जनांचे मूलाक्षर बनविले. कारण स्वराशिवाय उच्चारच अशक्य ही त्यांना स्पष्ट जाण होती. ज्याप्रमाणे स्वराशिवाय वर्णोच्चार अशक्य त्याचप्रमाणे स्वरचिह्नाशिवाय अक्षर अशक्य हा विचार देवनागरीला इतर सर्व लिपींपासून वेगळे काढतो. हा स्वरचिह्नविषयक विचार जितका नागरीमध्ये परिपूर्ण किंवा परिपक्व आहे तितका तो दुसऱ्या कोठल्याच लिपीमध्ये मला आढळला नाही; मग ती लिपी भारतीय असो वा भारतीयेतर !

नागरीमधल्या अक्षरांमध्ये वा वर्णांमध्ये काही स्वरवर्ण आहेत तर काही व्यञ्जनवर्ण आहेत. जे स्वरवर्ण आहेत त्या सर्वांची स्वरचिह्न आहेत. ही स्वरचिह्ने व्यञ्जनांशांना लागली की त्यांचे वर्ण बनतात. व्यञ्जनवर्ण जेवढे काही आहेत ते व्यञ्जनांश आणि स्वरांश मिळून झाले आहेत; त्यांमध्ये दोहोंचा एकजीव झालेला आहे.

[क्रमशः
पुढील अंकी]

नागरीलिपीची वैशिष्ट्ये :

: दिवाकर पुरुषोत्तम मोहनी

१. देवनागरी अक्षराश्रित आहे.

२. अक्षरे एकस्वराश्रित (एकाच) आणि स्वरान्त (अजन्त) आहे.

३. केवलव्यञ्जनाला मूलाक्षर मानले नसून अ ह्या स्वरासहित असलेल्या व्यञ्जनाला मूलाक्षर मानले आहे

४. अक्षरांतील अ स्वर दण्डस्वरूप आहे आ इ उ वगैरे स्वरांच्या खुणाही वेगवेगळया आहेत. त्यांना मी स्वरचिह्ने असे म्हटले आहे. त्या ा ा ी ा़ ा़ अशासारख्या आहेत. उच्चारात ज्याप्रमाणे व्यञ्जनाबरोबरचा एक स्वर जाऊन दुसरा त्याची जागा घेतो त्याप्रमाणे लेखनामध्येही एक स्वरचिह्न जाऊन दुसरे स्वरचिह्न त्याची जागा घेते.

५. व्यञ्जनाक्षरामध्ये एक किंवा अनेक व्यञ्जनचिह्ने एकाच स्वरचिह्नाला चिकटलेली असतात. अपवाद : ग ण श

६. एका वर्णात एकच स्वरचिह्न राहील अशी खबरदारी घेतली आहे.

७. अनेकव्यञ्जनयुक्त अक्षरांतील एक स्वरचिह्नस्पृष्ट व्यञ्जनांचा क्रम उच्चारानुक्रमाने वरून खाली असा असतो.

८. शब्दान्ती येणाऱ्या व्यञ्जनांना पूर्वस्वरावलंबी ठेवण्यासाठी निर्माण केलेल्या हलन्तचिह्नांचा वापर शब्दाच्या आरम्भी वा मध्यन्तरी निषिद्ध मानला आहे; कारण अक्षर अजन्त ठेवावयाचे असते. फक्त स्वरादिव्यञ्जनवर्ण हलन्त लिहिता येतात. अजन्तव्यञ्जने हलन्त लिहावयाची नसतात.

९. रेफ वा रफार (र्‍) हे चिह्न एका अक्षरातल्या सर्व व्यञ्जनांना एकस्वरचिह्नाश्रित ठेवण्यासाठी आणि व्यञ्जनांचा उच्चारक्रम बिघडू न देता त्यांना एकस्वरचिह्नस्पृष्ट ठेवण्यासाठी निर्माण करण्यात आले आहे.

१०. अनुस्वार हे चिह्नसुद्धा पूर्वस्वरावलंबी अनुनासिक व्यञ्जनांसहित सर्व व्यञ्जनांना एकस्वरचिह्नाश्रित ठेवण्यासाठीच निर्माण झाले आहे. अनुनासिक व्यञ्जनाचा उच्चार जेथे पुढच्या व्यञ्जनाप्रमाणे बदलतो तेथेच फक्त अनुस्वाराचा वापर केलेला आहे. (उदा० उपसर्ग आणि विभक्तिप्रत्यय) अन्यथा सर्वत्र परसवर्णच वापरला आहे हे व्यञ्जनचिह्न-व्यञ्जन पूर्वस्वरावलंबी आहे–परंतु ते स्वरानंतर उच्चारले जाते हे स्पष्टपणे दाखविण्यासाठी स्वरचिह्नाला चिकटवून घेतलेले नाही. स्वरचिह्नाला चिकटलेली व्यञ्जने स्वराच्या आधी उच्चारली जातात.

दंढार : एक परिचय

: विनायक कऊटकर

विदर्भाची सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील परंपरा आणि प्रगती फार मोठी आहे. त्यात दंढार, तुंवडी, डाहाका, गोंधळ, खडी गंमत, पोवाडा इत्यादि वैदर्भीय लोककलांनाही बराच मोठा इतिहास आहे.

कोणत्या का कारणानं असेना पण या लोक-कला आता काहीशा भूतकाळात जमा व्हायला लागल्या आहेत की काय अशी साधार भीती वाटू लागली आहे. शहर किंवा खेडे असे वर्गीकरण न करताही आपणास असं जाणवेल की या बहुतेक लोककलांबद्दल कुणाला काहीच फारशी माहिती नसते ग्रामीण भागातून या लोककलांची जोपासना होत आहे. ती सुद्धा केवळ जुन्या जाणत्या लोकांकडूनच.

नागपूर जिल्ह्याच्या कळमेश्वर तालुक्यातील म्हसेपठार हे एक खेडे असेल हजार–बाराशे लोक-वस्तीचं. या खेड्यानं मात्र अजूनही विदर्भाची सर्वात जुनी अशी पारंपारिक लोककला "दंढार" सातत्यानं जोपासून पुढे चालू ठेवली आहे हे गांव जरी लहान असलं तरी सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टया आघाडीवर आहे. या गावाला उज्ज्वल आणि प्रतिष्ठाप्राप्त अशी सांस्कृतिक परंपरा आहे. या लहान परंतु टुमदार गावानं "दंढार" ही पारंपारिक लोक-कला अत्यंत कौशल्याने जोपासली आहे. तिचा विकास केला आहे.

दक्षिण-मध्य क्षेत्रीय सांस्कृतिक केंद्र, नागपूरच्या उद्घाटन सोहळयानिमित्त झालेल्या तीन दिव-सांच्या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमात तसेच याच केन्द्राने आयोजित केलेल्या आदिवासी लोककला महोत्सवात आणि महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृ-तिक कार्य विभागातर्फे आयोजित तृतीय विविध कला महोत्सवात वैदर्भीय लोककलांमधील एक विशेष लोककला "दंढार" सादर करण्यात आली होती. श्रीकृष्ण लीला मंडळ, म्हसेपठार हे या गावच्या सांस्कृतिक संघटनेचे नाव. या मंडळाचा हीरकमहोत्सव नुकताच झालेला आहे.

येथील दंढारीत साधारणता २० ते २५ कलावंतांचा सहभाग असतो. कला प्रदर्शनात "स्त्रियांना मज्जाव" हे या लोकप्रकाराचं वैशिष्टय. स्त्री पात्रांचीही भूमिका येथे पुरुषच सांभाळतात.

साधारण नऊ ते अकरा किंवा या प्रमाणात पुरुष एका हातात टिपरी घेऊन एका ओळीत उभे राहतात. मध्यभागी कृष्णाचं सोंग. त्याच्या दोन्ही बाजूला स्त्री–वेषधारी पुरुष पात्रेच. नंतर मंचावर आलेले सर्व कलाकार लयबद्ध अशा हालचाली करीत नाचत राहतात. टिपरीकडे लक्ष नसूनही कुणाचीही नादलय चुकत नाही. वाद्यांची लय जसजशी वेग घेते तसतसा या नृत्यप्रकाराचा वेगही वाढत जातो. सारे वादक रंगमंचाच्या एका बाजूलाच उभे असतात, साधारणपणे दोन–तीन ढोलकी, झांज, लाकडी बासरी, हार्मोनिअम, तुणतुणे, डफ इत्यादि वाद्यांचा प्रामुख्याने उपयोग होत असतो.

सूत्रधार–विदूषक यांच्या व्यंगात्मक संवादा-नंतर वाद्यांच्या विविध लयीत नृत्याची काही आवर्तनं पुरी झाली की, रंगमंचावर येतं ते अंगभर कडूलिंबाच्या डाहाळया बांधून विदूषकाचं पात्र. वाद्याच्या लयीतच या विदुषकाचाही मग नाच होतो.

यानंतर येतो तो वक्रतुण्ड महाकाय गणपती. ऋद्धि-सिद्धी अर्थातच सोबत असतात. गणपतीला खुर्ची वा तत्सम आसनावर किंवा उभेच ठेवण्यात येतं. वाद्यमेळ सूर धरू लागतो. गणपती स्तवनाचं गाणं, गणपती तसेच बाजूच्या ऋद्धि–सिद्धीचं नृत्य इत्यादि रंजक प्रकार मग होत असतात.

गणपतीची स्थापना व मनोरंजन संपलं की विसर्जनाची वेळ येते. या वेळी ब्राह्मण–ब्राह्मणेतर किंवा स्पृश्य–अस्पृश्य वा इतर असेच ज्वलंत सामाजिक प्रश्न घेऊन एखादा नाटयप्रसंगही उभा करण्यात येतो. गणपतीची पूजा–आरती झाल्यावर विसर्जन केल्या जातं.

गणपतीच्या विसर्जनानंतर रंगमंचावर येतं ते बुद्धीची साक्षात देवता असलेले शारदेचं पात्र. ग्रामीण भाषा-बोलीत या शारदेची 'सारजा' होऊन जाते. ही शारदा म्हणजेच सारजा, मोरावर बसून नृत्य करते. असे प्रसंग दाखवले जातात. पाठीवर मोहक पिसारा बांधून ही 'सारजा' नाचत नाचत येते.

गणपती व शारदा या देवदेवताची अर्चना संपली की मग शारदेचंच म्हणावं असं एखादं भ्रष्ट किंवा विडंबनात्मक सोंग 'भारजा' भ्रष्ट आणि हिडीस रूपात रंगमंचावर येतं आणि हिडीस हावभाव व अंगविक्षेप करत राहतं. त्याज्य, निषिद्ध अशा सामाजिक रूढींचा धिक्कार करणारे काही नाट्यात्मक संवादही वापरता येतात. त्याज्य गोष्टींचा निषेध कसा केला जातो. यातच दंढारीचं खरं कसब दिसतं.

भ्रष्ट अशा सामाजिक रूढींचा परंपरागत पद्धतीनं निषेध केल्यानंतर दुष्टांचं दमन करणारं आणखी एक दैवत शंकर-पार्वतीच्या रूपानं रंगमंचावर अवतीर्ण होतं. या अवनीतलावर शंकर-पार्वतीचं नंदीवर वसून कैलासाहून आगमन होतं. ते दुष्टांचा संहार आणि सुष्टाच पालन करण्यासाठी, लाकडी चौकट, कलात्मकतेने बनविलेलं नंदीचं तोंड वगैरे प्रदर्शन व सजावट प्रेक्षणीय असते. शिव-शिवांगी या उभयतांचं नृत्य होतं.

हा कार्यक्रम संपताच पुन्हा राष्ट्रीय महत्त्वाच्या व सामाजिक आशय असलेल्या एखाद्या विषयाकडे आजही दंढार वळते. शिवपार्वतीच्या भक्तांच्या रूपात एखादं वृद्ध जोडपं दाखवतात. मागे अवांछित संततीचं लेंढार असतं. स्त्रीला (स्त्री वेषातील पुरुष) गरोदर दाखवतात मग कुठलाही व्यंगात्मक संवाद म्हटला जातो. कुटुंबकल्याण; साक्षरता व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा, जुन्या टाकाबू रूढी-परंपरा या दिशेने काही प्रबोधनही केले जाते.

लोकरंजन साधता साधता निरनिराळ्या सोंगाच्या माध्यमातून लोकशिक्षण आणि समाज प्रबोधन हे 'दंढार' या कलाप्रकाराचे महत्त्वाचे अंग आहे. प्रत्येक सोंगाच्या प्रवेशानंतर किंवा संवादानंतर टिपऱ्यावर लयबद्ध नाच हा असतोच.

इतर अनेक लोककलांप्रमाणेच लोप पाहू पाहणाऱ्या 'दंढार' या वैदर्भीय ग्रामीण पारंपारिक लोककलेला समाजाभिमुख करून लोकाश्रय मिळत राहिल्यास नव्या स्वरूपातील या लोककला पुन्या जोमानं पुन्हा लोकांसमोर येऊ शकतील. ■

प्रमुख संयोजक,
श्रीकृष्ण लीला मंडळ, म्हसेपठार
त. कळमेश्वर, जि. नागपूर

लेखकांना विनंती

साहित्य पाठविताना त्यावर संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे. नाव व पत्ता लिहिलेले आणि पुरेसे पोस्टेज लावलेले पाकीट लेखनासोबत असेल तरच साहित्य परत पाठविणे शक्य होईल.

वाङ्मयीन-वैचारिक : 'लोकानुकम्पा'

वसंत वाहोकार

लोकानुकम्पाचा १९८९ वर्ष अखेरचा अंक धम्मचक्र प्रवर्तन विशेषांक ह्या शीर्षकानं प्रसिद्ध झाला असून अंकाचे संपादक सुप्रसिद्ध दलित कथालेखक डॉ योगेंद्र मेश्राम ह्यांनी, ह्या अंकात तात्विक... वैचारिक...कथा.... कविता... ग्रंथपरिक्षणे, भाषणे इत्यादि भरगच्च मजकूर देऊन अंकाची समृद्धता-संपन्नता वाढवली आहे. साहित्य संस्कृति मंडळाकडून पुरस्कृत ह्या मासिक नियतकालिकाचा हा चौथ्या वर्षातील अखेरचा अंक म्हणजे दलित चळवळीतील भक्कम, जाणीवबद्ध प्रवासाचे एक दमदार पाऊलच म्हणावे लागेल. नुसती विषयाची व लेखकांची नामावली पाहिली, तरी एकूण दर्जाची निश्चित कल्पना येऊ शकेल, असा सर्वांगपूर्ण...सर्वसमावेशक अंक देण्याचा संपादकांचा दृष्टिकोण अभिनंदनीय आहे.

सुप्रसिद्ध कवी राजा ढाले ह्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मसंकल्पना' या आपल्या लेखात पूज्य बाबासाहेबांची धम्मविषयक, मते स्पष्ट करून त्यांचा बुद्ध तत्त्वज्ञान व कम्युनिझमच्या संदर्भात विचार केलेला आहे. भगवान बुद्ध काल मार्क्सला उत्तर देऊ शकतो काय हा बाबासाहेबांचा चाकोरीबाहेरचा प्रश्न ते उपस्थित करतात.

डॉ. यशवंत मनोहरांनी 'डॉ. आंबेडकर आणि सावरकर' ह्या आपल्या लेखात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी डॉ आंबेडकरांना नेहमीच कसे हीन लेखले....कमी पाहिले .... भिखू म्हणून कुचेष्टा केली हे पोटतिडीकेने विषद केले आहे. जेमतेम दोन-तीन पृष्ठांचाच लेखही अभ्यासकांसाठी एक 'वातावरण' म्हणून निश्चितच आव्हानात्मक आहे.

"अस्मितादर्श" मेळाव्याचे अध्यक्ष या नात्यानं केलेली लक्ष्मण माने व मधु मंगेश कर्णिक ह्या साहित्यिकांची भाषणं ह्याच अंकात समाविष्ट आहेत. लक्ष्मण माने ह्यांनी आपल्या भाषणात आदिवासी, दलित साहित्य चळवळीतील नव्या जाणिवा...नवे शिल्पकार ह्यांची दखल घेतली आहे. कवितांची अवतरणे देऊन आपली भूमिका विषद केली आहे. शिवाय जुन्या, जाणत्या, प्रगल्भ लेखक विचारवंतांचे वैचारिक महत्त्वही सर्वसामान्य वाचकांना जाणवून देण्याचा प्रांजळ प्रयत्न केलेला जाणवतो ह्याच लेखकाने 'अजून आपण एकही भरघोस कादंबरी का देऊ शकलो नाही?' हा मुद्दा नाटक...रंगभूमी...कविता...आत्मकथने ह्या लेखन प्रकारांची संपन्नता दाखवून उपस्थित केला आहे तो लक्षात घेण्यासारखा आहे.

लोकानुकम्पा मध्ये शंकरराव खरात, भीमसेन देठे, रविंद्र हुडसनकर ह्या तिघांच्या कथा आहेत, मात्र शंकरराव खरातांसारख्या प्रख्यात कथालेखकाने एवढी सामान्य कथा लिहावी हे खटकते...त्यापेक्षा देठे...हुडसनकर हे कथालेखक अधिक उजळ वाटतात. पंचवीसेक कवितांमध्ये दे. शि. दुधलकर, ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, दामोदर मोरे, श्रीपाद गंगाधर कावळे ह्या कवींची उपस्थिती आहे. 'खाई', 'मरणमाळा', 'प्रबुद्ध' ही ग्रंथपरिक्षणं-ग्रंथसमीक्षा देऊन संपादकांनी समीक्षालेखनालाही न्याय दिला आहे. प्रा. जयंतकुमार बंड, डॉ. योगेंद्र मेश्राम ह्यांनी हे समीक्षा लेखन केले आहे.

दलित साहित्य-विचार चळवळीला पुढे नेईल, न्याय देईल. वेगळ्या अर्थानं पुरोगामी विचार करण्यास प्रवृत्त करेल असे लेखन योजनापूर्वक रीतीनं देऊन संपादकानं आपली संपादकीय जबाबदारी नेकीनं सांभळली आहे. 'लोकानुकम्पा' आपल्या सामर्थ्यानं, वैशिष्टयपूर्ण रीतीनं, गांभीर्यानं साहित्य-संस्कृति-वैचारिक आघाड्यांवर आगेकूच करीत जाईल असा विश्वास वाटतो. तेव्हा अशा लेखक – संपादक– विचारवंतांचे अभिनंदन ! ■

लोकानुकम्पा / त्रैमासिक
संपा. /– डॉ. योगेंद्र मेश्राम

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र : खंड ९

प्रा. ना. ल. वैद्य

कै. श्री. खैरमोडे यांचे हे पुस्तक त्यांच्या मृत्यू नंतर प्रसिद्ध झाले. आंबेडकरांच्या चरित्राचा हा नववा खंड महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केला आहे.

डॉ. आंबेडकरांच्या चरित्राचे एकंदर १८ खंड लिहिण्याचा कै. खैरमोडे यांचा संकल्प होता. १९५२ ते १९६८ पर्यंत पाच खंड प्रसिद्ध झाले. सहावा खंड छापत असतानाच त्यांना १८-११-७१ रोजी मृत्यू आला, त्यावेळी त्यांचे वय ६७ वर्षांचे होते. १९८३ पासून पुढील खंडाचे काम महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हाती घेऊन, ६, ७, ८, ९ असे चार खंड प्रसिद्ध केले; १० वा खंडही प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

या ग्रंथात पहिली गोष्ट खटकते ती या ग्रंथातील अत्यंत अशुद्ध मुद्रण. मुद्रणाच्या इतक्या चुका शासनाकडून प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांचे बाबतीत होणे ही लाजीरवाणी गोष्ट आहे. "ळेमुगाय" (पृ. ४४) हा एक नमुना.

ग्रंथाच्या अंतरंगाबद्दल बोलायचे म्हणजे कै. खैरमोडे यांच्या प्रचंड परिश्रमांबद्दल अभिनंदन करावेसे वाटते. त्यांनी जमा केलेली माहिती अफाट आहे. ग्रंथाच्या मागे त्यांनी संदर्भ सूची दिली आहे; पण त्यापेक्षा कितीतरी अधिक पुस्तकांचे त्यांनी वाचन केलेले असणार ! डॉ. आंबेडकरांचे सार्वजनिक राजकीय आयुष्य, अनेक दशके पसरलेले, त्यांचा पत्रव्यवहार, त्यांनी दिलेल्या मुलाखती, त्यांनी लिहिलेली पुस्तके हे सगळे पाहिले म्हणजे सप्तसागर एकत्र झाल्यासारखे वाटतात. त्या सर्वांचे वाचन करणे, मनन करणे, हेही मोठेच दुर्घट कार्य. चरित्रनायकासंबंधी अनन्यसाधारण भक्ती हे त्याचे प्रमुख कारण असले पाहिजे, व हा गुण चांगलाच आहे. ख्रिस्तावरील भक्तीमुळेच मायकेल एन्जेलो, लिओनार्दो द व्हिन्सी सारख्यांची अजरामर कृती जगापुढे आली. भगवान बुद्धावरील अतूट श्रद्धेमुळेच अनेक स्तूप, अनेक विहारातील असामान्य प्रतिमेची चित्रे आणि पुतळे निर्माण होऊ शकले ! वाराणशी जवळील सारनाथ येथील बुद्धमंदिरात जपानहून चित्रकारांनी येऊन भित्तीचित्रे काढली आहेत, आणि त्या मंदिरातील बुद्धाची प्रतिमा तर अद्वितीय आहे. जगात त्याला तोड नाही.

डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या साहित्याखेरीज त्यांचे चरित्र लिहायचे म्हणजे इतर मातब्बर ग्रंथकारांची पुस्तके आणि सुप्रसिद्ध दैनिकातील जाणकारांचे लेख, हे सगळे वाचणे आलेच. ते सर्व कार्य कै. खैरमोडे यांनी चिकाटीने केले आणि तेंडुलकरांनी ज्याप्रमाणे गांधींचे दहा खंडात्मक चरित्र प्रसिद्ध केले, किंवा अब्राहाम लिंकनवरील निकोलाय आणि हे यांनी दहा खंडांचे चरित्र लिहिले, तसे कै. खैरमोडे यांनी लिहायचा संकल्प केला व त्यांच्या हयातीत सहा खंड प्रसिद्ध झाले. (व पुढील होत आहेत) ही फार अभिमानाची व संतोषाची गोष्ट आहे. मराठी वाचक कै. खैरमोडे यांचे याबाबतीत ऋणीच राहील.

चरित्रनायकाबद्दल भक्ती असली म्हणजे त्यात बरेचदां तारतम्य राहत नाही. एखाद्या भक्ताला आपले दैवत महान् वाटले म्हणजे इतरांना ते वाटलेच पाहिजे असे नव्हे ! एखादी व्यक्ती जेव्हा सार्वजनिक क्षेत्रात काम करते तेव्हा त्याच्या कृत्याचे मूल्यमापन होणारच; त्यात आंधळी भक्ती उपयोगाची नाही. कै. खैरमोडे यांची दृष्टी डॉ. आंबेडकरांवरील आंधळी भक्तीची आहे ही गोष्ट जागोजाग स्पष्ट होते. त्यामुळे त्यांच्या विधानात, माहितीत एकांगीपणा आला आहे. डॉ. आंबेडकरांनी जे जे केले ते योग्यच होते, त्याचे समर्थन भक्त करू लागतात. डॉ. आंबेडकरांचे व्यक्तित्व वादळी होते. त्यांच्या बोलण्यात, वागण्यात, लिहिण्यात कठोरता असे, कडवटपणा असे, पण ते सारे क्षम्य आहे; कारण त्यांना स्वतःला महार म्हणून अनंत यातना भोगाव्या लागल्या. पण यामुळे त्यांचे कॉंग्रेसवर, गांधी इत्यादी पुढाऱ्यांवर जे आक्षेप होते ते सगळेच समर्थनीय होते असे म्हणता येत नाही.

कै. खैरमोडे यांचा डॉ. आंबेडकरांचे अठरा खंडात चरित्र लिहिण्याचा दृष्टिकोन अनन्य साधारण भक्तिभावाचा दिसतो. त्यामुळे प्रत्येक कृत्याचे समर्थन अपरिहार्य झाले व वस्तुनिष्ठ विवेचनाला फाटा मिळाला.

ग्रंथाची रचना अत्यंत विस्कळीत आहे आणि त्यात तारतम्य व समतोलपणा आढळून येत नाही. उदाहरणार्थ प्रकरण ३ व ४, क्रिप्स योजना–यात नको ती माहितीच फार आली आहे. क्रिप्स योजना म्हणजे काय ते थोडक्यात सांगून, डॉ. आंबेडकरांची त्यात कामगिरी कोणती हे मुख्यत्वे सांगायला हवे ते यात फार कमी आले आहे, आणि विषयाशी संबंध नसणारा असा मजकूर बराच आहे.

डॉ. आंबेडकरांचे ९ नोव्हें. १९४२ रोजी मुंबई आकाशवाणीवरून झालेले भाषणचे भाषणच दिलेले आहे. या भाषणाने ९ पृष्ठे व्यापली आहेत. ७–८–१९४२ रोजी न्यू दिल्लीला भरलेल्या जॉइंट लेबर कॉन्फरन्स पुढील भाषण संपूर्ण उद्धृत केले आहे. त्यानेही नऊ पाने व्यापली आहेत. ते भाषण दिल्यानंतर, लगेच डिप्रेस्ड क्लासेस वेलफेअर असोसिएशन, न्यू देहली या संस्थेतर्फे डॉ. आंबेडकरांना २३-८–१९४२ रोजी मानपत्र देण्यात आले, ते संबंधच्या संबंध देण्यात आले आहे. ते संपल्यानंतर अस्पृश्यांची दुःखे आणि ती दूर करण्यासाठी सरकारने कोणते उपाय योजले पाहिजेत या संबंधी डॉ. आंबेडकरांनी २९–१०–४२ ला एक ५६ पानांचा खलिता गव्हर्नर जनरल यांना सादर केला त्याची माहिती दिली आहे. या सर्व माहितीला सलगपणे जोडणारा विचारांचा सांधा नीट जुळलेला नाही, त्यामुळे जो एकसंध परिणाम साधला जायला हवा तसा तो साधला जात नाही. निरनिराळ्या परिच्छेदात संवाद राखणे कै. खैरमोडे यांना अनेक ठिकाणी जमलेले नाही. तेव्हा हे चरित्र म्हणजे चरित्रलेखनासाठी जमविलेली टिपणे आहेत, चरित्र नव्हे असे खेदाने म्हणावेसे वाटते.

इंग्रजीत उतारे द्यायचे, त्याचा गोषवारा पुन्हा मराठीत, यामुळे पुनरुक्ति वाढून पृष्ठसंख्या वाढली.

ग्रं थि की

ज्या गोष्टींबद्दल अधिक ऊहापोह करायला पाहिजे त्याबद्दल एका ओळीत निभावून नेले आहे. उदा. " शीख धर्म स्वीकारण्याच्या बाबतीत केलेले प्रयत्न विफल झाल्यानंतर बाबासाहेब बौद्ध धर्म स्वीकारण्याचा विचार करू लागले." (पृ. ८०) डॉ. आंबेडकरांनी शीख धर्म का स्वीकारला नाही. याची कारणमीमांसा मुळीच नाही; आणि बुद्ध धर्म हिंदुस्थानातून नष्ट कां झाला तर, " याला काल कारण नसून वृद्धाचे शत्रू कारणीभूत आहेत. ब्राह्मण हे एकजात बुद्धाचे शत्रू " (पृ ८६) असली विधाने केलेली आहेत.

श्रीमती द्वारका खैरमोडे यांनी पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे. प्रस्तावनेनंतर प्रा. न. र. फाटक यांचे ८–५–१९६५ रोजी खैरमोडे यांच्या एकसष्टी समारंभानिमित्त पाठविलेले गौरवाचे पत्र जोडले आहे.

प्रा. फाटक त्या पत्रात लिहितात. "डॉ. भीमराव रामजी आंबेडकरांच्या चरित्रलेखनाने श्री. खैरमोडे यांचे नाव महाराष्ट्रात चिरस्मरणीय होऊन राहील. त्यांनी लिहिलेले चरित्र हे केवळ आंबेडकर या व्यक्तीचे नसून अखिल महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासाचे एक नवे अंग स्पष्टपणे जनतेच्या निदर्शनास आणणारे ते एक महत्कार्य होय." हे मात्र बऱ्याच अंशी खरे आहे, व हेच या चरित्राचे वैशिष्ट्य होय. ■

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खं. ९
ले. : चां. भ. खैरमोडे
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. प्रथमावृत्ती, डिसेंबर १९८७
पृष्ठे ४१७, मूल्य : चाळीस रुपये

स्मृति ठेवूनी जाती :
व्यक्तिचित्रांची आनंदयात्रा

: वसंत चिचाळकर

'स्मृति ठेवूनी जाती' ह्या केसरीचे विद्यमान संपादक शरच्चंद्र गोखले यांच्या संपर्कात आलेल्या आणि त्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव गाजविणाऱ्या व्यक्तींच्या वैशिष्टयांचा मनोरम आलेख आहे. तो वाचताना; काही अंशी आपण प्रस्तुत पुस्तकाच्या लेखकाची आत्मकथाही वाचीत असतो. इतकी ही सारी शब्दे आत्मीय आहेत. त्यात जिव्हाळयाचे आणि स्नेहाचे रंग मिसळले आहेत.

स्मरणांच्या गावी घेऊन जाणाऱ्या ह्या १३ व्यक्ती आपआपल्या क्षेत्रात नामवंत आहेत. त्यातील काहींचा लेखकाशी असलेला परिचय समाजसेवेच्या माध्यमातून आलेला आहे तर कुठे ऋणानुबंधाची नाती खोलवर रुजली आहेत. त्या त्या संबंधांतील नेमकेपण शरच्चंद्र गोखले यांच्या लेखणीने जबाबदारीने टिपले आहे.

भारताचे राष्ट्रपती आर. व्यंकटरमण यांची ओळख आणि भावभावनांनी चिंब झालेला ती. बाबूराव यांच्याशी असलेला सुखसंवाद पाहावा. व्यंकटरमण यांच्याविषयी त्यांनी सन्मान्य तटस्थता बाळगली आहे तर बाबूरावांच्या बाबतीत लिहितांना त्यांच्या आत्मीयतेची इंद्रायणी दुथडी भरून वाहत असते. त्या त्या व्यक्तीविषयी लिहिताना तो तो काळ डोळयापुढे उभा राहतोच पण त्या काळाविषयी सर्वसमावेशक विचार करणारी लेखकाची बहुश्रुतताही त्यात दिसते. त्या व्यक्तीच्या व्यक्तित्वाचा ठसा वाचकांच्या मनावर उमटवितांना त्याला चिंतनाची जोड लाभलेली असते. त्यामुळे ते शब्दचित्र केवळ घटनांचा तपशील न राहता, त्याला रसरशीत जिवंत रूपवैभव प्राप्त होते.

रघु राय ह्या छायाचित्रकाराची ओळख म्हणजे कलामूल्यांची गंभीर चर्चाच वाटते. रघू राय म्हणतात, 'शैलीवर माझा विश्वास नाही.' लेखक, कलाकार, छायाचित्रकार यांच्या दृष्टीने वास्तव अनुभव हेच आयुष्य. 'मुझमें प्यार है। प्यार इन्सानियत का गहना है। मझे जिंदगी में इन्सानियत का नजारा देखने की प्यास है।" पुढे ते स्वतःच्या कलाकृतीविषयी वाचकांना काय सांगशील असे विचारताच म्हणतात, 'मैं हात जोडके कहता हुं रघु राय को एक तरफ कर दीजियेगा' आणि त्यावर लेखकाचे मोठे मार्मिक भाष्य आहे. ते विचक्षण रसिकात शून्याच्या पलिकडचा अनुभव जगण्याची शक्ती यावी असे सांगतात. मौनमुग्ध क्षणच खऱ्या अनुभूतीचा क्षण असतो. त्याच्या मौनातच संवादाची प्रचंड शक्ती सामावली असते ती कशी हे सांगताना भगवान गौतमबुद्धाची अतिशय सुंदर गोष्ट सांगितली जाते आणि मौनाचे प्रभावशाली दर्शन घडविले जाते. शब्दांवाचून असलेली भाषा संवादाचे कसे महत्त्वाचे माध्यम असते ह्याचाही प्रत्यय दिला जातो. कलाकृति-कलावंत आणि रसिक यांच्यात असा शब्दशून्य संवाद असावा. त्याचे माध्यम कलाकृतीच असावी.

याशिवाय लक्षणीय आठवणी आहे त्या फिनिश सरकारच्या समाजकल्याण खात्यात असलेल्या कुमारी किर्स्ती व्हास्वीओ आणि डॉ. हेलन केलर यांच्या कुमारी किर्स्तीची आठवण हृदयंगम आहे, किर्स्तीच्या मैत्रीचे भावरम्य चित्रण लेखकाने केले आहे, उमद्या स्वभावाची, देखणी, चाणाक्ष सोनेरी केसांची बहुश्रूत तरुणी. पाश्चात्य तरुणीच्या मोकळेपणाने आपल्या मैत्रीची मुद्रा लेखकावर त्याच्या स्नेहबंधावर उठविली आहे. किर्स्तीच्या जीवनाची एका दुर्धर रोगानं वाट लावली आणि आणि लेखकाची तिच्याशी शेवटची गाठ पडली. तो सारा प्रसंग करुण आणि आर्त. तो लिहिताना लेखक अस्वस्थ झाले असतील. त्यांची अस्वस्थता थेट सहृदय वाचकांच्या मनातही उतरते.

डॉ. हेलेन केलर ह्या आंधळया, मुक्या आणि बहिऱ्या पण युगप्रवर्तक कर्तृत्वाचा परिचय सवळांच्या मनातही नवनवीन उर्मी जागविणारा आहे. संपूर्ण जीवनाचा घनदाट काळोख करणाऱ्या नियतीशी हेलन केलर यांनी दिलेली यशस्वी झुंज म्हणजे प्रतिकूलतेवर परिश्रमांचा जय होय. ह्या लेखातील एक प्रसंग अतिशय हृद्य आहे. त्यांना


'पाणी' या जीवनदायी शब्दाची ओळख करून घ्यायची असते त्यासाठी झुळझुळणाऱ्या प्रवाही पाण्यात त्यांचा हात धरल्या जातो. पाण्याचा सुखद, शीतलस्पर्श त्यांना 'पाणी' या शब्दाची जिवंत ओळख करून देतो.

लेखकाचे लेखन सामर्थ्य अन्य लेखातूनही जाणवते. 'सोन्याचा पिंपळ,' 'तपस्वी डॉ. शिवाजीराज पटवर्धन, 'विनकाटद्याचे घडयाळ' या लेखनातून समाजसन्मुख आणि समाजोपयोगी माणसांची ओळख होत जाते.

श्रीविद्या प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या ह्या पुस्तकात लेख कधी लिहिले त्याचे वर्ष नाही. ते या आधी कुठे प्रसिद्ध झालेत वगैरे गौण बाबींना आस्वादक समीक्षेत विशेष महत्त्व असू नये.

त्यांनी चाळविलेली ही 'स्मृतींची पाने' म्हणजे त्या त्या व्यक्तींबरोबरची एक आनंदयात्रा आहे एवढे मात्र खरे आणि वाचकांनाही ती सुखावह वाटते. ■

'स्मृती ठेवूनी जाती'
लेखक–शरच्चंद्र गोखले
प्रकाशक–श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
मूल्य–३५ रुपये, पृष्ठे–११३



साभार पोच

अंगारा : राम शेवाळकर / साहित्य प्रसार केंद्र, नागपूर / रुपये ३० [पृष्ठे ४८]
सारस्वताचे झाड : राम शेवाळकर / साहित्य प्रसार केंद्र, नागपूर / रुपये ५० [पृष्ठे १३४]
रुचिभेद : राम शेवाळकर / साहित्य प्रसार केंद्र, नागपूर / रुपये ५० [पृष्ठे १४७]
देवाचे दिवे : राम शेवाळकर / साहित्य प्रसार केंद्र, नागपूर / रुपये ३५ [पृष्ठे ९७]
७२ मैल : अशोक व्हटकर / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रुपये ६० [पृष्ठे १२२]
अग्निशिखा : सुगंधा शेंडे / शीलन प्रकाशन, नागपूर / रुपये ४० [पृष्ठे १२९]
ज्ञानेश्वरी वाग्विलास दर्शन : डॉ. शं. कि. चतुरकर / पु. वि. चतुरकर, दर्यापूर / रु. ३० [पृष्ठे १०३]
पालवी : सौ. अरुणा श्रीखंडे / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रुपये ३० [पृष्ठे १०७]
युगारंभ : सुखराम हिवराळे / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रुपये १६ [पृष्ठे ४०]
माळरानांच्या कविता : सुखराम हिवराळे / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रुपये २८ [पृष्ठे ५५]
माझ्या पृथ्वीवर : प्रा. प्रसन्नकुमार पाटील / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रुपये ३२ [पृष्ठे ६४]
मी झक मारली : जालंदर सोनुने / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रुपये ३५ [पृष्ठे १११]
हुंकार विद्रोहाचे : एफ. सी. मोरे / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रुपये २५ [पृष्ठे ४७]
श्वेतपत्रिका : शरणकुमार लिंबाळे / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रुपये ३० [पृष्ठे ६४]
अंधारयात्रा : बाळासाहेब जांगळे / प्रचार प्रकाशन, / रुपये ५० [पृष्ठे १२७]
प्रवाह : रघुवीरसिंह राजपूत / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रुपये ४० [पृष्ठे १००]
डॉ. आंबेडकर दलित साहित्य : डॉ. भालचंद्र फडके / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रुपये ८० [पृ. २२७]
पाऊसफुले : हेमकिरण पत्की / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रुपये २७–५० [पृष्ठे ६२]
गडचाराजा / EIAN RACSIDE : पॉप्युलर प्रकाशन, पुणे / रुपये २५० [पृष्ठे ३१२]
एका पावसाळयात : शिरिष पै / पॉप्युलर प्रकाशन, पुणे / रुपये ४० [पृष्ठे ३१]
हाकुमी : सुरेश द्वादशीवार / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रुपये ५० [पृष्ठे १३९]
आणखी पूर्वज : वि. ग. कानिटकर / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रुपये ४० [पृष्ठे १२३]
विज्ञान आणि वैज्ञानिक : जयंत नारळीकर / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रुपये ३५ [पृष्ठे १०३]
दलितांचा विचारसंघर्ष : प्रा. अशोक गोडघाटे / अभिजित प्रकाशन, नागपूर / रुपये ५० [पृष्ठे १४४]
ओल्या जखमा : ल. स. रोकडे / अभिजित प्रकाशन, नागपूर / रुपये ३० [पृष्ठे ९२]
तांडा : आत्माराम कनिराम राठोड / अभिजित प्रकाशन, नागपूर / रुपये ६० [पृष्ठे १९७]
सातीग्रंथ : स्वरूप आणि समीक्षा : कृ. द. देशपांडे / सत पब्लिकेशन, पुणे / रुपये ८० [पृष्ठे २५५]
मराठी शब्दसमीक्षा : मु. श्री. कानडे / सन पब्लिकेशन, पुणे / रुपये ४५ [पृष्ठे १२७]
डोहकाठ : रमाकांत कुळकर्णी / सागर प्रकाशन, हिप्परगा / रु. ११ [पृष्ठे ५३]
खडकातील निर्झर : सौ. प्रतिभा कुळकर्णी / जानकी पब्लिकेशनस्, नागपूर / रुपये ३५ [पृ. १०१]
गाणी मुलाफुलांची : स. सो. सुतार, वि. स. सुतार / स्नेह प्रकाशन, जळगाव / रुपये १२ [पृष्ठे ४४]
भाषा व साहित्य : संशोधन : संपादक डॉ. वसंत य. जोशी, प्रा. म. ना. अदवंत /
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे / रुपये ८० [पृष्ठे ३५७]

प्राचीन मराठी वाङ्मयातील लोकतत्त्व : सौ अनिता मुजुमदार / सविता प्रकाशन, औरंगाबाद / रुपये ८० [पृष्ठे २७४]

नेश्वरी दशरूपदर्शन : डॉ. हे. वि. इनामदार, चंद्रमा प्रकाशन, पुणे / रुपये ५० [पृष्ठे १४४]

कॉम्रेड जोशी : अमर रामटेके

अंतरीचे दिवे : शोभना चांदुरकर / ज्ञानेश प्रकाशन, नागपूर / रुपये २० [पृष्ठे ६०]

सामाजिक मूल्यसंघर्षांचा इतिहास । डॉ. योगेंद्र मेश्राम / विश्वभारती प्रकाशन, नागपूर / रुपये ७५ [पृष्ठे १९३]

मस्तानी : द. ग. गोडसे / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रुपये १०० [पृष्ठे २८०]

कॉम्रेड डांगे : बाबुराव रणदिवे / अभिनव प्रकाशन; मुंबई / रुपये ६० [पृष्ठे १७०]

वंश-पाऊलखुणा : जयंत पवार / अभिनव प्रकाशन, मुंबई / रुपये १५ [पृष्ठे ७९]

विज्ञान छांदशीं : रघुकृष्ण शेटये / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रुपये ७ [पृष्ठे ३६]

दस्तऐवज : देवेंद्र खंडारे / सुरेश एजन्सीज, पुणे / रुपये २५ [पृष्ठे ७६]

माणसाला हक्क निवड करण्याचा : विनायक राजाराम लिमये / उन्मेष प्रकाशन, पुणे / रुपये ५० [पृष्ठे ४५९]

पाथेय : कुसुमाग्रज / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रुपये ४० [पृष्ठे ९५]

पक्षांचे लक्ष थवे : ना. धों. महानोर / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रुपये ६० [पृष्ठे ९८]

प्रार्थना दयाघना : ना. धों. महानोर / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रुपये ५० [पृष्ठे ९४]

डॉनव्हॅन : राजा राजवाडे / लोकवाङ्मय गृह लि. मुंबई / रुपये ३० [पृष्ठे २०२]

तिरकस आणि चौकस : दिलीप पुरुषोत्तम चित्रे / लोकवाङ्मय गृह, मुंबई / रुपये ५० [पृष्ठे १५२]

तीन अर्वाचीन कवी : मार्क्सवादी दृष्टिक्षेप : स. त्र्यं. कुळी / लोकवाङ्मय गृह, मुंबई रु. ५० [पृ. १५०]

प्रश्नशोध : केशव मेश्राम / लोकवाङ्मय गृह, मुंबई / रुपये ५० [पृष्ठे १६७]

एक स्पृश्याची डायरी : सदा कऱ्हाडे / लोकवाङ्मय गृह, मुंबई / रुपये २५ [पृष्ठे १०३]

चार्ली चॅप्लीन : रंगनाथ कुळकर्णी / लोकवाङ्मय गृह, मुंबई / रुपये १५ [पृष्ठे ५१]

शहिद भगतसिंह : एक झंझावात : प्रकाश रेड्डी / लोकवाङ्मय गृह, मुंबई / रुपये १० [पृष्ठे ४६]

गुरुदत्त : भाऊ पाध्ये / लोकवाङ्मय गृह, मुंबई / रुपये ३० [पृष्ठे ६७]

विज्ञान कुतूहल : जगदीश काबरे, अरविंद कुळकर्णी / लोकवाङ्मय गृह, मुंबई / रु. ४५ [पृष्ठे १००]

क्रांतीप्रेरणा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर : डॉ. योगेंद्र मेश्राम / पारमिता साहित्य चळवळ, नागपूर रुपये १८ [पृष्ठे ७२]

कस्तुरी सुगंध : चंद्रशेखर जोशी / राष्ट्र प्रकाशन, नागपूर / रुपये २१ [पृष्ठे ६६]

जगण्याचा प्रश्न : डॉ. योगेंद्र मेश्राम / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर रुपये ६० [पृष्ठे १७९]

काजळी : वामन चव्हाण / आरती प्रकाशन, डोंबिवली / रुपये ३५ [पृष्ठे ८७]

आरसा : आसावरी काकडे / सेतू प्रकाशन, पुणे / रुपये २५ [पृष्ठे ५६]

वा | च | की | य

स. न. वि वि.

'युगवाणी'चा जाने-फेब्रु-मार्च ९० चा अंक मिळाला. त्याचे बदलते वाङ्मयीन रूप आणि दर्जा पाहून आनंद वाटला. प्रकाशनातील सातत्यही महत्त्वाचे आहे. वाङ्मयीन नियतकालिकांच्या निरोगी अस्तित्वासाठी विदर्भ साहित्य संघ आणि 'युगवाणी' करीत असलेले प्रयत्न निश्चितच प्रशंसनीय आहेत. प्रबंध सूची, गझलचे छंद:शास्त्र, संवादप्रक्रिया, धूळपाटी : एक भाषिक अभ्यास, मराठी भाषालेखन इ. लेख विचारप्रवर्तक तसेच संदर्भमूल्य असलेले आहेत. साहित्यसंस्थांची नियतकालिके 'पॉप्युलर' स्वरूपाचे साहित्य देऊ शकत नाहीत, देऊही नये. त्यासाठी अन्य नियतकालिके असतातच. समीक्षा, संशोधन आणि वैचारिक चिंतनात्मक लेखनाला अशा व्यासपीठांची आवश्यकता असते. चालू अंकातील 'मराठीविषयक प्रबंधांची सूची' या डॉ. व. वि. कुलकर्णी यांच्या लेखावरील माझी प्रतिक्रिया सोबत पाठविली आहे.

हा एक उपयुक्त व आवश्यक प्रकल्प पूर्ण केल्याबद्दल डॉ. वसंतराव कुलकर्णी यांचे अभिनंदन केले पाहिजे. डॉ कुलकर्णी यांनी सूचीमध्ये आवश्यक त्या साक्षेपाने अद्ययावतपणा आणलेला दिसतो. त्यांनी काढलेले निष्कर्ष, दिलेली माहिती उद्बोधक तशीच रंजक वाटते. घेतलेल्या कष्टांची जाणीव होते.

गेली काही वर्षे याच विषयाचा विचार मी करीत असल्याने त्यातील अडचणींची कल्पना मला आहे. 'भाषा व साहित्य : संशोधन'चे जे तीन खंड आम्ही सिद्ध केले, त्यात डॉ. म. प. पेठे यांची प्रबंधसूची आहे. त्यातील काही त्रुटींचा उल्लेख डॉ. कुलकर्णी यांनी केला आहे. परंतु त्यांची कारणे त्यांच्याच लेखात मिळण्यासारखी आहेत. 'असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी'ची सूची किंवा 'युनिव्हर्सिटी न्यूज' यांचा आधार (प्रारंभी) घेतल्याने तसे घडले आहे. विद्यापीठांकडून मराठीतील प्रबंधसूची संबंधितांकडून मिळविण्याचा प्रयत्न आम्ही सातत्याने केला. ज्यांनी सहकार्य केले, त्यांची माहिती व्यवस्थित आली, परंतु प्रयत्न करूनही ज्यांनी माहिती पाठविली नाही, त्यांचेबाबत 'युनिव्हर्सिटी न्यूज'वर अवलंबून राहावे लागले.

'आचार्य' ही पदवी प्राप्त न केलेल्या मार्गदर्शकांच्या नावात डॉ. स. गं. मालशे यांचा उल्लेख पाहून आश्चर्य वाटले. डॉ. मालशे यांनी प्रा. प्रियोळकर यांच्या मार्गदर्शनाने फादर स्टीफन्स यांच्या 'ख्रिस्त पुराणा'वर प्रबंधलेखन केलेले आहे. डॉ. कुलकर्णी यांच्या सूचीत ती नोंद असावी. (नसल्यास करावी.)

अमुद्रित प्रबंधांविषयीचे डॉ. कुलकर्णी यांचे अनुभव बोलके आहेत. माझा प्रबंध एका वाङ्मयेतिहासकारांनी मागवून घेतला. त्याचा उपयोगही केला परंतु माझ्या सहकार्याची नोंद करण्यास ते विसरले.

मराठीतील आजवरच्या प्रबंधांची सारसूची तयार करणे ही आजची गरज आहे. अर्थात या कामासाठी संबंधित विद्यापीठे व प्रबंधलेखक यांच्या सहकार्याची फार आवश्यकता आहे. विविध साहित्य संस्था आणि मराठी विभागांनी एकत्र येऊन याविषयी प्रयत्न केले पाहिजेत.

डॉ. कुलकर्णी यांनी तयार केलेली प्रबंधसूची मुद्रित स्वरूपात लवकर उपलब्ध होण्याची गरज आहे.

आपला

कोल्हापूर (डॉ.) वसंत स. जोशी

स. न. वि. वि.

'युगवाणी'चा जाने-फेब्रु-मार्च ९० चा अंक मिळाला. ललितेतर, चर्चात्मक व वैचारिक लिखाणाला प्राधान्य मिळालेले पाहून आपल्या मनोधैर्याचे खूप कौतुक वाटले. सहज नजरेत भरलेल्या काही विसंगती आपल्यापुढे मांडीत आहे.

पृष्ठ १९ : मराठीविषयक प्रबंधांची सूची (१९३९-१९८९) हा डॉ. व. वि. कुलकर्णी यांचा लेख. विषय परिचयातील सुरुवातीची तिसरी ओळ. "पुणे विद्यापीठाने डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचा प्रबंध त्याच वर्षी (१९३९ मधे) आचार्य (पीएच. डी) पदवीकरिता स्वीकृत केला."

माझी शंका अशी-१९३९ साली पुणे विद्यापीठ अस्तित्वात आले होते का ? का त्यावेळी म. म. दत्तो वामन पोतदार वगैरे मंडळी "महाराष्ट्र विद्यापीठ" पुणे येथे स्थापन व्हावे म्हणून चळवळ करीत होते ?

याच लेखात पृ. २४ वर पहिल्या स्तंभात काळानुसार दिलेल्या मानकऱ्यांच्या यादीत "१९३९-डॉ पु. ग. सहस्रबुद्धे (मुंबई) असा उल्लेख आढळतो तेव्हा यातील कोणती माहिती बरोबर आहे असे वाचकाने मानावयाचे ?

पृष्ठ ६६ वर श्री. ना. त्र्यं. देशपांडे यांच्या टिपणात त्यांनी विदर्भातील कानकोंडेपणा, पश्चिम महाराष्ट्रातील संकोच व दक्षिण महाराष्ट्रातील भिडस्तपणा अशा तीन समानार्थक शब्दांचा उल्लेख करून ते विशिष्ट प्रदेशातच समजू शकतात असे विधान केले आहे. माझ्याकडे डॉ शं. गो. तुळपुळे यांनी संपादित केलेला "मराठी भाषेचा तंजावरी कोश" हा ग्रंथ आहे. तो शिवाजी-महाराजांच्या काळी तंजावर या तामिळनाडू शहरातील तयार झालेल्या एका शब्दकोशाची माहिती देतो. त्यामध्ये पृष्ठ ४९ वर "कानकोंडा =कळून अयुक्त करणार" व पृ. १३१ वर "भीड-१. दाटणे, २. दाक्षण्य" असे अर्थ दिलेले आहेत. तेव्हा त्या काळी तरी शब्दांच्या अर्थच्छटेला प्रादेशिकतेचा दर्प येत नसावा असे वाटते.

याच लेखामध्ये पृ. ६७ वर RUSK असा इंग्रजी शब्द छापून त्याचा "संधिप्रकाश" असा अर्थ दिला आहे. तो मुद्रण दोष असावा व मूळ शब्द DUSK असावा असे वाटते.

सहज दिसलेल्या काही त्रुटी मी दाखविल्या आहेत. हे तुम्हाला पटल्यास या पत्राच्या लेखनामागील उद्देश साध्य झाला असे मला वाटेल. कळावे.

आपला,

पुणे — हे. वें. बलकुंदी

स. न. वि. वि.

आपल्या त्रैमासिकाचा जा. फे. मा. १९९० चा अंक नुकताच वाचनात आला. त्यात डॉ. कुळकर्णीचा प्रबंध सूचीविषयक लेख वाचून माझ्या प्रतिक्रिया कळवीत आहे.

पीएच. डी. पदवीला 'आचार्य' हा शब्द वापरला आहे, त्याबद्दल सर्वांनी मिळून एक शब्द ठरवायला हवा. पृ. २४ वर 'महिला'मध्ये पहिल्या पाच मानकरणींचा उल्लेख केला आहे. प्रकाशित व अप्रकाशित असे सर्व प्रबंध आपण घेतले असल्यामुळे आपल्या माहितीसाठी कळवीत आहे.

मी 'मराठी लघुकथेचा विकास' या नावाचा (सूचीसह ११८३ टंकलिखित पृष्ठांचा) प्रबंध कै. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली लिहिला असून तो १९६७ साली पुणे विद्यापीठाने मान्य केला. फार मोठा असल्याने तो कुणी छापेना व काटछाट करायला मी तयार होईना. (कारण मग त्याचे प्रबंध हे स्वरूपच नष्ट होत होते.) म्हणून तो अप्रकाशित राहिला. पण त्याची टंकलिखित प्रत पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहे. त्याचे परीक्षक कै प्रा. अनंत काणेकर व डॉ. वि. म. कुलकर्णी हे होते. एक प्रत माझ्यापाशी आहे. दोन प्रती मी पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांना संदर्भ-ग्रंथ म्हणून उपयोगी पडावा म्हणून दिल्या आहेत. मी त्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी.

माझ्या आधीच्या वर्षी १९६६ साली कै. डॉ. कुसुम कुळकर्णी यांचा 'मराठी कादंबरीतील मनोलेखन' हा प्रबंध पुणे विद्यापीठाने मान्य केला आहे. तोही अप्रकाशित आहे. पण विद्यापीठाच्या ग्रंथालयात त्याची प्रत सापडणारच.

प्रसिद्ध कवयित्री डॉ. अनुराधा पोतदार यांचा प्रबंध आमच्या आधीचा आहे. तो तर प्रकाशितच

आहे. विद्यापीठ कोणते हे मात्र लक्षात नाही. 'मराठी लघुकथा' ह्याच विषयावर भालचंद्र फडके, व इंदुमती शेवडे यांचेही प्रबंध आहेत.

कै. डॉ. रा. शं. वाळिंबे (आमचे प्राध्यापक) यांचा प्रबंध 'ज्ञानेश्वरीतील रस...' असा काहीसा आहे, तो अप्रकाशित असावा. पहिल्या पाच मानकऱ्यांमध्येच ते कुठेतरी असणार, कृपया नोंद घ्यावी, कळावे,

आपली

पुणे — नलिनी बापट

स. न. वि, वि.

'युगवाणी'चा जाने–मार्च ९० चा अंक मिळाला. वाचून काढला. सर्व लेख माहितीपूर्ण वाटले. विशेषत: डॉ. व. वि. कुळकर्णी यांचा 'मराठीविषयक प्रबंधांची सूची' हा लेख अभ्यासपूर्ण वाटला. 'युगवाणी' अशीच प्रगतीची वाटचाल करो, ही शुभेच्छा. कळावे.

आपला,

डोंबिवली — ज. बा. कुलकर्णी

स न. वि. वि.

'युगवाणी'चे चारही अंक मिळाले. अत्यंत सुंदर निघाले आहेत. त्यातील साहित्यही अत्यंत दर्जेदार आहे. लेखांची निवड फार चोखंदळ वाटली 'युगवाणी'ची प्रदीर्घ साहित्यिक परंपरा तुम्ही यशस्वीरीत्या चालविली, याचा अत्यंत आनंद वाटतो. हार्दिक अभिनंदन.

तुमचा

औरंगाबाद — यू. म. पठाण

स. न. वि. वि.

'युगवाणी'च्या ऑ. नो. डि. ८९ च्या अंकातील सु. वा. कुळकर्णी यांचा 'ज्ञानदेवांचा कालखंड। काही नवी समीकरणे' हा लेख वाचला. त्याबद्दलची माझी प्रतिक्रिया थोडक्यात देत आहे,

१. ज्ञानेश्वरी–लेखनाचा रूढ शक १२१२ व श्री. कुलकर्णी यांच्या मते असणारा ज्ञानेश्वरीचा लेखनकाल (शके ११९३ ते शक १२०२) यात फार फरक नाही.

२. ज्ञानेश्वरांचा समाधिकाल सांगणारा 'बालछंद' अभंगातील भाग श्री. सु. बा. कुलकर्णी यांच्याही मते नंतर जोडलेला आहे. तेव्हा त्याचेही प्रामाण्य संशयास्पदच आहे.

३. ज्ञानदेवांनी आपली सर्व चीजवस्तू कान्हो पाठकांना बहाल केली होती.' असे श्री. कुलकर्णी म्हणतात, पण ज्ञानदेवासारख्या विरक्त योग्याकडे चीजवस्तू असेल काय ? आणि असलीच तर ती परमेश्वराला अर्पण करण्याचे सोडून ते कान्हो पाठकांना अर्पण करतील काय ? यासाठी श्री. कुलकर्णी यांनी काहीही प्रमाण दिलेले नाही एकूण ही घटना ज्ञानदेवांना कमीपणा आणणारी वाटते.

४. 'चंद्रार्क तारांगणे रश्मी' या शब्दांतून ज्ञानदेवांचा समाधिशक सूचित होतो, असे ते मानतात. तसे मानण्यास काहीच आधार दिसत नाही. शिवाय 'चंद्रार्क तारांगणे रश्मी' म्हणजे १२०२ हाही अर्थ बरोबर नाही. कारण चंद्र म्हणजे एक. व अर्क म्हणजे सूर्य अर्थात बारा. पुढे 'रश्मी' या शब्दाचा अर्थही त्यांनी 'रश्मिराज' (सूर्य) असा करून त्याचा अर्थही 'बारा' हाच घेतलेला आहे. मग 'अर्क' म्हणजे मात्र 'एक' हा अर्थ कसा घेता येईल ? 'चंद्रार्क तारांगणे रश्मी' यातून अगदी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे संख्या घ्यावयाची असली तरी ती 'अंकानां वामतो गतिः' या नियमानुसार १२०१२१ अशी येईल. १२०२ अशी येणार नाही. अशा स्थितीत ज्ञानदेवांची आयुर्मर्यादा ऐंशी वर्षांची मानणे हीही एक कविकल्पनाच मानावी लागेल.

५. 'वीठ्ठलु वीरु कथन' लीळेचा त्यांनी उल्लेख केला आहे. वास्तविक या लीळेतील 'विठ्ठल' म्हणजे स्वत:ला 'वीर विठ्ठल' म्हणवून घेणारा दुसरा कोणी तोतया विठ्ठल आहे, त्याचा ज्ञानदेवादि भावंडांशी काहीच संबंध नाही. हे मी माझ्या 'विठ्ठलुवीरुकथन : लीळेचा एक संभाव्य अर्थ" या मराठी संशोधन पत्रिकेतील (ऑ. नो. डि १९८०) लेखात दाखवून दिले आहे.

आपला

इस्लामपूर — रा. पां. निपाणीकर

स. न. वि. वि.

कालच ‘ युगवाणी ’या अंक मिळाला. जवळजवळ सारे लेख वाचले. ‘ युगवाणी ’ दिवसेंदिवस प्रगल्भ आणि प्रौढ होतेंय हे पाहून आनंद झाला.

‘ माडखोलकर स्मृती पारितोषिका ’च्या निमित्ताने डॉ. विश्वेश्वर सावदेकर यांचे समालोचन वाचले आणि आवडलंही. त्यांनी ‘ कृतार्थ ’ ह्या माझ्या कादंबरीवर लिहिताना, प्रज्ञाभारती डॉ. वर्णेकर यांच्या प्रस्तावनेतील एका मुद्याला विशेष महत्त्व दिल्याचं जाणवलं.

वस्तुत: काल, विषय, आणि व्यक्ती ही निवड सोपी असते. नजिकच्या काळातल्या समकालीन हयात असताना कादंबरी-लेखन अत्यंत धाडसाचं असतं. त्यावर प्रचंड टीका होऊन ते फेकलं जाण्याचं, लेखकाच्या लेखनाचा अपमान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कादंबरीचा काळ महत्त्वाचा नसून आपण त्या व्यक्तीला किती यशस्वी साकार करतो हे महत्त्वाचं आहे.

नजीकच्या काळातल्या व्यक्तिरेखा ह्या अधिक सजीव, सकस आणि त्यांच्या जीवनातील प्रत्येक घटना साधार आणि नुकतीच अनुभवलेली म्हणून सजीव असते. असं लिहिणं अत्यंत कठीण, चॅलेंजिंग आणि धाडसाचं असतं असं मला वाटतं. काळ त्यासाठी गौण वाटतो.

कळावे. वाटलं ते कळवलं.

आपली

नागपूर सौ. शुभांगी भडभडे

स. न. वि. वि.

आपण पाठविलेले अंक मिळाले. आभारी आहे. दोही अंक वाचले. अंक वैविध्यपूर्ण व विपुल सामग्रीयुक्त वाटले. आपले संपादकीय मौलिक विचार व्यक्त करणारे आहे. ‘ युगवाणी ’ला जे नवे पागोरे फुटत आहेत, त्याचे श्रेय निश्चितच आपणास द्यावे लागेल. कविता बिभाग थोडा कच्चा वाटला. घुरीची कविताही समाधान देऊ शकली नाही. ‘युगवाणी ’ची परिधी अधिक सपक करू पाहणाऱ्या आपल्या संपादनास माझ्या शुभेच्छा.

आपला

हिंगोली भ. मा. परसवाळे

स. न. वि. वि.

‘ युगवाणी ’चा जा. फे. मा. ९० चा अंक साहित्य अकादमी वाचनालयात आज बघितला. प्रा. श्रीधर शनवारे यांची कविता अप्रतिम वाटली.

आपला

नवी दिल्ली. शेखर

स. न. वि, वि.

‘ युगवाणी ’चे तुमच्या संपादनाखाली निघालेले अंक पाहिले, मजकुराची मांडणी, नवीन उपक्रम, विशेषत: लेखांसाठी सुचविलेले विषय, मुद्रण सर्व दृष्टींनी अंक आकर्षक निघत आहेत याबद्दल हार्दिक अभिनंदन !

‘ युगवाणी ’मध्ये खालील बाबींवर माहिती यावी असे सुचवावेसे वाटते. जे शक्य असेल ते करावे. अशी विनंती आहे.

–विदर्भातून ज्यांना ‘ मराठी ’वरील प्रबंधावर पीएच. डी. मिळते त्यांचा वि. सा. संघाकडून सत्कार होतो हा उपक्रम चांगलाच आहे. परंतु विदर्भाबाहेरच्यांनाही विदर्भातील मराठी संशोधनाचा परिचय व्हावा या दृष्टीने प्रत्येक प्रबंधाचा सारांश ‘युगवाणी ’त यावा. ही प्रबंध–सार–सेवा ‘ युगवाणी ’तून सुरू करावी, आपल्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात प्रबंध–परिचयाचा उपक्रम आहे, त्याच्याच आधारे हा उपक्रम घेता येईल.

–युगवाणी–ऑ. नो. डि. ८९ च्या अंकात पृ.८६ वर असे म्हटले आहे की “ युगवाणी ”च्या प्रत्येक अंकाला अध्ययन–संशोधन व अभिरुची या दृष्टीने संग्राह्य मूल्य प्राप्त होईल असे धोरण व्यक्त करून,..” या दृष्टीने प्रबंधलेखनाचे तंत्र, ग्रंथसूची अशा एम. फिल्. च्या शिक्षणक्रमात असलेल्या एखाद्या विषयावर प्रत्येक अंकात एक तरी लेख असावा. मी या दृष्टीने ग्रंथसूचीवर लेख देऊ शकेन. उपयुक्त अशा संदर्भग्रंथांची माहिती देऊ शकेन. याचा उपयोग होईलसे वाटते.

कळावे ही विनंती. शुभेच्छा.

आपला

नागपूर व. वि. कुळकर्णी

संमेलन विशेष

एकेचाळिसावे विदर्भ साहित्य संमेलन दिनांक ३०, ३१ मार्च व १ एप्रिल १९९० या तीन दिवसात चंद्रपूर येथील सरदार पटेल महाविद्यालयाचा प्रांगणात उभारण्यात आलेल्या कै. कर्मवीर दादासाहेब कन्नमवार नगरात संपन्न झाले मुख्य प्रवेशद्वाराला लोकाग्रणी बाबासाहेब देशमुखांचे; तर व्यासपीठाला साहित्य भूषण तु. ना. काटकरांचे नाव देण्यात आले होते. शुक्रवारी दुपारी ग्रंथदिंडीने कार्यक्रमांची सुरवात झाली.

उद्घाटनाचा सोहळा : ३० मार्च

प्राचार्य जयंतराव मादुस्कर प्रा. शाम गुंडावार आणि महिला महाविद्यालयाच्या मुलींनी शारदा-स्तवन, महाराष्ट्रगीत व स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. चंद्रपूरचे श्री. श्रीपाद जोशी यांच्या संदेश वाचनानंतर स्वागताध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी चंद्रपूरच्या वाङ्मयीन व सांस्कृतिक जीवनाचा व परंपरांचा आढावा घेणारे भाषण करून सर्वांचे सानंद स्वागत केले.

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकरांच्या प्रास्ताविकानंतर संमेलनाचे उद्घाटक सुप्रसिद्ध समीक्षक व कथाकार प्रा. गंगाधर गाडगीळांनी दीप प्रज्वलीत करून संमेलनाचे उद्घाटन केले.

याप्रसंगी सर्वश्री ना. रा. शेंडे, प्रा. मधुकर केचे, प्रा. राम शेवाळकर, डॉ. श्रीमती उषाताई देशमुख, प्रा. वामनराव चोरघडे, प्रा. के. ज. पुरोहित, प्रा. गंगाधर गाडगीळ, ह्या निरनिराळ्या संमेलनाच्या पूर्वाध्यक्षांचा व विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित असलेल्या श्री. शरणकुमार लिंबाळे यांचा गौरवचिन्ह, श्रीफळ व रुमाल देऊन सत्कार करण्यात आला. मोजक्याच पण भावपूर्ण शब्दात आपले मनोगत व्यक्त करून पुसदच्या चाळीसाव्या संमेलनाध्यक्षा श्रीमती देशमुख यांनी वर्तमान अध्यक्षांकडे संमेलनाची सूत्रे सुपूर्त केली.

साप्ताहिक 'क्षेप'चा संमेलन विशेषांक; स्मरणिका, प्रा. विमल गाडेकरांचा 'ऋतुबंध' व श्री. चंद्रशेखर जोशी यांच्या 'कस्तुरी–सुगंध' या काव्यसंग्रहांचे प्रकाशन संमेलनाध्यक्ष प्रा. मो. दा. देशमुख यांनी केले. संमेलनस्थळाच्या परिसरात ग्रंथोत्सवाचे निमित्ताने उभारलेल्या पुस्तक प्रदर्शनाचे व चित्र, शिल्प, नाणे प्रदर्शनाचे उद्घाटनही अध्यक्षांनी केले. संक्षिप्त पण उद्बोधक अशा अध्यक्षीय भाषणानंतर प्रा. शाम गुंडावारांचे 'पसायदान' होऊन ह्या उद्घाटन सोहळ्याची सांगता झाली.

निमंत्रितांचे कविसंमेलन

याच दिवशी रात्री १० वाजता निमंत्रितांचे कविसमेलन झाले. कविभूषण ब. ग. खापर्डे यांना हा कार्यक्रम समर्पित करण्यात आला होता. सर्वश्री कलीम खान, शंकर बडे, शिवा राऊत, बबन सराडकर, मिर्झा रफी अहमद बेग, उषाकिरण आत्राम, प्रफुल्ल शिलेदार, सुखदेव ढाणके, अनंत भीमनवार, प्रा. प्रकाश केळकर इत्यादींच्या दाद घेणाऱ्या कविता आणि प्रा. नारायण कुळकर्णी कवठेकरांचे बहारदार संचालन ह्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. अध्यक्षस्थान ज्येष्ठ कवी श्री. बाबा मोहोड यांनी भूषविले होते.

दुसरा दिवस ३१ मार्च

शनिवार दिनांक एकतीस मार्चची सकाळ ज्ञानेश्वरी सप्तशताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या परिसंवादाने गाजली. 'मराठी संतांचे क्रांति–कारकत्व' या विषयावरील परिसंवाद डॉ. सुरेश डोळके यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाला. डॉ. उषाताई देशमुख, प्रा. ताराचंद्र खांडेकर, डॉ. गोविंद देशपांडे, डॉ. राम घोडे, डॉ. वसंत वऱ्हाडपांडे, प्रा. वामनराव चोरघडे व प्रा. शा. वा. स्वान यांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून आपली विचारभूमिका श्रोत्यांसमोर मांडली.

याच दिवशी सकाळी ११ वाजता लोकनाथ यशवंत यांच्या अध्यक्षतेखाली नवोदितांचे कविसंमेलन घेण्यात आले. सुमारे चार तास चाललेल्या व सत्तर कवी सहभागी झालेल्या या

कविसंमेलनाचे संचालन कवी कलीम खान यांनी केले. हे कविसंमेलन कै. आनंद कृष्णाजी टंकाडे यांच्या स्मृतीस समर्पित करण्यात आले होते.

उद्धव शेळके यांची प्रकट मुलाखत

सुप्रसिद्ध वैदर्भिय कथाकार–कादंबरीकार श्री. उद्धव ज. शेळके यांची प्रकट मुलाखत दुपारी ३–३० वाजता घेण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमातील लोकांची उत्सुकता व प्रतिसाद उल्लेखनीय होता. डॉ. श्रीकांत तिडके, डॉ सौ. आरती कुळकर्णी व पत्रकार जगन वंजारी यांनी अनेक खुमासदार प्रश्न विचारून शेळक्यांना बोलके केले. एक रंगतदार मुलाखत म्हणून ती चंद्रपूरकरांच्या स्मरणात प्रदीर्घ काळ राहील.

ग्रंथोत्सव

या संमेलनाला जोडूनच विदर्भ साहित्य संघाचे वतीने "ग्रंथोत्सवा"चा स्वतंत्र सोहळा चंद्रपूरला झाला. त्या निमित्त शनिवार दि. ३१ मार्चला सायंकाळी ग्रंथ चळवळीला जिव्हाळयाचा वाटेल असा भव्य परिसंवाद योजिला होता. खासदार शांतारामजी पोटदुखे व प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध नाटककार खासदार विद्याधर गोखले यांच्या उपस्थितीत प्रा. के. ज, पुरोहित उर्फ कथाकार 'शांताराम' यांच्या अध्यक्षतेखाली चाललेल्या या परिसंवादाचा विषय होता, "मराठी पुस्तकांच्या मर्यादित खपाला जबाबदार कोण?" प्रा. राम डोके, श्री. उपेन्द्र कुळकुर्णी, श्री. वि. गंधे, सौ. शुभांगी भडभडे व श्री. अ. ल. लिमये यांनी आपले विचार मांडले. ग्रंथोत्सवाच्या एकंदरच आयोजनात सौ. आसावरी केळकर व श्री. मुकुंद उगे यांचे परिश्रम महत्त्वाचे होते.

रात्री 'कुसुमाग्रज काव्यदर्शन' हा अभिव्यक्ती व विदर्भ साहित्य संघ शाखा, पांढरकवडा यांनी श्रोत्यांचे मन जिंकणारा अभिरुची संपन्न कार्यक्रम सादर केला. वैशिष्ट्यपूर्ण निवेदन कवितेतील शब्दांना लाभलेली सूर–लयीची साथ व त्यास प्रेक्षकांनी दिलेली दिलखुलास दाद चंद्रपूरकरांच्या रसिकतेचा प्रत्यय आणून देणारीच ठरली. श्री. अनिरुद्ध

| विशेष कार्यवृत्त |

चंद्रपूर

४१ वे विदर्भ साहित्य संमेलन

वेदपाठक, सौ. वेदपाठक, माया देशपांडे, सौ, उर्मिला निनावे, प्रा. प्रकाश केळकर व श्री. किशोर तळवेकर इ. मंडळीचा या कार्यक्रमाच्या यशात महत्त्वाचा वाटा आहे.

१ एप्रिल : पहिले सत्र

रविवार दि. १ एप्रिलला सकाळी १०–३० वाजता कै. ना. के. बेहरे यांच्या स्मृतीस अर्पण केलेला परिसंवाद म्हणजे 'मराठी कविता रसिकांपासून दूर गेली आहे' हा होय. सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. वि. स. जोग हे परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते त्यात सौ. निलांबरी कुळकर्णी, प्रा. विजयिनी जोशी, डॉ. अक्षयकुमार काळे, प्रा. कृष्णा चौधरी, प्रा. प्रमोद मुनघाटे, प्रा. मनोज तायडे या मान्यवरांचा सहभाग होता.

परिसंवाद संपताच दुपारी १–३० वाजता 'कथाकथन' कार्यक्रम सुरू झाला. अध्यक्षस्थानी कथाकार सौ. प्रतिमा इंगोले होत्या. श्री. बाजीराव पाटील, डॉ. मल्हार कावळे, श्रीमती कुमुद मंडलेकर, प्रा. सतीश तराळ, श्री. संतोष मुळावकर, सौ. उर्मिला निनावे व प्रा. श्री. स. ओगले यांनी आपल्या कथा सादर केल्या.

खुले अधिवेशन

सायंकाळी ४ वाजता खुले अधिवेशन होऊन संमेलनाची सांगता झाली. यात संमेलनाध्यक्षांचे समारोपीय भाषण, विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहिलेल्या श्री. शरणकुमार लिंबाळे यांचे भावपूर्ण हृद्गत, व प्रा. राम शेवाळकर व स्वागताध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांचो आभाराची भाषणे झालीत. याप्रसंगी विदर्भ साहित्य संघाकडून संमेलनाच्या स्वागत समितीच्या पदाधिकाऱ्यांना गौरवचिन्ह देऊन गौरविण्यात आले व संमेलनाचे सूप वाजले.

(पृष्ठ ९० वर)

बुलढाणा
जिल्हा साहित्य संमेलन

विदर्भ साहित्य संघाच्या बुलढाणा शाखेच्या वतीने व सार्वजनिक गर्दे वाचनालय यांचे सहकार्याने बुलढाणा येथील गर्दे वाचनालयाचे सभागृहात दि. २६ व २७ एप्रिलला 'बुलढाणा जिल्हा साहित्य संमेलन' आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाच्या परिसराला महात्मा ज्योतिबा फुले साहित्य नगरी, प्रवेशद्वाराला भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संमेलनाच्या व्यासपीठाला कै. ताराबाई शिंदे यांची नावे देण्यात आली होती. संमेलनात जिल्ह्यातील २०० चे वर प्रतिनिधी सहभागी आले होते. संमेलनाचे उद्घाटन श्री. नागदेवते साहेब यांनी केले. स्वागताध्यक्ष श्री. पठाण गुरुजी यांनी स्वागतपर भाषण केले. संमेलनाध्यक्ष प्रा. वि. दि. जोशी यांनी अध्यक्षीय भाषण केले. या संमेलनास विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष श्री. सुरेश द्वादशीवार; उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री. अ. ल. लिमये तर श्री. मधुकरराव बनहट्टी व श्री. राम डोके आवजून उपस्थित होते संमेलनात परिसंवाद, कथाकथन, कवी संमेलन, ग्रंथ व नाणे प्रदर्शन आदी भरगच्च कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमात सर्वश्री सुहास कुळकर्णी, प्रा. विजयिनी जोशी, प्रा. पद्माकर घोगरे, श्री. चोपडे, श्री. पु. कांबळे. बाबासाहेब कुळकर्णी, प्रभाकर कस्तुरे, उ. भा. बिडवे, सदानंद देशमुख, सूर्यकांतजी वाहेकर, रमेश कोरडे, भा. ओ. देशपांडे, प्रा. व्ही. के. क्षीरसागर, आदी वक्त्यांनी व कथाकारांनी भाग घेतला होता. कवी संमेलनात १४० कवींचा सहभाग होता. या संमेलनात श्री. शंकर कऱ्हाडे लिखित 'मुलाफुलांचे चाचा नेहरू' या पुस्तकाचे प्रकाशन आले. एकूण दोन दिवसांचे हे जिल्हा संमेलन यशस्वी झाले. यासाठी सर्वश्री गणेश ताठडे, सर्जेराव चव्हाण, वा. का. दाभाडे. उद्धव वालेकर, गो. आ. सावजी, विनायक मनोहरराव तारे, मामा सातपुते, भगवान जाधव, ग. मा. खिरोलकर, पद्माकर कालकर, विश्राम पवार, श्रीकांत धारकर आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. ■

शंकर कऱ्हाडे
कार्याध्यक्ष
वि. सा. संघ, बुलढाणा

(पृष्ठ ८९ वरून)

स्वर जागले स्मृतींचे....

रात्री मनोरंजनासाठी आयोजिलेल्या मराठी सुगम संगीताच्या कार्यक्रमास चंद्रपूरकर रसिकांनी तुफान दाद दिली. उत्तम संगीत साथ, तयारीची गायकी व लोकप्रिय अशा श्रुतिमधुर गीतांची निवड यामुळे वर्ध्याच्या युवा कलावतांनी सादर केलेला 'स्वर जागले स्मृतींचे' लक्षणीय ठरला. प्रा. जयंत मादुस्कर व किशोर तळवेकर यांची धडपड हीच या कार्यक्रमाच्या यशात महत्त्वाची ठरली.

पुस्तक प्रदर्शन, नखचित्र प्रदर्शन, नाणे प्रदर्शन, पिंपळपानावरील चित्र प्रदर्शनामुळे संमेलनाच्या एकंदरच वातावरणाला शोभा आली. उपस्थितांच्या मनात साहजिकच उत्कंठा दिसून आली की आता पुढील वेचाळिसावे विदर्भ साहित्य संमेलनाचा सोहळा होणार तरी कुठे?

प्रा. शा. वा. स्वान
सरचिटणीस, स्वागत–समिती,
४१ वे वि. सा. संमेलन, चंद्रपूर

काव्यसोहळा
व
काव्य लेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबीर

विदर्भ साहित्य संघाची सांस्कृतिक समिती व युगवाणी यांचे वतीने एका द्विदिवसीय काव्यसोहळ्याचे आयोजन करण्यात यावयाचे असून या उपक्रमाचा एक भाग म्हणून काव्यलेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबिर देखील आयोजित करण्यात यावयाचे आहे.

या द्विदिवसीय काव्यसोहळ्यात गेल्या शतकातील मराठी कवी, कवितालेखन, काव्य-समीक्षा, काव्यप्रवाह, कविताप्रकाशन, वितरण, काव्यस्वाद, कवितेचा वाचक व त्याचे अस्तित्व, कवितेचे अध्ययन-अध्यापन, कविसंमेलनांचे प्रयोजन व कवितावाचन-गायन यांचे कवितेवरील परिणाम, कवीचे व कवितेचे सामाजिक राजकीय, सांस्कृतिक नातेसंबंध, सांस्कृतिकतेच्या संदर्भातील कवितेचे स्थान, भूमिका व वास्तव, समाजातील विविध संस्थांची कवितेकडे बघण्याची दृष्टी व त्याची कारणमीमांसा, मराठी कवितेचे भारतीय व जागतिक कवितेच्या संबंधातील स्थान, यापैकी अथवा तत्सम, आनुषंगिक विषयांवरील नामवंतांचे निबंधवाचन व त्या त्या निबंधावरील नंतरची चर्चा, परिसंवाद, गटचर्चा नामवंतांची व नवोदितांची काव्यवाचने, कविसंमेलने, कवितांची पोस्टर्स, कवितासंग्रहांचे प्रदर्शन, काव्ययात्रा याचा समावेश असेल.

काव्यलेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबिर

याच उपक्रमाचा भाग म्हणून मराठीत अमाप लिहिल्या जाणाऱ्या कवितेच्या नवलेखकास व काव्यविषयक उत्सुकता असणाऱ्यांना देखील काव्यलेखकीय व्यक्तिमत्वासंबंधीने व तसेच कवितेची भाषाशैली, काव्यलेखन, काव्यआकलन व काव्यस्वाद या संबंधाने आवश्यक ते मार्गदर्शन उपलब्ध करवून देणाऱ्या अभ्यासक्रमाचा समावेश असलेल्या व तज्ञांचे मार्गदर्शन असलेल्या शिबिराचेही आयोजन करण्यात यावयाचे आहे.

या उपक्रमातील सहभाग निःशुल्क असून हा उपक्रम केवळ युगवाणीच्या त्रैवार्षिक वर्गणीदारांकरिता आयोजित करण्यात येत आहे. युगवाणीचे त्रैवार्षिक वर्गणीदार असणे एवढीच अट या सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांना पूर्ण करावी लागेल. ती पूर्ण करण्यात त्यांना आनंदच वाटेल अशी खात्री आहे.

युगवाणीची वार्षिक वर्गणी ३५ रु. असून त्रैवार्षिक वर्गणी मात्र रु. ९० असेल.

या उपक्रमाकरिता त्रैवार्षिक वर्गणीदार म्हणून सहभाग नोंदविणाऱ्यांना त्यामुळे वर्गणीत रु. १५ ची भरघोस सूट प्राप्त होईल, आपला सहभाग नोंदवू इच्छिणाऱ्यांनी कृपया युगवाणीची त्रैवार्षिक वर्गणी विदर्भ साहित्य संघाकडे पाठवून या उपक्रमातील त्यांच्या सहभागार्थ आपले नाव व पत्ता, आवड, इतर व्यक्तिगत माहिती, प्रकाशित लेखनाची माहिती व युगवाणीची त्रैवार्षिक वर्गणी भरल्याची पावती क्र. व तारीख ही माहिती प्रबंध संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर, १२ या पत्त्यावर पाठवावी.

आपला असा सहभाग नोंदविणाऱ्यांना या उपक्रमाच्या तारखा व सविस्तर कार्यक्रम याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात यावयाचे आहे.

केंद्रीय कार्यवृत्त दि. १ एप्रिल ९० ते ३० जून १९९०

२ एप्रिल १९९० : श्रीमती मनुताई नातू यांच्या द्वितीय स्मृतिदिनी सुरू करण्यात आलेल्या "नवा सुधारक" या मासिकाचे प्रकाशन विदर्भ साहित्य संघाच्या गडकरी सभागृहात आयोजित करण्यात आले होते. सभारंभाच्या अध्यक्षस्थानी उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी होते. त्यांनी कै. गो. ग. आगरकर व मनूताई नातू यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण केला. वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग यांनी प्रमुख वक्ते श्री. य. दि. फडके यांचे तर श्री. दिवाकर मोहनी यांनी प्राचार्य राम शेवाळकर, न्या. मू. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी व डॉ. मा. ल. भोळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आपल्या प्रास्ताविक भाषणात प्राचार्य शेवाळकर यांनी आपणास मराठीचा वसा श्रीमती नातू यांचेकडून कसा मिळाला हे कथन केले. "नवा सुधारक"चे संपादक प्रा. देशपांडे यांनी आपल्या भाषणात मासिकाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. प्रमुख अतिथी प्रा. य. दि. फडके म्हणाले की, "श्रीमती नातू यांचा अखंड व्यासंग सुरू होता, एकीकडे आजार मागे लागला असताना सुद्धा त्यांची संवेदनक्षमता टिकून होती." या प्रसंगी न्या. मू. चंद्रशेखर धर्माधिकारी व डॉ. मा. ल. भोळे यांची समयोचित भाषणे झाली.

३ एप्रिल १९९० : 'अक्करमाशी'कार शरणकुमार लिंबाळे यांच्याशी खुली बातचित करण्याचा एक कार्यक्रम वि. सा. संघ व दलित रंगभूमी यांच्या संयुक्त विद्यमाने गडकरी सभागृहात आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग होते. आजच्या दलित साहित्याने बौद्ध–महार या कक्षा सोडून खोलवर जावे असे रोखठोक प्रतिपादन श्री. लिंबाळे यांनी केले. पूर्वीची आक्रस्ताळेपणाची भूमिका सोडून दलित साहित्याने रचनात्मक कार्य करावे असा हितोपदेश श्री. वामन तेलंग यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अमर रामटेके तर संचालन श्री. रोशन सोमकुंवर यांनी केले. आभारप्रदर्शन श्री. गोकुल गजभिये यांनी केले. कार्यक्रमास बराच मोठा रसिकवर्ग उपस्थित होता.

१० एप्रिल १९९० : कोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

३० एप्रिल १९९० : प्रख्यात निसर्गकवी "बालकवी" यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

१४ एप्रिल १९९० : दलितांचे उद्धारक, महान समाजसुधारक व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दिनिमित्त त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करून या महामानवास श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

१ मे १९९० : विदर्भ साहित्य संघाच्या धनवटे रंगमंदिराच्या उभारणीसाठी तन, मन, धनाने झिजलेले कै. नाना जोग यांच्या अर्धपुतळ्यास हार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

७ मे १९९० : महाराष्ट्राचे दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जयंतीप्रित्यर्थ त्यांच्या चित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

८ मे १९९० : वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष कै. आ. रा. देशपांडे उर्फ कवी "अनिल" यांच्या स्मृतिदिनाप्रित्यर्थ त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

९ मे १९९० : नोबेल पारितोषिक विजेते गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

२६ मे १९९० : भाषाप्रभू आणि महाराष्ट्राचे लाडके नाटककार राम गणेश गडकरी यांच्या पुण्यतिथिनिमित्त गडकरी सभागृहातील त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला व त्यांच्या स्मृतीस श्रद्धांजली वाहण्यात आली.

१० जून १९९० : वि. सा. संघ व कै. मोहन कोठीवान स्मृति प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. मोहन कोठीवान यांचा प्रथम स्मृतिदिन संपन्न झाला. गडकरी सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. ज. रा. फणशाळकर होते. या कार्यक्रमात श्री. मोरुदादा कोठीवान, श्री. नाना रेटर, श्री. भाऊ समर्थ, श्री. जयंत पाठक, श्री धनंजय भावे प्रभृतींची भाषणे झाली. या जुन्या व जाणत्या कलावंतांनी कै मोहन कोठीवान यांच्या स्मृतीस उजाळा देणारे विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी श्री. प्रकाश पुराणिक (मुंबई) व मित्रमंडळ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन श्री. दिनकर देशपांडे यांनी केले.

या कार्यक्रमास नागपुरातील अनेक रसिक व कलावंत उपस्थित होते.

११ जून १९९० : मातृप्रेमाचे मङ्गलमंगल स्तोत्र गाणारे थोर समाजसेवक पूज्य साने गुरुजी यांच्या स्मृतिदिनाप्रित्यर्थ त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

१३ जून १९९० : साहित्य सम्राट आचार्य अत्रे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

१५ जून १९९० : 'संदेश'कार अच्युतराव कोल्हटकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

२४ जून १९९० : गेल्या १०–१२ वर्षात शिशु शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजी भाषेचे वाढलेले प्रस्थ "मूले कुठारः" सदरात मोडणारे आहे व त्याच्या परिणामी स्वदेशी भाषा आणि त्यापाठोपाठ संस्कृती लोप पावू शकते, असा गंभीर इशारा संस्कृत महाकवी प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा. वर्णेकर यांनी आज दिला.

विदर्भ साहित्य संघाच्या कै. शिवदासपंत बार्लिंगे व्याख्यानमालेत "भाषिक प्रदूषणाची समस्या" या विषयावर ते बोलत होते. वि सा. संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यावेळी अध्यक्ष-स्थानी होते व महापौर श्री. बबनराव येवले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. वर्णेकर यांना संस्कृतच्या सेवेबद्दल जो राष्ट्रपती पुरस्कार मिळाला त्याबद्दल महापौर येवले यांनी शाल–श्रीफळ देऊन त्यांचा वि. सा. संघातर्फे सत्कार केला. तसेच बार्लिंगे प्रतिष्ठानातर्फे डॉ. सुरेंद्र बार्लिंगे यांनी आपले वडील कै. शिवदासपंत यांचा अर्धपुतळा नागपूर महानगर पालिकेला

भेट दिला. हा अर्धपुतळा खरे टाऊनमधील बारलिंगे यांच्या घराजवळ लावण्यात येणार आहे. त्यासाठी महापौर निधीला ५००१ रुपयाची देणगीही डॉ. बारलिंगे यांनी जाहीर केली.

इंग्रजीचा अट्टाहास ही प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीला मज्जाव केला पाहिजे. तिच्यावरच घणाघात करून तिला वेळीच रोखले पाहिजे. तरच आपल्या राष्ट्राचे व संस्कृतीचे भवितव्य शाबूत राहील, असे कळवळीचे आवाहन डॉ. वर्णेकर यांनी केले.

इंग्रजीचे प्रस्थ वाढविण्यात प्रतिष्ठित व बड्या, लोकांचा मोठा वाटा आहे. कारण त्यांचे पाहूनच सामान्यजनांमध्ये इंग्रजीचे प्रेम उफाळून आलेले आहे, याकडेही त्यांनी आवर्जून लक्ष वेधले.

प्राचार्य राम शेवाळकर यांनी प्रास्ताविक केले, तर प्रकाश एदलाबादकर यांनी संचालन केले.

या सभारंभाला डॉ. वि. भि. कोलते, शंकरराव गेडाम, वामनराव गावंडे, प्रभृती अनेक गणमान्य नागरिक उपस्थित होते.

दि. २४ जून १९९० रोजी वि. सा. संघात प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा. वर्णेकर यांचा महापौर माननीय श्री. बबनरावजी येवले यांचे हस्ते सत्कार झाला. त्याप्रसंगी कै. शिवदास कृष्ण बारलिंगे स्मृति व्याख्यानात डॉ. वर्णेकरांनी "भाषिक प्रदूषण" या विषयावर आपले विचार उपस्थितांसमोर मांडले. त्यावर दुसरे दिवशी दि. २५ जून ९० रोजी सायंकाळी ६–३० वाजता वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली त्यावर चर्चा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी चर्चेनंतर खालील निर्णय घेण्यात येऊन त्याचा लवकरात लवकर पाठपुरावा करावा असे ठरले.

(१) सर्व शासकीय व गैरशासकीय व्यवहार निखालस मराठीतूनच चालावे. यासाठी शासनास एक निवेदन द्यावे.

(२) निवेदन पाठविल्यानंतर, नागपूर येथे होणाऱ्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशनापूर्वी या विषयावर शासनास अंतिमोत्तर द्यावे.

(३) अधिवेशनापूर्वी शासनाकडून या निवेदनास अनुकूल प्रतिसाद न मिळाल्यास विधी-मंडळाच्या नागपूर अधिवेशन काळात आंदोलनात्मक पाऊल उचलावे.

(४) एतद्विषयक निवेदन ३० जून १९९० पूर्वी डॉ. श्री. भा. वर्णेकर, डॉ. म. बा. कुंडले, आणि डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे यांनी तयार करावे.

(५) या निवेदनाच्या प्रती वि. सा. संघाने शासन, मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति महामंडळ, बृहन्महाराष्ट्र परिषद, मराठी विकास परिषद, महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे, विश्वमराठी परिषद, आणि महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रे यांना पाठवावे.

(६) भारतामध्ये शिशुशिक्षण विदेशी भाषेत न देता मातृभाषेतच द्यावे. व यासाठी जनमत जागृत करावे.

उपरोक्त चर्चेत भाग घेण्यासाठी सर्वश्री डॉ. श्री. भा. वर्णेकर, द. कै. गोसावी, दि. पु. मोहनी, डॉ. प्रकाश पांडे, अरुण श्रीपाद जोशी, डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे, डॉ. म. बा. कुंडले, प्रभाकर चाफेकर, चंद्रकांत कुळकर्णी, प्रकाश एदलाबादकर, व सौ. कमला श्रीधरराव वर्णेकर प्रभृती भाषाप्रेमी उपस्थित होते.

परीक्षासमिती

भाषा संस्कार शिबीर : दि, २५ एप्रिल ९० ते १६ मे ९० पर्यंत भाषा संस्कार शिबीर आयोजित करण्यात आले, श्रीज्ञानेश्वरी सप्तशताब्दीचा योग साधून डॉ. सौ. नीलाताई जोशीराव यांच्या रसाळ वाणीने भाषा संस्कार शिबीराचे उद्घाटन झाले. त्यांनी मार्गदर्शनाचे प्रथम पुष्प गुंफले, त्यानंतर श्री. भा. जोशी, श्रीमती अल्काताई बावसे, पत्रलेखनावर डॉ. बाबासाहेब नंदनपवार; श्री. नानासाहेब कुळकर्णी यांनी संदर्भ ग्रंथ कसे हाताळावे यासंबंधी माहिती दिली. श्री. दिवाकर मोहनी यांनी शुद्धलेखनावर, श्री गोविंद गोडबोले यांचे कथाकथन, श्री. अरुण कुळकर्णी यांनी वाचन कसे करावे तर सौ. भारती सुदामे यांनी वाचन आणि लेखनासंबंधी मार्गदर्शन केले. श्री. एदलाबादकरांनी रामदासांची शिकवण मुलांना सांगितली. श्री. मधुकर भाकरे यांनी हस्ताक्षर सुंदर व वळणदार येण्याकरता प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

या निमित्ताने ग्रंथप्रदर्शन, तक्ते, लेखन सामुग्री आदींचेही प्रदर्शन आयोजित करून भाषासमृद्धी साधण्यावर भर देण्यात आला. भाषा संस्कार शिबीराला प्रात्यक्षिक व मार्गदर्शक रूपाने विविध विषयांची पुष्पे गुंफून मार्गदर्शन माळ शिबीरार्थींच्या गळचात अर्पण केली आणि या तीन आठवडे चालणाऱ्या शिबिरात बालकवी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दीनिमित्त विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम केलेत.

१ मे १९९० रोजी महाराष्ट्रदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी सुंदर कार्यक्रम करून प्रेक्षकांकडून कौतुकाची पावती संपादन केली.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना सुयोग्य संधी प्राप्त व्हावी म्हणून हस्तलिखिताची कल्पना साकारली. परीक्षा संचालिका सौ. शोभाताई उबगडे यांनी " स्मृति–कलिका " या नावाने विद्यार्थी-कडून करवून घेतलेले अप्रतिम असे हस्तलिखित वाचकांपुढे सादर करताना वि. सा. संघाला नवीन क्षेप घेण्यात आनंद वाटत आहे. " स्मृति–कलिका " साकार होण्यास मुख्य संपादक–अमित तेलंग, सहसंपादक–कु. गौरी मुंजे, कु. स्मिता पाठक, कु. शिल्पा वानखेडे, कु. माधवी केळापुरे यांनी कष्ट घेतले. मुखपृष्ठ श्री. राम कुळकर्णी यांनी सजविले असून आतील सजावट श्री. अनिल नितनवरे यांची आहे.

१६ मे १९९० ला समारोपीय कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून कार्यकारिणी कोषाध्यक्ष श्री. बाळासाहेब लिमये लाभले. अध्यक्षानी दीप प्रज्वलित करून सरस्वतीच्या प्रतिमेस हार अर्पण केला, हार गुच्छ देऊन प्रमुख अतिथींचे स्वागत करण्यात आले. आपल्या पाल्यांचे कौतुक बघण्याकरता पालकांनी उपस्थिती दर्शविली त्याबद्दल त्यांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते शिबिरार्थींना प्रमाणपत्र व गुच्छ देऊन कौतुक करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात भाषा-समृद्धीवर भर देण्याच्या दृष्टीने विविध उदाहरणे देऊन त्यांनी शिबीरार्थींना तसेच पालकांना सुयोग्य मार्गदर्शन केले.

समारोपीय भाषणात परीक्षा संचालिका सौ. शोभाताई उबगडे यांनी शिबिरातील गुणवंतांना उत्तरोत्तर प्रगती आणि यश व कीर्ती लाभो ही मनीषा व्यक्त करून आशीर्वाद दिला.

श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी आभार प्रदर्शन केले.

श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी दिलेल्या बक्षीसातून मुलांना खाऊ वाटण्यात आला आणि रसपानाने शिबीराची सांगता झाली.

शिबीर संपन्न होण्यास सौ. कुंदाताई केळापुरे, सौ. सुळे, जोशी, परीक्षा सचिव मुकुंद पाचखेडे, सह–सचिव कु. सुहास पारखी, कु. मीना खानापुरकर, अजय मुकवाने, आणि व्यवस्थापक श्री. दीक्षित आदींचे सहकार्य लाभले.

३, ४ फेब्रुवारी १९९० सत्रात

सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे विवरण

१. म. प्रवेश	नझमा शेख	शांतीनिकेतन ज्ञानपीठ हायस्कूल, नागपूर
२. मराठी परिचय	अमोघ नारायण मेश्राम	शांतीनिकेतन ज्ञानपीठ, हायस्कूल, नागपूर
३. मराठी बोध	श्री. संदीप नारायण ठाकरे	सिंधी हिंदी हाय. पाचपावली, नागपूर
४. मराठी प्रबोधिनी	कु. अश्विनी राजहंस	परांजपे विद्यालय सुरेंद्र नगर, नागपूर
५. मराठी प्रबोध	श्री. संदीप कोकाटे	परांजपे विद्यालय सुरेंद्र नगर, नागपूर
६. मराठी प्राथमिक	कु. मेघलता जाधवराव बाडगे	लोकांची शाळा, सिरसपेठ, नागपूर
७. मराठी प्रारंभ	कु. मनिषा रघुनाथराव फुले	रावसाहेब ठवरे हायस्कूल, नागपूर
	कु. वैशाली हरिचंद्र नारायणे	रावसाहेब ठवरे हायस्कूल, नागपूर
	कु. आरती माणिकराव तायडे	रावसाहेब ठवरे हायस्कूल नागपूर
८. मराठी प्रारंभोत्तर	कु अनघा शशिमोहन तिवसकर	सोमलवार हायस्कूल खामला, नागपूर
९. मराठी पूर्व विनीत	श्री. दत्तप्रसन्न शंकरराव अडवे	सोमलवार हायस्कूल खामला, नागपूर
१०. म. साहित्य विनीत प्र. खंड	श्री. उज्वल राजमोहन वोकारे	कर्मवीर महाविद्यालय, मूल
११. म. साहित्य विनीत–२	श्री. सतिश श्रीराम दोनाडकर कै. वा कृ. दिवाणजी पारितोषिक ३१+वि. सा. संघ २०=५१	लो. टि. विद्यालय, ब्रम्हपूरी
१२. सा. परिचित–१	कु. कान्होलकर निलिमा पंजाबराव	छत्रपती विद्यालय, महाल, नागपूर
१३. सा. परिचित–२	कु. स्मिता दाढे	वि. सा. संघ नागपूर
१४. सा. स्नातक पदवी		
१५. भाषा स्नातक पदवी		
१६. सा. पारंगत (एम. ए. समकक्ष)	सौ. श्रद्धा तेलंग	वि. सा. संघ केंद्र, नागपूर

(अ) कै. डॉ. वा. ग. शिंगणापूरकर रोख पारितोषिक ५१ व वि. सा. संघ पारितोषिक ५०=१०१

(ब) कै. ना. कृ. दिवाणजी ५०० रुपयाचा ग्रंथ पुरस्कार

१७. सर्वाधिक परीक्षार्थी व परीक्षा शुल्क पुरस्कार (केंद्राधिकारी पुरस्कार) — प्रधानाध्यापिका, श्रीमती मालती अंजीकर, धीरन कन्या शाळा, नागपूर

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय

विदर्भ साहित्य संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे आयोजित, 'नवे ग्रंथ नवे समीक्षक' या ग्रंथ समीक्षणाच्या कार्यक्रमाला आता चांगला प्रतिसाद मिळतो आहे. नव्या ग्रंथांची समीक्षणे आप-आपल्या परीने चांगली करण्यासाठी नवे अभ्यासक धडपड करताना या व्यासपीठावर दिसत आहेत. अजून या समीक्षणात विस्कळीतपणा असला, तरी अभ्यास करण्याची प्रवृत्ती या नव्या अभ्यासकां-मध्ये दिसून येते, ही निश्चित स्वागताची बाब आहे.

नुकत्याच पार पाडलेल्या या कार्यक्रमात श्री. मनोहर पाटील, कु. प्राजक्ता जोशी व सौ. माणिक देवपुजारी या नवीन समीक्षकांनी भाग घेऊन अनुक्रमे अनिरुद्ध पुनर्वसू, अरुण साधू व कुसुमाग्रज यांच्या नवीन ग्रंथाचे समीक्षण श्रोत्यांसमोर ठेवले.

मराठीतल्या चरित्रात्मक कादंबरीच्या अभावग्रस्त पार्श्वभूमीवरील एक महत्त्वाचा मानदंड अनिरुद्ध पुनर्वसू यांनी " प्रभंजन " या महात्मा फुले चरित्रावरील कादंबरीने निर्माण केला, असा निष्कर्ष श्री. मनोहर पाटील यांनी आपल्या समीक्षणातून काढला, तर सौ. माणिक देवपुजारी यांनी कुसुमाग्रजांच्या 'पाथेय' काव्यसंग्रहाची समीक्षा करताना नेहमी दुर्दम्य आशावादात न्हाऊन निघणारी कुसुमाग्रजांची कविता पाथेयमधील प्रवासात सुखावह वाटत नाही, असे उद्गार काढले.

कु. प्राजक्ता जोशी अरुण साधूंच्या 'शोधयात्रे'चे परखड समीक्षण करताना म्हणाल्या, तत्व-ज्ञानासारखा क्लिष्ट व बौद्धिक विषय ललितकृतीत आविष्कृत करण्यात अरुण साधू यशस्वी झाले आहेत.

या तासभर चाललेल्या कार्यक्रमाला वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग, सौ. शुभांगी संत, प्रा. सुनंदा देशपांडे, डॉ. वसंतराव कुळकर्णी, अनिल नितनवरे व अनेक अभ्यासक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन सौ. कुंदा केळापुरे यांनी नीटनेटके केले, स्वागत, ग्रंथपाल सौ. सुजाता सुळे यांनी केले व समारोप श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी केला. ■

लाखनी

दरवर्षीप्रमाणे वर्षप्रतिपदेच्या शुभ मुहूर्तावर (गुढीपाडव्यानिमित्त) यावर्षी देखील वि. सा. संघाच्या लाखनी शाखेने कवी संमेलनाचे आयोजन केले होते. यात भंडारा जिल्ह्यातील जुने व नवीन आणि जिल्ह्याबाहेरील चार अशा एकूण ३९ कवींनी भाग घेतला होता.

नियोजित प्रमुख अतिथी हिंगणघाटचे ज्ञानेश्वर चौधरी येऊ न शकल्यामुळे नागपूरचे तीर्थराज कापगते यांचेकडे कवी संमेलनाचे सूत्रसंचालन सोपविले.

ही शाखा मागील १३ वर्षापासून गुढीपाडव्याला कवी संमेलनाचे आयोजन करीत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. आपण या शाखेमुळेच साहित्यक्षेत्रात पुढे आलो. भंडारा जिल्ह्यातील नव्या साहित्यिकांचे लाखनी हे तीर्थस्थान असून वि. सा. संघाची शाखा आमचे दैवत आहे. मला प्रथम व्यासपीठ या शाखेने दिले. अनेक नवोदितांना पुढे आणले. पंधरा कवी संमेलने आजपर्यंत घेतली. सांस्कृतिक जडणघडण करण्याचे तिचे व्रत अनेकांना प्रेरणा देईल, असेही ते म्हणाले. दुपारी चार वाजता सुरू झालेले कवी संमेलन रात्री आठ वाजता संपले. प्रा. कृष्णा चौधरी यांनी कवींना मार्गदर्शन केले, प्रास्ताविक द. सा. बोरकर सचिव यांनी तर आभार शाखाध्यक्ष खु. मो. बारसागडे यांनी केले,

देऊळगावराजा

विदर्भ साहित्य संघ शाखा देऊळगाव राजा यांचे तर्फे सोमवार दि. ३०–४–९० रोजी संध्याकाळी ६–३० वाजता नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळेत प्रसिद्ध लेखक प्रा. बा. ह. कल्याणकर यांचा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर व्याख्यानाचा कार्यक्रम नगर परिषद अध्यक्ष श्री. तुकारामजी खांडेभराड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. शाखाध्यक्ष श्री. प्राचार्य अभ्यंकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. शाखा सचिव प्रा. दगडे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. प्रा. कल्याणकर यांनी आपल्या ओघवत्या शैलीत शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर दोन तास विवेचन केले.

चोहोट्टाबाजार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट ग्रंथालय (ग्रामीण) (३००० रु. चे " ड " वर्गीय) राज्य पुरस्कार प्राप्त करणाऱ्या टाकळी (बु) जि. अकोला येथील श्रीमती बालनबाई म्हैसने मोफत वाचनालयाचे संस्थापक व संचालक श्री. जयदेवराव म्हैसने यांचे शाखाध्यक्ष (वि. सा. संघ) यांचा श्री. ज. पां. खोडके यांनी शेला व श्रीफळ देऊन सत्कार केला. शासनानंतर त्यांच्या सत्काराचा पहिला मान या शाखेने महाराष्ट्रदिनी पटकावला. अध्यक्षस्थानी सरपंच श्री. शंकरराव तुरुक होते.

जीवापेक्षाही ग्रंथांचे मोल अधिक आहे हे श्री. खोडके यांनी ह्यू-एन-त्संगच्या जीवनातील एका प्रसंगावरून पटवून दिले.

केवळ श्री. खोडकेमुळेच मी आपल्या वाचनालयातर्फे ग्रामीण भागात विविध उपक्रमात नवरात्र व्याख्यानमाला चालवू शकलो याची ग्वाही श्री. म्हैसने यांनी आपल्या भाषणातून दिली.

श्री. शिवराम बुंदे यांनीही वाचनालयाबाबतचे स्वानुभव सांगितले. सर्वश्री मुख्या. कडू, बोरचाटे, सांगुनलेडे, वानखेडे, कु. पांडे, दामोदर पाटील, डॉ. सोळंके, सारसकर, प्रा. भालेराव, प्रा·

आगरकर, गावकरी शिक्षक व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात याप्रसंगी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन श्री. धांडे व आभार प्रदर्शन श्री. वानखडे यांनी केले. चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली,

बुलढाणा :

विदर्भ साहित्य संघाच्या बुलढाणा शाखेने स्थानिक गद्रे वाचनालयाचे सहकार्याने आयोजित केलेले दोन दिवसीय बुलढाणा जिल्हा साहित्य संमेलन दि. २६ व २७ एप्रिल १९९० ला मोठ्या उत्साही व आनंदाचे वातावरणात संपन्न झाले.

संमेलन परिसराला महात्मा ज्योतीबा फुले साहित्य नगरी व प्रवेशद्वारास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव तर व्यासपीठाला कै. ताराबाई शिंदे या बुलढाणाच्याच मराठीतील पहिल्या लेखिका यांचे नाव दिले होते. कै. ताराबाईंनी १८८२ मध्ये "स्त्री पुरुष तुलना" हे पुस्तक लिहले होते.

संमेलनाचे अध्यक्षपद जळगांव जामोद येथील प्रख्यात कादंबरीकार कथाकार, व्यंगचित्रकार; नाटककार प्राचार्य दि. वि. जोशी यांनी भूषविले होते. तर मुस्लीम समाजातील सुधारवादी ज्ञानेश्वरीचे उपासक व चिंतक श्री. ए. आर. पठाण गुरुजी यांची स्वागताध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती. हे संमेलन जिल्ह्याचे असले तरी वि. सा. संघाच्या संमेलनाचे छोटे स्वरूप वाटावे अशीच त्याची आखणी करण्यात आली होती. संमेलनाला जिल्ह्यातील सुमारे २०० चे वर प्रतिनिधी सर्व भागातून आले होते. विदर्भ साहित्य संघ, नागपूर येथील कार्याध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार, उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग याशिवाय श्री. अ. ल. लिमये, श्री. मधुसूदन बनहट्टी आवर्जून उपस्थित होते. या सर्वांच्या सहभागाने संमेलनाचा उत्साह द्विगुणित झाला होता. विशेष म्हणजे जिल्ह्यातील ३० ग्रामीण महिला प्रतिनिधी संमेलनात पूर्ण वेळ उपस्थित होत्या.

एडेड हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी गायलेल्या "सर्वात्मका शिवसुंदरा" या श्री. कुसुमाग्रज यांच्या प्रार्थनागीताने आणि श्री. डी. आर. इंगळे व सहकाऱ्यांनी राष्ट्रमाता गौरव गानाने संमेलनाला प्रारंभ झाला. येथील कार्यकारी अभियंता श्री. घु. तु. नागदेवते यांनी दीप प्रज्वलित करून संमेलनाचे उद्‌घाटन केले.

स्वागताध्यक्ष श्री. पठाण गुरुजी यांनी प्रारंभी सर्व अतिथी व उपस्थीतांचे स्वागत केले व स्वागतपर भाषणामधून कालबाह्य झालेल्या व समाजाला घातक ठरलेल्या रूढी व परंपरेचे उच्चाटन करून राष्ट्राला प्राधान्य देण्याबाबत आवाहन केले. उद्‌घाटनपर भाषणात श्री. नागदेवते यांनी अन्यायाचे आणि अत्याचारांचे प्रतिबिंब समकालीन साहित्यांत उमटले नाही अशी खंत व्यक्त केली.

संमेलनाला उपस्थित असलेले प्रा. राम डोके यांनी नवोदित कवी, कथाकारांना बहुमोल असे साहित्यिक मार्गदर्शन केले. आपल्या अनुभूतीचे चित्रण ज्या साहित्यात असते तेच खरे व चिरंतन साहित्य ठरते असेही त्यांनी प्रतिपादन केले. श्री .वामन तेलंग यांनी जिल्हा साहित्य संमेलनाची आवश्यकता सांगून बुलढाणा जिल्ह्यातील साहित्यिकांचे अभिनंदन केले.

येथील प्रसिद्ध साहित्यिक श्री. शंकर कऱ्हाडे यांनी लिहिलेल्या "मुलाफुलांचे चाचा नेहरू" या पुस्तकाचे प्रकाशन संमेलनाध्यक्षाचे हस्ते करण्यात आले.

माणसातले माणूसपण जाणून माणसाची निर्मिती करणे हेच साहित्याचे मूळ प्रयोजन आहे अशा आशयाचे विचार अध्यक्षीय भाषणातून प्रा. दि. वि. जोशी यांनी प्रगट केले.

संमेलन प्रमुख श्री. गणेश तायडे यांनी शुभ संदेश वाचून दाखवले. या संमेलनाला प्राचार्य राम शेवाळकर, स. ग. मालशे, डॉ. भाऊ मांडवकर, विद्याधर गोखले, सुरेंद्र बारलिंगे, द. भि. कुळकर्णी, गंगाधर गाडगीळ, डॉ. सरोजिनी बाबर, उद्धव शेळके, उत्तम कोळगांवकर, विश्वेश्वर सावदेकर डॉ. वि भि. कोलते, शुकदास महाराज यांचे संदेश प्राप्त झाले होते. श्री. विश्राम पवार यांनी आभार मानल्यावर उद्घाटन सोहळा संपला. रमेश कोरडे यांचेकडे या उद्घाटन सोहळयाचे संचालन होते.

दुसऱ्या सत्रात "लोकशाहीवादी समाजनिर्मितीच्या प्रक्रियेत साहित्यिकांची जबाबदारी" या विषयावर चांगला परिसंवाद झाला. पद्माकर घोगरे, सुहास कुळकर्णी, सौ. विजयिनी जोशी, मुकुंद चोपडे, कांबळे, डॉ. वात्सायन यांनी विचार मांडले.

कथाकथनात सर्वश्री बाबासाहेब कुळकर्णी, उ. भा. बिडवे, प्रभाकर कस्तुरे, सदानंद देशमुख आदींनी आपल्या कथा सांगितल्या.

कविसंमेलनात तब्बल १४० कविनी हजेरी लावली. सर्जेराव चव्हाण, स. ग. पाचपोळ, भगवान ठग, रविंद्र इंगळे, शशिकांत हुंगोणेकर, चंद्रकांत मुकवाणे, मंदीनी पांडे, कल्पना देशपांडे, सदानंद देशमुख, अमरचंद कोठारी, श्री. पु. कांबळे, संजय पळसोळकर, मधु गवई, भगवान जाधव, वा. का. दाभाडे, एकनाथ हुडेकर, यांनी कवी संमेलनात रंगत आणली. बऱ्याच नव कवींना यात चांगला वाव मिळाला.

दुसरे दिवशी पहिल्या सत्रात येथील अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य म. कृ. चिखलीकर यांचे "संस्कृतातील व्याख्यान प्रतिनिधींना ऐकायला मिळाले, या व्याख्यानाने श्रोत्यांना काव्य शास्त्र विनोद खऱ्या अर्थाने अनुभवायला मिळाला.

"ग्रंथालय चळवळ व पत्रकारिता यांची समाज परिवर्तनातील भूमिका" या विषयावर दुपारी श्री. अ. ल. लिमये यांच अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. त्यात प्रा. सुरेश द्वादशीवार, व्ही. के. क्षीरसागर, सुहास कुळकर्णी, अण्णासाहेब हिरोले यांनी आपले विचार मांडले.

परिसंवादानंतर संमेलन सांगता समारंभ झाला. श्री. गणेश तायडे यांनी समारोपाचे भाषण केले. प्रा. सुरेश द्वादशीवार यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. श्री. शिवाजी जवरे यांनी प्रतिनिधी तर्फे आयोजकांचे आभार प्रदर्शन केले. शंकर कऱ्हाडे यांनी "विदर्भ बाल साहित्य संमेलनाचे सूतोवाच केले व सर्वांचे आभार मानले. सौ. मीनाताई सदावर्ते व ज्योत्स्ना व ज्योती देशपांडे या भगिनींनी गायिलेल्या पसायदानाने संमेलनाची सांगता झाली.

सर्वश्री सर्जेराव चव्हाण, भगवान जाधव, दीननाथ नारे, मामा सातपुते, सो. या. सावजी, उद्धव वाळेकर, गांधी, प्रा. शाळेचे सर्व शिक्षक, पद्माकर कावलकर जिल्हा ग्रंथालयाचे सर्व कर्मचारी बुलढाण्यातील सर्व साहित्यप्रेमी यांच्या परिश्रमामुळे हे संमेलन यशस्वी झाले.

सरचिटणीस

रा.ग. जाधव यांना जीए प्रास पुरस्कार

सुप्रसिद्ध मराठी समीक्षक श्री रा.ग. जाधव यांच्या "डोहकाळिम्यात डोकावताना" या ग्रंथास जीए प्रास पुरस्कार घोषित झाला आहे. श्री रा.ग. जाधव यांनी मराठीचे अध्यापन आणि विश्वकोश कार्यालयात महत्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यांचे आजवर "साहित्य आणि सामाजिक संदर्भ", "निळी पहाट", "आनंदाचा डोह" "नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेये" इत्यादी महत्वाचे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

प्रास हे नागपूर येथील एक अनौपचारिक वाङ्मयीन व्यासपीठ असून या व्यासपीठातर्फे गेल्या वर्षी ११ डिसेंबर रोजी जीए स्मृतिदिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला होता. त्याचाच एक भाग म्हणून प्रासने जीए पुरस्कार योजना जाहीर केली होती. आजवर प्रकाशित झालेल्या जीए विषयक सर्व ग्रंथांचा समीक्षात्मक आढावा घेऊन पुरस्कार समितीने पुरस्कारासाठी "डोहकाळिम्यात डोकावताना" (कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे) या ग्रंथाची मतैक्याने निवड केली.

डॉ. द.भि. कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली सदर समितीमध्ये श्री शरद शृंगारपवार, डॉ. वीणा मुळे व प्रा. स. त्र्यं. कुल्ली यांनी सदस्य म्हणून कार्य केले.

प्रासच्या वर्धापन समारंभात श्री रा.ग. जाधव यांना नागपूर येथे रु. ५०१/- चा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

YUGAVANI / Regd . News Paper / NGP/ 341 / युगवाणी / एप्रिल-मे-जून १९९० / मुल्य १०रु-

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

वार्षिक साधारण सभेची सूचना

घटना नियम १० (अ) प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांना सूचना देण्यात येते की, विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार, दि. २९-७-९० ला दुपारी ३ वाजता नागपूर येथे केंद्रीय कार्यालयात भरेल.

सभेपुढील विषय

१. मागील वार्षिक साधारण सभेचा अहवाल.
२. गत वर्षाचे कार्यवृत्त.
३. १९८९-९० सालचे हिशेब तपासनीसाकडून तपासून घेतलेले हिशेब.
४. पुढील (१९९०-९१) वर्षाचे अंदाजपत्रक
५. १९९०-९१ करिता अधिकृत हिशेब तपासनिसाची नेमणूक.
६. सभासदानी रितसर पाठविलेले व कार्यकारी मंडळाने शिफारस केलेले ठराव/सूचना.
अध्यक्षांच्या अनुमताने येणार अन्य विषय.

गणपूर्ती अभावी सभा स्थगित झाल्यास ती सभेच्या वेळेनंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल व तिला गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

संघाच्या साधारण सभेत मांडावयाचे ठराव अगर सूचना यांची लेखी पूर्वसूचना सभासदाने सभेपूर्वी सात दिवस अगोदर कार्यालयाकडे दिली पाहिजे.

ह्या सभेला सर्व सभासदांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

विशेष सूचना-घटना कलम ९(इ) अन्वये सभासद होऊन बारा महिने न झालेल्या नव्या सभासदास मताधिकार राहणार नाही.

नागपूर
दिनांक ३० जून १९९०

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर - ४४० ०१२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर - ४४००१२
आवरण पृष्ठ मुद्रण : मधुकर आर्टस्, नागपूर - ४४००१२

अनुक्रमणिका